म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय सा. वाङ्मय
दा. क्र. १५८३६

IPBK-0115836
IRBK-0115836

# सुलभ महाभारत

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ७५८.३८ नों. २०१२५५
वि. हा. वा.

राजा मंगळवेढेकर

IRBK-0115836
IRBK-0115836

ज्योत्स्ना प्रकाशन

किंमत तीन रुपये

प्रथमावृत्ती, देवदीपावली, दि. ६-१२-१९७२

© ज्योत्स्ना प्रकाशन

मुद्रक : एच्. बी. धाणेकर, न्यू एज प्रिंटिंग प्रेस, ८५, सयानी रोड, २५.
प्रकाशक : ल. गो. परांजपे, ज्योत्स्ना प्रकाशन, ३० सी खोताची वाडी मुंबई ४.

*ती. काका ( लक्ष्मणराव मंगसुळे )*
*आणि*
*सौ. काकी ( इंदिराबाई मंगसुळे )*
*यांना सादर,*

*— राजा मंगळवेढेकर*

महाभारत हा भारताचा महान ठेवा आहे.
इतिहासात राजे-महाराजे झाले नि गेले.
राजशाह्या, पातशाह्या उगवल्या नि मावळल्या.
आता लोकसत्तेचे युग अवतरले आहे.
कालचक्र सतत फिरते.
आजची गोष्ट उद्या इतिहास बनते.
जुने जाते. नवे येते.
असे नित्य घडत असते.
परंतु नव्यातही नवे शोभावे असे काही जुने असते.
त्याची महती कालातीत ठरलेली असते.
त्याची देणगी निरनिराळी असते.
कधीही न संपणारी असते.
महाभारत हे असेच एक अमोल लेणे !
भारतीयांनी सदैव जपावे असे.
भारतीयांनी नित्य अभिमान बाळगावा असे !

—राजा मंगळवेढेकर

# कुरुवंशाचा इतिहास

शौनक ऋषींचा आश्रम नैमिषारण्यात होता.

शौनक ऋषी महापंडित आणि तेजस्वी तपस्वी होते. विद्याध्ययन, अध्यापन आणि यज्ञयाग यातच त्यांची खरी दिनचर्या व्यतीत होत असे.

एकदा शौनक ऋषींनी आपल्या आश्रमात एक यज्ञ आरंभला होता. हा यज्ञ एक तप म्हणजे बारा वर्षं अखंड चालणार होता. ठिकठिकाणचे ऋत्विज या यज्ञासाठी तिथे आलेले होते. यज्ञाबरोबरच ज्ञानचर्चा, प्रवचन आदि विविध कार्यक्रमही तिथे चालत असत.

एके दिवशी यज्ञकर्मातील हवन आदि आटोपून सर्व ऋत्विज असेच बसले असताना सूतपुत्रसौतीची स्वारी तिथे अचानकपणेच उपस्थित झाली. सौती हा विख्यात–पुराणिक होता. त्याच्या रसाळ वाणीने पुराणकथा किंवा गत गोष्टींची साद्यंत हकिकत ऐकण्यास एक अपूर्व आनंद होता. म्हणून सूतपुत्र सौतीला पाहताच सर्वांनाच अत्यानंद झाला. सर्वांनीच सौतीचे आदरपूर्वक स्वागत केले. शौनकांनी बसायला आसन दिले. गोदुग्ध प्राशन करण्यास दिले.

आसनस्थ झाल्यावर सौतीने विचारले,

"ऋषिश्रेष्ठांनो, आपले कुशल आहे ना? आपले यज्ञकार्य निर्विघ्नपणे चाललेले आहे ना?"

" होय सौती आम्ही सर्व कुशल असून आमचा यज्ञयाग यथासांग निर्विघ्न चाललेला आहे. परंतु हे सौती, तू आम्हाला असे सांग की तू आता कोठून येत आहेस ? इतके दिवस तू कोठे होतास ? " एका वृद्ध ऋषींनी विचारले.

त्यांना सौतीने मोठ्या नम्रपणाने सांगितले.

" श्रेष्ठा, मी जनमेजय राजाकडून येत आहे. इतके दिवस मी तिथेच होतो. परिक्षित राजाचा पुत्र जनमेजय याने सर्प सत्र आरंभिले होते ही वार्ता तुमच्या कानी असेलच. या सर्प सत्रात रोज सायंकाळी तिथे एक बहारीचा कार्यक्रम होत"

" कोणता ? "

" महर्षी व्यासांचा सत्‌शिष्य वैशंपायन हा जनमेजयाला त्याच्या पूर्वजांची कथाकहाणी ऐकवीत असे. मी देखील ती ओजस्वी महान कथा ऐकली. "

" असं ! मग सौती, जी कथा ऐकून तू धन्य झालास ती महान कथा तू इथे आता आम्हाला सांगून धन्य कर ! "

सर्वांनाच ही कल्पना पसंत पडली आणि सर्वांनीच सौतीला ती महान कथा सांगायचा आग्रह केला.

सूतपुत्र सौतीनेही सर्वांच्या इच्छेचा आदर केला आणि तो म्हणाला,

" श्रेष्ठांनो, महर्षी व्यासांनी ह्या कथेच्या रूपाने दक्ष-प्रजापतीपासूनचा एक तेजस्वी इतिहासच सांगितलेला आहे.

या इतिहासालाच ‘ महाभारत ’ असे नाव मिळाले आहे. याला कोणी ‘ जय ’ असेंही म्हणतात. ”

आणि अशारीतीने प्रस्तावना करून हस्तीनापुरातील कुरुवंशी राजांचा इतिहास त्याने पुढे निवेदन केला.

# शांतनु राजा

हजारो वर्षांपूर्वीची ही हकिकत. हस्तिनापूर नावाच्या राजधानीतील. त्यावेळी हस्तिनापुरात कुरूवंशातील राजांची राजवट होती. दुष्यंत राजाचा पराक्रमी पुत्र भरत याची ही राजधानी. परंतु त्याकाळी या नगरीचे नाव हस्तिनापूर नव्हते. या नगरीला त्यावेळी आसंदीव्रत अथवा ब्रह्मगिरी म्हणून ओळखत असत. भरत राजाच्या मागून सहा राजे झाले. सहाव्या राजाचे नाव होते हस्तिन. या राजाच्या नावावरूनच ब्रह्मगिरीचे हस्तिनापूर झाले.

हस्तिन राजा मोठा पराक्रमी होता. त्याचे आजोळ अवधमधील इक्ष्वाकु वंशातील होते. त्यामुळे हस्तिन राजाला दोन प्रतापी वंशांचे वैभव मिळाले.

याच हस्तिन राजाच्या पुढच्या पिढीत प्रतीप नावाचा एक राजा झाला. राजाचे राज्य वैभव मोठे होते. राजाला तीन मुले होती. देवापी, बाल्हीक आणि शांतनु.

प्रतीप राजा कालमानाप्रमाणे वृद्ध झाला. राजकारभार पाहण्याची उमेद राहिली नाही. म्हणून पुत्राच्या हाती कारभार सोपवण्याची इच्छा त्याने प्रकट केली.

प्रतीप राजाचा दरबार भरलेला होता. राजाने आपली इच्छा बोलून दाखवली. त्या काळच्या प्रथेनुसार ज्येष्ठ पुत्राला युवराज्याभिषेक होत असे. देवापी हा ज्येष्ठ पुत्र

होता. परंतु एका ज्येष्ठाने उठून सांगितले, देवापीला कुष्ठ असल्यामुळे त्याला राज्यावर वसवू नये. रोगी राजा प्रजेला आवडणार नाही."

यावर देवापीनेदेखील 'आपल्याला राज्य नको' असे सांगून टाकले.

पाठोपाठ मधला बाल्हीक उठला आणि म्हणाला, "महाराज, मला येथे राहण्याचीच इच्छा नाही. आपल्या पूर्वजांची पुण्य-भूमी एकेकाळी सिन्धुनदीच्या पार होती असे ऐकले आहे. ती भूमी जिंकण्याची माझी इच्छा आहे. महाराज, मला तशी अनुज्ञा द्यावी."

शेवटी राहता राहिला शांतनु.

शांतनुलाच युवराज्याभिषेक करण्यात आला.

शांतनु हस्तिनापूरचा राजा झाला.

शांतनु राजा मोठा पराक्रमी होता. चांगला शासक होता. त्याला मृगयेचा छंद होता. त्याकाळी राजा क्षत्रिय असे. क्षत्रियांना शिकार फार आवडे आणि आवश्यकही मानली जाई. नेमबाजी, धैर्य, साहस इत्यादि गुणांचा विकास होई. मनोरंजनही होई.

एकदा शांतनू राजा गंगा नदीच्या तटावरील ऋषींचे आश्रम आणि तीर्थक्षेत्रे पाहत मजेने विहार करीत असताना एके ठिकाणी राजाला अतीव सुंदर अशी स्त्री दिसली. एखाद्या चित्रासारखी ती रेखीव लावण्यवती होती. तिचे

अपूर्व सौंदर्य पाहून राजा मोहित झाला. त्या स्त्रीला म्हणाला, "हे सुंदरी, तू कोण आहेस ?"

"मला गंगा म्हणतात." स्त्रीने सांगितले.

"वा ! मी हस्तिनापूरचा राजा शांतनू आहे." राजाने आपला परिचय दिला आणि नंतर विचारल,

"हे लावण्यवती, मी तुझ्यावर मोहित झालो आहे. तुझ्यावाचून जगणे यापुढे मला शक्य होणार नाही. तरी, हे मृगनयने, तू माझी धर्मपत्नी होशील काय ?" राजाने वराच अनुनय केल्यावर गंगा म्हणाली,

"हे नृपाळा, मी तुझी इच्छा पुरी करीन. तुझ्याशी विवाह करीन. पण माझी अट तुला मानावी लागेल !"

"अवश्य मानीन. कोणती अट?"

"मी तुझी धर्मपत्नी झाले तरी तू मला बंधनात ठेवता कामा नये. मी मनाप्रमाणे स्वच्छंदाने वागणार. तू मला अडथळा करायचा नाही. ज्या क्षणी तू हा नियम मोडशील त्या क्षणी मी तुझा त्याग करीन."

हे कोमलांगी, तुझी अट मला मान्य आहे."

गंगा आणि शांतनू राजा यांचा सुखसंसार सुरू झाला. आनंदाच्या भरात दिवस कसे पाखरांसारखे उडून गेले. महिने, वर्षं उलटली.

या कालावधीत गंगेला राजापासून सात अपत्ये झाली. पण मूल जन्मताच गंगा त्याला गंगार्पण करीत असे. दरवेळी

पोटच्या मुलाचा असा शेवट पाहून शांतनुला अपार दुःख होई. पण अटीनुसार तो बोलला नाही. आठव्या पुत्राचा जन्म झाला. गंगा त्यालाही बुडवायला निघाली. राजाला राहवले नाही. तो म्हणाला, "थांब, स्वतःच्या पोटच्या लेकराचा घात करणारी तू पाषाण हृदयी आहेस. अशाने तुला काय लाभ होत आहे ? ' दुष्टे, तू आहेस तरी कोण ? "

गंगा थांबली. म्हणाली, 'राजा पुत्रासाठी तुझे हृदय व्याकुळले आहे, मी हे जाणते. तुझ्या इच्छेप्रमाणे मी हा पुत्र ठेवते. पण या क्षणापासून तुझा माझा संबंध संपला. आता मी कोण ते सांगते. मी स्वर्गलोकीची गंगा. अष्ट वसू वसिष्ठांच्या शापामुळे पृथ्वीतलावर आले. राजा, ह्या पुत्राचा बालपणी मी सांभाळ करीन. मोठेपणी हा तुझी कीर्ती व यश वाढविणारा होईल. "

गंगा अदृश्य झाली.

शांतनु दुःखीकष्टी होऊन परतला. प्रजापालनाचे कर्तव्य व्रती माणसाप्रमाणे करू लागला.

दिवसमास उलटले. शांतनु असाच एकदा मृगयेसाठी गंगातीरी गेला. त्यावेळी त्याला गंगेचे पाणी बरेच कमी झालेले दिसले. राजाला आश्चर्य वाटले ! असे का व्हावे ? तेवढ्यात त्याचे लक्ष गंगेच्या प्रवाहाच्या वरच्या दिशेकडे गेले. पाहतो तो एका तेजस्वी, पुष्ट मुलाने आपल्या बाणांनी गंगेचा प्रवाह रोखून धरलेला !

# शांतनु राजा

हजारो वर्षांपूर्वीची ही हकिकत. हस्तिनापूर नावाच्या राजधानीतील. त्यावेळी हस्तिनापुरात कुरूवंशातील राजांची राजवट होती. दुष्यंत राजाचा पराक्रमी पुत्र भरत याची ही राजधानी. परंतु त्याकाळी या नगरीचे नाव हस्तिनापूर नव्हते. या नगरीला त्यावेळी आसंदीव्रत अथवा ब्रह्मगिरी म्हणून ओळखत असत. भरत राजाच्या मागून सहा राजे झाले. सहाव्या राजाचे नाव होते हस्तिन. या राजाच्या नावावरूनच ब्रह्मगिरीचे हस्तिनापूर झाले.

हस्तिन राजा मोठा पराक्रमी होता. त्याचे आजोळ अवधमधील इक्ष्वाकु वंशातील होते. त्यामुळे हस्तिन राजाला दोन प्रतापी वंशांचे वैभव मिळाले.

याच हस्तिन राजाच्या पुढच्या पिढीत प्रतीप नावाचा एक राजा झाला. राजाचे राज्य वैभव मोठे होते. राजाला तीन मुले होती. देवापी, बाल्हीक आणि शांतनु.

प्रतीप राजा कालमानाप्रमाणे वृद्ध झाला. राजकारभार पाहण्याची उमेद राहिली नाही. म्हणून पुत्राच्या हाती कारभार सोपवण्याची इच्छा त्याने प्रकट केली.

प्रतीप राजाचा दरबार भरलेला होता. राजाने आपली इच्छा बोलून दाखवली. त्या काळच्या प्रथेनुसार ज्येष्ठ पुत्राला युवराज्याभिषेक होत असे. देवापी हा ज्येष्ठ पुत्र

होता. परंतु एका ज्येष्ठाने उठून सांगितले, देवापीला कुष्ठ असल्यामुळे त्याला राज्यावर बसवू नये. रोगी राजा प्रजेला आवडणार नाही."

यावर देवापीनेदेखील 'आपल्याला राज्य नको' असे सांगून टाकले.

पाठोपाठ मधला बाल्हीक उठला आणि म्हणाला, "महाराज, मला येथे राहण्याचीच इच्छा नाही. आपल्या पूर्वजांची पुण्य-भूमी एकेकाळी सिन्धुनदीच्या पार होती असे ऐकले आहे. ती भूमी जिंकण्याची माझी इच्छा आहे. महाराज, मला तशी अनुज्ञा द्यावी."

शेवटी राहता राहिला शांतनु.

शांतनुलाच युवराज्याभिषेक करण्यात आला.

शांतनु हस्तिनापूरचा राजा झाला.

शांतनु राजा मोठा पराक्रमी होता. चांगला शासक होता. त्याला मृगयेचा छंद होता. त्याकाळी राजा क्षत्रिय असे. क्षत्रियांना शिकार फार आवडे आणि आवश्यकही मानली जाई. नेमबाजी, धैर्य, साहस इत्यादि गुणांचा विकास होई. मनोरंजनही होई.

एकदा शांतनू राजा गंगा नदीच्या तटावरील ऋषींचे आश्रम आणि तीर्थक्षेत्रे पाहत मजेने विहार करीत असताना एके ठिकाणी राजाला अतीव सुंदर अशी स्त्री दिसली. एखाद्या चित्रासारखी ती रेखीव लावण्यवती होती. तिचे

अपूर्व सौंदर्य पाहून राजा मोहित झाला. त्या स्त्रीला म्हणाला, "हे सुंदरी, तू कोण आहेस?"

"मला गंगा म्हणतात." स्त्रीने सांगितले.

"वा! मी हस्तिनापूरचा राजा शांतनू आहे." राजाने आपला परिचय दिला आणि नंतर विचारले,

"हे लावण्यवती, मी तुझ्यावर मोहित झालो आहे. तुझ्यावाचून जगणे यापुढे मला शक्य होणार नाही. तरी, हे मृगनयने, तू माझी धर्मपत्नी होशील काय?" राजाने बराच अनुनय केल्यावर गंगा म्हणाली,

"हे नृपाळा, मी तुझी इच्छा पुरी करीन. तुझ्याशी विवाह करीन. पण माझी अट तुला मानावी लागेल!"

"अवश्य मानीन. कोणती अट?"

"मी तुझी धर्मपत्नी झाले तरी तू मला बंधनात ठेवता कामा नये. मी मनाप्रमाणे स्वच्छंदाने वागणार. तू मला अडथळा करायचा नाही. ज्या क्षणी तू हा नियम मोडशील त्या क्षणी मी तुझा त्याग करीन."

हे कोमलांगी, तुझी अट मला मान्य आहे."

गंगा आणि शांतनू राजा यांचा सुखसंसार सुरू झाला. आनंदाच्या भरात दिवस कसे पाखरांसारखे उडून गेले. महिने, वर्षे उलटली.

या कालावधीत गंगेला राजापासून सात अपत्ये झाली. पण मूल जन्मताच गंगा त्याला गंगार्पण करीत असे. दरवेळी

पोटच्या मुलाचा असा शेवट पाहून शांतनुला अपार दुःख होई. पण अटीनुसार तो बोलला नाही. आठव्या पुत्राचा जन्म झाला. गंगा त्यालाही बुडवायला निघाली. राजाला राहवले नाही. तो म्हणाला, "थांब, स्वतःच्या पोटच्या लेकराचा घात करणारी तू पाषाण हृदयी आहेस. अशाने तुला काय लाभ होत आहे ? 'दुष्टे, तू आहेस तरी कोण ?"

गंगा थांबली. म्हणाली, 'राजा पुत्रासाठी तुझे हृदय व्याकुळले आहे, मी हे जाणते. तुझ्या इच्छेप्रमाणे मी हा पुत्र ठेवते. पण या क्षणापासून तुझा माझा संबंध संपला. आता मी कोण ते सांगते. मी स्वर्गलोकीची गंगा. अष्ट वसू वसिष्ठांच्या शापामुळे पृथ्वीतलावर आले. राजा, ह्या पुत्राचा बालपणी मी सांभाळ करीन. मोठेपणी हा तुझी कीर्ती व यश वाढविणारा होईल."

गंगा अदृश्य झाली.

शांतनु दुःखीकष्टी होऊन परतला. प्रजापालनाचे कर्तव्य व्रती माणसाप्रमाणे करू लागला.

दिवसमास उलटले. शांतनु असाच एकदा मृगयेसाठी गंगातीरी गेला. त्यावेळी त्याला गंगेचे पाणी बरेच कमी झालेले दिसले. राजाला आश्चर्य वाटले ! असे का व्हावे ? तेवढ्यात त्याचे लक्ष गंगेच्या प्रवाहाच्या वरच्या दिशेकडे गेले. पाहतो तो एका तेजस्वी, पुष्ट मुलाने आपल्या बाणांनी गंगेचा प्रवाह रोखून धरलेला !

राजा चकित झाला! त्या मुलाजवळ जाऊन त्याने चौकशी केली. परंतु मुलगा फक्त हसला नि गंगेच्या विशाल उदरात गडप झाला.

राजा आणखीनच चकित झाला! पण त्याला पूर्वीचे सारे आठवले. तो उद्‌गारला, “ हे गंगे, हे काय रहस्य आहे ते मला सांग. ”

राजाची मनीषा जाणून गंगा प्रकट झाली नि म्हणाली, “ राजा, हा माझ्या उदरी आलेला तुझा आठवा पुत्र. गंगादत्त याचे नाव. याला मी सांभाळले, वाढवले. परशुरामांनी याला शस्त्रास्त्रविद्या दिली आहे. वशिष्ठांच्याजवळ याने वेदाध्ययन केले आहे. हा प्रतापी आहे. मी याला आता तुझ्या स्वाधीन करीत आहे. ”

राजाला अतिशय आनंद झाला. मुलाला घेऊन तो हस्तिनापुरी आला. त्याला यौवराज्याभिषेक केला. त्याचे देवव्रत असे नामाभिधान केले. देवव्रताने आपल्या गुणांनी आणि पराक्रमाने आबालवृद्धांचे प्रेम व कौतुक मिळविले.

# सत्यवती

दिवसमास उलटले. चारएक वर्षे निघून गेली. एके दिवशी यमुनातीरावर सहज मुक्तपणाने शांतनु राजा विहार करीत असताना त्याला एकाएकी अभूतपूर्व सुवास येऊ लागला. अहाहा! साऱ्या चित्तवृत्ती वेधून घेणारा आणि प्रसन्न करणारा तो सुगंध अनामिकच होता. पूर्वी कधी याचा आस्वाद घेतलेला नव्हता. राजा त्या सुगंधाचा मागोवा घेत यमुनेच्या तटी गेला. तिथे एक कोळ्याची, अप्रतिम लावण्याने फुललेली तरुणी पाण्याशी चाळा करीत असलेली राजाला दिसली.

राजा तिच्याजवळ गेला आणि म्हणाला,

" हे लावण्यलतिके, तुझे नाव काय ? "

" सत्यवती. "

" तू कोणाची कोण ? "

" मी दाश धीवराची कन्या. "

सत्यवती बोलत होती. आसपास सुगंधाच्या लाटा लहरत होत्या. तो अपूर्व सुगंध सत्यवतीचाच होता. फुलाला सुगंध असतो, तसा सत्यवतीला होता. सुगंधाचे वरदान तिला लाभले होते. यापूर्वी सत्यवती अशीच सुंदर होती, पण तिच्या शरीराला माशासारखा दुर्गंध येत असे. म्हणून तिला मत्स्यगंधाच म्हणत असत.

दुर्गंधीमुळे कोणी तिच्याजवळ फिरकत नसे.

पण एकदा पाराशर ऋषी सत्यवतीच्या नौकेत बसून गंगा पार करीत असताना ते तिच्यावर प्रसन्न झाले. त्यांनी आपल्या तपोबलाने सत्यवतीच्या शरीराची दुर्गंधी नाहीशी केली आणि तिला सुगंधित बनवली. सत्यवतीच्या शरीराचा सुगंध दूरवर पोचत असे. म्हणून तिला योजनगंधा असेही म्हणू लागले.

त्याचवेळी सत्यवतीला पाराशरांपासून एक मुलगा झाला. वर्णाने सावळा असलेला हा मुलगा नदीमध्यावरील टापूत जन्मला, म्हणून याचे नाव कृष्णद्वैपायन पडले. पुढे हाच मुलगा महर्षी वेदव्यास या नावाने सुविख्यात झाला.

शांतनु राजाची व सत्यवतीची भेट झाली त्यावेळी या गोष्टीला खूप दिवस-होऊन गेले होते. राजाने सत्यवतीला विचारले, “ हे गंधवती, तू माझी राणी होशील का ? ”

हा प्रश्न ऐकून सत्यवती लज्जेने चूर झाली. ती म्हणाली, “ राजन, आपण माझ्या पिताजींची अनुज्ञा मिळवा. ”

“ ठीक आहे ” राजा म्हणाला आणि त्याने दाशधीवराची भेट घेतली. सत्यवतीला मागणी घातली. राजाची मागणी ऐकून धीवराला आनंद झाला. पण तो संकोचलाही. म्हणाला, “ महाराज, आपण राजे, मी गरीब कोळी. चार दिवसांनी माझ्या मुलीला विसरून जाल. ”

“ धीवरा, मी तुला वचन देतो. तुझी मुलगी सदैव माझी आवडती राणीच राहील. ”

"महाराज, वचनाप्रमाणे आपण वागाल, सत्यवतीला सुखी आनंदी ठेवाल. पण तिच्या पोटी जन्म घेणाऱ्या आपल्या मुलाला निश्चितच दुःख होणार. कारण आपल्या पश्चात राजसिंहासनाचा वारस देवव्रत होणार. तोच तुमचा ज्येष्ठ पुत्र. सत्यवतीच्या मुलांना त्याच्या गुलामीत जगावे लागणार. महाराज, आपण जर असे वचन देत असाल की आपल्या पश्चात राजसिंहासनाचा अधिकारी राजा–सत्यवतीचा मुलगाच होईल, तर सत्यवती तुम्हाला देण्यास मी तयार आहे."

शांतनु राजा विचारात पडला. विलक्षण पेच त्याच्यापुढे उभा राहिला. सत्यवती की देवव्रताचा अधिकार !

राजाने मोठ्या निग्रहाने निर्णय केला आणि म्हटले, "नाही, मी असे वचन देणार नाही. माझ्या सुखासाठी देवव्रताचा अधिकार मी पायी तुडवणार नाही. त्याच्यावर अन्याय करणार नाही."

दुःखी मनाने राजा राजमहालात परत आला. त्याने आपली न्यायप्रियता सिद्ध केली होती, परंतु सत्यवतीची प्राप्ती न झाल्यामुळे तो सदैव दुःखी कष्टीच राहू लागला. राजकारभारातले त्याचे चित्त उडाले. रात्रन्‌रात्र तो जागत बसे, त्याची काया कृश होऊ लागली. देवव्रताला एकदा वडिलांच्या दुःखाचे कारण अमात्याकडून कळले. ते ऐकताच तो म्हणाला, "पित्याच्या सुखासाठी प्राणत्याग करायलाही मी तयार आहे. मला राजसिंहासन नको. सत्ता नको."

देवव्रत दाश धीवराकडे गेला आणि म्हणाला. “आपल्या कन्येचा आणि माझ्या पिताजींचा विवाह करून द्या. मी प्रतिज्ञा करतो की, हस्तीनापुरच्या राजसिंहासनावर मी कधीही बसणार नाही.”

“युवराज, आपण धन्य आहात,” धीवर म्हणाला.

“परंतु माझी चिंता अद्यापही मिटलेली नाही. कारण आपण वचनाला जागाल; परंतु आपली मुलें माझ्या नातवांशी जरूर झगडतील. कोणी सांगावे! म्हणून आज हा संबंध घडवून पुढच्या पिढ्यांना दुःखी करण्यात काय अर्थ आहे. नकोच ते.”

हे ऐकताच देवव्रत एक क्षण स्तब्ध झाला. पण दुसऱ्याच क्षणी गंभीरपणाने म्हणाला,

“माझ्या वडिलांच्या सुखासाठी मी मोठ्यात मोठा त्याग करण्यास तयार आहे. देवदेवतांना साक्षी ठेवून मी आत्ताच अशी प्रतिज्ञा करतो की, मी आजन्म अविवाहित राहीन. ब्रह्मचारी राहीन. तुमच्या कन्येच्या पोटी जन्म घेणाऱ्या माझ्या लहान भावांचे मी रक्षण करीन. जिवंत असेन तोवर त्यांच्यावर आणि त्यांच्या मुलाबाळांवर प्राणापलीकडे प्रेमच करीन! त्यांना सांभाळीन!”

देवव्रताची ही प्रतिज्ञा ऐकून दाहीदिशांतून त्याचा जय-जयकार उठला. देवव्रताने अशी अति कठीण प्रतिज्ञा केल्या-मुळेच त्याला भीष्म म्हणू लागले.

■ ■

# वंशविस्तार

देवव्रताने आपल्यासाठी महान् त्याग केला हे पाहून शांतनु राजा त्याच्यावर प्रसन्न झाला. त्याने देवव्रत भीष्माला तू इच्छामरणी होशील, असा आशीर्वाद दिला.

सत्यवतीशी विवाह झाल्यानंतर शांतनु राजाचे दिवस मोठ्या सुखासमाधानात गेले.

सत्यवतीपासून राजाला दोन पुत्र झाले. मोठा चित्रांगद आणि धकटा विचित्रवीर्य. भीष्माने आपल्या भावांना लहानपणापासूनच चांगले शिक्षण मिळेल याची काळजी घेतली. परंतु मुलांचे बालपण संपण्याआधीच शंतनू राजाचा मृत्यू झाला.

भीष्माने चित्रांगदाला राज्यावर बसवले. चित्रांगद उत्कृष्ट शासक तसाच लढवैय्या होता. त्याने अनेक राजांवर स्वाऱ्या करून आपला राज्यविस्तार केला. परंतु चित्रांगद गंधर्वांशी लढताना, मायावी युद्धात तो मारला गेला.

भीष्माने नंतर विचित्रवीर्यास राजसिंहासनावर बसविले. परंतु विचित्रवीर्य वयाने लहान, तसाच अकार्यक्षम होता. म्हणून भीष्माने त्याच्या नावाने आणि सत्यवतीच्या अनुज्ञेने राज्यकारभार पाहण्यास सुरुवात केली.

दिवसमास उलटले आणि एके दिवशी भीष्माच्या कानी वार्ता आली कीं, काशी राजाने आपल्या तीन मुलींचें स्वयंवर

मांडलेले आहे. विचित्रवीर्य तोवर विवाहयोग्य झालेला होता. म्हणून सत्यवतीचा विचार घेऊन भीष्म विचित्रवीर्याला घेऊन स्वयंवराला गेला.

काशी राजाला तीन मुली होत्या— अम्बा, अम्बिका आणि अम्बालिका. स्वयंवराच्या मंडपात एकेक राजाला पाहात त्या निघाल्या होत्या. भीष्मापुढे येताच, त्याला वृद्ध म्हणून त्यांनी नाकारले. त्याचवेळी त्याच्या वृद्धत्वाला सगळे राजे कुचेष्टेने हसले. भीष्माला याचा राग आला. त्याने तीनही राजकन्यांचे हरण केले, रथात घातले, आणि सर्व राजांना लढण्याचे आवाहन दिले. घनघोर युद्ध झाले. परंतु एकट्या भीष्माने सर्वांचा पराभव केला. नंतर त्या तिन्ही राजकन्यांना घेऊन तो हस्तिनापुराला आला.

तिघी राजकन्यांपैकी अम्बाने भीष्माला सांगितले, "मी मनाने सौभपती शाल्वांना वरलेले आहे. मला त्यांच्याकडे पोहचती करा." भीष्माने अंबेची विनंती मान्य केली. नंतर अम्बिका व अम्बालिका यांचा विचित्रवीर्याशी मोठ्या थाटामाटाने विवाह करून दिला.

काही काळ आनंदात गेला. सत्यवती आपल्या दोन सुनांच्या संसारात रमली होती. परंतु अचानकपणेच विचित्र-वीर्याला क्षयरोगाची बाधा झाली. अनेक तऱ्हेचे औषधोपचार केले, परंतु विचित्रवीर्याचा त्यातच मृत्यू झाला.

सत्यवती शोकसागरात बुडाली होती. पती, दोन पुत्र गेले, परंतु सुनांच्या पोटी पुत्रप्राप्ती झालेली नसल्यामुळे

कुलक्षय होण्याची पाळी आलेली होती. सत्यवतीला याचे अतीव दुःख झाले. तिने भीष्माजवळ ही गोष्ट बोलून दाखवली तेव्हा भीष्म म्हणाला, " माते, मी माझ्या प्रतिज्ञेपासून रेसभरही ढळणार नाही. दुसरे काहीही सांग. "

भीष्माच्या दृढनिश्चयाबद्दल सत्यवतीला कल्पना होतीच. तिने मग भीष्माला पाराशरऋषीपासून नौकेत झालेल्या पुत्राची माहिती सांगितली. ती ऐकून भीष्म म्हणाला, " माते महर्षी व्यास हे तुझे पुत्र आहेत, हे ऐकून अभिमानच वाटला. या संकटाच्या वेळी त्यांचे साहाय्य घ्यायला काहीच हरकत नाही. "

सत्यवतीने व्यासांचे स्मरण करताच महर्षी व्यास प्रकट होऊन म्हणाले,

" माते, काय आज्ञा आहे ? "

सत्यवतीने सगळी परिस्थिती निवेदन करून कुलक्षय थांबवण्याची इच्छा प्रदर्शित केली. व्यास म्हणाले,

" माते, तुझी इच्छा प्रमाण मानूनच नियोग पद्धतीने मी वंशवृद्धीला हातभार लावीन. "

व्यासांपासून अम्बिका व अम्बालिका यांना धृतराष्ट्र व पांडु हे दोन पुत्र झाले. व्यासांच्या उग्र रूपाला भिऊन अम्बिकेने डोळे झाकून घेतले त्यामुळे धृतराष्ट्र आंधळा झाला आणि अम्बालिका भयाने पिवळी पडल्यामुळे पांडु तसाच फिकट, रोगट निपजला. त्याचवेळी एका दासीला अम्बिकेने

व्यासांच्या सेवेला धाडले होते. दासीच्या पोटी मात्र निरोगी, विद्वान, विवेकी पुत्र जन्माला आला. त्याचे नाव विदुर.

धृतराष्ट्र आणि पाण्डु यांचेही पालन-पोषण, शिक्षण भीष्माने प्रेमाने, आस्थेने केले. दोघेही विवाहयोग्य होताच त्यांचे विवाह करून दिले. गान्धर्व देशची राजकुमारी गांधारी धृतराष्ट्राची पत्नी बनली. गांधारी महापतिव्रता होती. पती अंध आहे हे कळल्यावर तिनेही आजन्म आपल्या डोळ्यांवर पट्टी बांधून घेतली.

पाण्डूचा विवाह कुन्तीभोज राजाची कन्या कुन्ती हिच्याशी झाला. कुन्तीला दुर्वास ऋषींनी एक मंत्र दिला होता. त्या मंत्राचा जप करून इष्ट देवतेचे ध्यान केले असता, तशा-गुणांनी युक्त असा-पुत्र होईल, असे दुर्वासांनी सांगितले होते. कुंतीच्या उतावळ्या स्वभावामुळे तिने लग्नाआधीच तो मंत्र जपला आणि सूर्याची आराधना केली. त्यामुळे सूर्या-सारख्या तेजस्वी व पराक्रमी पुत्राची प्राप्ती तिला कुंवारपणातच झाली. लोकापवादाच्या भयाने कुंतीने तो पुत्र एका डालीत ठेवून ती नदीच्या प्रवाहात सोडून दिली. नदीच्या प्रवाहा-बरोबर वाहत आलेल्या या मुलाला पुढे एका सुताराने सांभाळले, वाढवले. हस्तिनापूरच्या राजसिंहासनावर बसण्याचा मान खरे तर धृतराष्ट्राचा होता. परंतु तो अंध-अपंग असल्या-मुळे त्याच्या ऐवजी पाण्डुला राज्याभिषेक झाला.

पाण्डूने मद्र देशाची राजकन्या माद्री हिच्याशीही विवाह केला होता. माद्री सुंदर होती. तिला मूल करून घ्यावी अशी

सत्यवतीची इच्छा होती. म्हणून भीष्माने मद्रनृपतीकडे मागणी घालून माद्रीला हस्तिनापुराला आणले होते. दोन भार्यांसह पाण्डु सुखाने कालक्रमणा करू लागला. पाण्डूला कुंती पासून तीन पुत्र झाले–युधिष्ठिर, भीम व अर्जुन आणि माद्रीपासून दोन पुत्र झाले–नकुल व सहदेव. अशा प्रकारे पाच पराक्रमी व गुणी पुत्रांचा लाभ पाण्डूला झाला. हेच पाच पाण्डव होत.

धृतराष्ट्राला गांधारीपासून शंभर पुत्र झाले. हेच कौरव होत.

कुरु कुलाची वंशवेल फुलली होती. बहरली होती.

पण एका वसंतकाळी वनात राहात असता पांडूचा अंत झाला. आपले दोन्ही मुलगे– नकुल व सहदेव यांना कुंतीच्या ओटीत घालून माद्री पाण्डूबरोबर सती गेली. सत्यवती, अंबिका व अंबालिका यांना फार दुःख झाले. त्यांनी वनात जाऊन उर्वरित आयुष्य तपःसाधनेत घालवले.

■ ■

# मत्सर जागा झाला

पाण्डूचे पाच पुत्र आणि धृतराष्ट्राचे शंभर पुत्र एकत्रच वाढत होते, खेळत, बागडत होते. भीम हा सर्वांत बलदंड होता. खेळण्यात तसा दांडगावा करण्यात त्याचा हात कोणी धरू शकत नसे. कौरवांना—आपल्या चुलत भावांना तो खेळताना नेहमी हरवीत असे. नाना तऱ्हेच्या खोड्या करून त्यांना सतावीत असे. त्यामुळे दुर्योधन, दुःशासन आदि कौरवांना भीमाचे फार भय वाटे आणि रागही येई. या भीमाचा बंदोबस्त कसा करावा याची त्यांना चिंता पडे.

एकदा दुर्योधन आणि दुःशासन यांनी भीमाचा काटा काढण्याचाच डाव रचला. त्यानुसार प्रमाणकोटी गावात त्यांनी धृतराष्ट्राकडून गंगेच्याकाठी एक क्रीडागृह तयार करवून घेतले. त्या क्रीडागृहात नानातऱ्हेचे खाद्यपदार्थही भरपूर ठेवले. मग एके दिवशी पांडवांना घेऊन कौरव विहार करण्यासाठी तेथे गेले. गेल्यावर सर्वजण मुक्तपणाने खेळले. भीमाने तर गंगेचा प्रवाह पाहताच उडी घेतली आणि मनसोक्त डुंबला.

बराच काळ क्रीडेत घालवल्यावर दुर्योधन म्हणाला, "चला, आता जेवण करू या, भूक फार लागली आहे."

"होय बुवा. चला लवकर" भीम म्हणाला.

मग सगळीजणं मिळून जेवायला बसले. दुर्योधन आपण

खुषीत असल्याचे नाटक करीत होता. एकेकाला आग्रहाने वाढीत होता. एकेकाच्या मुखात आपल्या हाताने घास भरवीत होता. हासत बोलत जेवण चालले होते. होता होता दुर्योधनाने एक घास घेतला आणि "भीमा, फार दमला असशील पोहून. हा घे माझ्या हातचा घास." असे म्हणून भीमाला तो घास भरवला.

जेवणे झाली तशी भीमाच्या डोळ्यावर झापड आली. कधी नव्हे इतके झोपेने भीमाला घेरले. असे होणे साहजिकच होते, कारण दुष्ट दुर्योधनाने त्याच्या घासात विष कालवलेले होते.

झोप आल्यामुळे भीम गंगातीरीच जाऊन झोपला. सगळे पांडवही दिवसभर खेळून थकले होते. सर्वजण गाढ झोपी गेले. ही संधी साधून दुर्योधनाने गाढ झोपलेल्या भीमाला रानवेलींनी करकचून बांधले आणि गंगेच्या प्रवाहात लोटून दिले.

सकाळ झाली. सगळे उठले. हस्तिनापुरी परत जाण्यास सिद्ध झाले. पण भीम कोठे आहे ? शोधाशोध केली. पण भीम दिसलाच नाही. तेव्हा तो एकटाच लवकर उठून पुढे गेला असेल अशा समजुतीने सगळेजण हस्तिनापुरी परत आले. दुर्योधन, दु:शासन ह्या दुष्टांना मनातून आनंद झाला होता. पण भीम परतला नाही हे पाहून कुंतीचे काळीज भयाने थरथरले. मनीची पाल चुकचुकली. बाकीचे पांडवही चिंतातूर झाले.

■ ■

# नागलोकी भीम

पोटात वीष गेल्यामुळे भीम बेशुद्ध झाला होता. दुर्योधनाने गंगेत टाकल्याबरोबर तो तळाशी गेला आणि प्रवाहाबरोबर वाहत वाहत चालला. गंगेच्या त्या तळाशी अनेक विषारी सर्पांची वसती होती. भीमाच्या प्रचंड देहाखाली सापडून अनेक सर्पांचा नुसता चेंदामेंदा झाला. अनेक सर्पांनी चिडून भीमाला ठिकठिकानी दंश केला. पण आश्चर्य असे की वज्रदेही भीमाला त्यांचे विष बांधले नाही. उलट, या विषामुळे त्याला आधीच थोडे बाधलेले विष उतरले आणि तो हळूहळू शुद्धीवर येऊ लागला. त्याची प्रचंड हालचाल पाहून नि त्याचे भीषण सुस्कार ऐकून सर्पलोकात एकच घबराट उडाली. सगळे सर्प वेगाने सरपटत, सरपटत आपल्या सर्पराजाकडे—वासुकीकडे गेले. त्यांना असे भयभीत अवस्थेत पाहून सर्पराज वासुकीने विचारले,

“ अरे, काय झाले ? असे भिऊन का ? ”

“ महाराज, नागलोकावर एक अरिष्ट आलेले. ”

“ अरिष्ट ? कसले ? ”

मग सर्पांनी सर्व हकिकत निवेदन केली. ती ऐकून वासुकीलाही आश्चर्य वाटले. तो लगबगीने भीमाकडे आला. तोवर भीम पूर्ण शुद्धीवर आलेला होता. वासुकीने त्याला विचारले,
“ कोण रे तू ? ”

"मी? मी कुंतीपुत्र भीम आहे!" भीमाने सांगितले. हे ऐकताच वासुकीला अत्यानंद झाला. कारण कुंतीचा पिता हा आर्यक नागाचा नातू होता. त्यामुळे नागकुलाशी भीमाचाही संबंध आलाच. तेव्हा आपल्याकडे अशिष्ट न येता इष्ट नातेवाईकच आला हे पाहून वासुकीला परम समाधान झाले. त्याने मोठ्या प्रेमभराने भीमाला आलिंगन दिले. त्याचे यथायोग्य स्वागत केले. सहस्र नागांचे बल ज्या मध्ये आहे अशा रसांचे कुंभच्या कुंभ भीमापुढे ठेवले. भीमाने आठ मोठाले कुंभ प्राशन केले.

दुसरे दिवशी वासुकीने भीमाचा सत्कार केला आणि प्रेमाने निरोप दिला. सर्पसेवकांनी भीमाला मग गंगातीरी आणून सोडले. नवीन सामर्थ्य आणि अपूर्व शक्ती लाभलेला भीम मग हस्तिनापुरी आला. त्याला पाहाताच कुंतीचा, विदुराचा आणि पांडवांचा जीव भांड्यात पडला. त्यांची चिंता मिटली. कुंतीने त्याला जवळ घेऊन विचारले,

"भीमा, कुठे गेला होतास रे?"

"माते, मी नागलोकी जाऊन आलो," असे म्हणून भीमाने घडलेली सर्व हकिकत सांगितली. मग मुठी वळून तो म्हणाला,

"माते, आत्ताच जाऊन त्या दुष्ट दुर्योधनाचा सूड उगवतो."

परंतु विदुराने त्याला थांबवले. ते म्हणाले,

" भीमा, योग्य समयाची वाट पहा. तोवर शांत रहा. शहाण्यांनी दुर्जनांची एवढी दखल घेऊ नये. "

" होय भीमा, शांती हेच शूराचे भूषण होय " युधिष्ठिर म्हणाला.

" बरं तर. स्वस्थ होतो. " असं म्हणून भीम शांत राहिला.

परंतु दुर्योधनाच्या या दुष्ट डावामुळे कौरव-पांडवांच्या आप्तसंबंधात कटुतेला व वैराला प्रारंभ झाला, एवढे मात्र खरे.

■ ■

# विद्याध्ययन

एकदा कौरव आणि पांडव मैदानात खेळत होते. खेळ रंगात आला होता. खेळता खेळता त्यांचा कापडी चेंडू जवळच्याच एका विहिरीत जाऊन पडला. विहीर जुनी-पुराणी, खोल आणि पडीक होती. अंधारही तिच्यात खूप दाटलेला होता. चेंडू पडल्यामुळे खेळाचा बेरंग झाला. चेंडू काढणेही शक्य नव्हते. सारेजण खिन्न होऊन विहिरीजवळ उभे होते. तेवढ्यात एक वृद्ध तपोधन ब्राह्मण तिथून चालले होते: त्यांनी पाहिले नि विचारले,

" काय रे मुलांनो, काय झाले ? "

" अहो, आमचा चेंडू पडलाय विहिरीत, कसा काढावा तो कळत नाही ! "

" कोणाची तुम्ही मुले ? "

युधिष्ठिर पुढे झाला आणि त्याने, दुष्यंत, भरतापासून ते थेट पितामह भीष्मापर्यंतची आपल्या पूर्वजांची नावे मोठ्या अभिमानाने सांगितली. ती ऐकून तो ब्राह्मण म्हणाला,

" एवढ्या श्रेष्ठ कुलात जन्म घेतला तुम्ही, आणि एवढा चेंडू नाही काढता येत ? थांबा, पराक्रमी क्षत्रियांची मुले कशी युक्ती करतात हे मी दाखवतो तुम्हांला. "

आणि पटकन खांद्यावरचे धनुष्य काढून ब्राह्मणाने बाण सोडला; तो बरोबर विहिरीच्या तळाशी पडलेल्या चेंडूत घुसून बसला. पाठोपाठ दुसरा बाण सोडला, तो पहिल्या

बाणाच्या मागच्या टोकाला चिकटून बसला. तिसरा दुसऱ्याला चिकटला, असे सहा बाण सोडले. आणि सातव्या बाणाचे मागील टोक विहिरीच्या कट्ट्याजवळ आले. ते धरून ब्राह्मणाने सर्व बाण विहिरीबाहेर ओढले, तेव्हा पहिल्या बाणात रुतलेला चेंडू मिळाला! मुले खूष झाली. पळत पळत जाऊन त्यांनी ती हकिगत भीष्मांना सांगितली. त्यांनी त्या ब्राम्हणाचे धनुर्विद्येतील ज्ञान जाणले. गुणाची त्यांना कदर होती. ते चटकन उठले आणि ब्राह्मणाकडे निघाले. ब्राह्मण तोवर आपली वाट चालू लागला होता. भीष्मांनी ब्राह्मणाला गाठले. नमस्कार केला आणि विचारले, "माझ्या नातवांचा चेंडू आपणच काढून दिलात, होय ना?"

"होय महाराज. पण त्या एवढ्याशा कामासाठी जर तुम्ही काही मोबदला द्यायच्या उद्देशाने आला असाल तर स्पष्टच सांगतो, मला काही नको. मी काही घेणार नाही. मी तो माझा अपमान समजेन." ब्राह्मणाचे हे तेजस्वी बोलणे ऐकून भीष्मांनी हात जोडले. म्हणाले, "महाराज, मी आपल्याला काही देण्यासाठी आलो नसून एक भीक मागण्यासाठी आलो आहे."

"कसली?"

"महाराज, मी आपणाला ओळखतो. आपण ते सुविख्यात द्रोण धनुर्धर आहात. आपण माझ्या या मुलांना विद्या द्यावी. त्यांचे आचार्य बनावे. आपल्यापेक्षा दुसरा श्रेष्ठ गुरू त्यांना कोण मिळणार? महाराज, माझ्या प्रार्थनेचा स्वीकार करा."

प्रत्यक्ष प्रतापी भीष्मांनीच असे म्हटल्यावर द्रोणाचार्यांनाही नकार देणे अवघड झाले. त्यांनी कौरव–पांडवांना विद्या देण्याचे मान्य केले. पण त्याचबरोबर गुरुदक्षिणाही मागितली. द्रोणाचार्य म्हणाले, " मला गुरुदक्षिणा हवी, पण ती द्रव्यरूपाने वा अन्य कसल्या संपत्तीच्या रूपात नको आहे. "

" मग ? "

" द्रुपदाचा पराभव माझ्या शिष्यांनी करावा, हीच माझी गुरुदक्षिणा ! "

" आचार्य, द्रुपदावर आपला एवढा राग का ? "

भीष्मांनी विचारले.

द्रोणाचार्यांनी सांगितले, " माझ्या वडिलांच्याजवळ मी व द्रुपद शिक्षण घेत होतो. आम्ही दोघेही सहाध्यायी, वर्गबंधु. त्यावेळी हा मला म्हणायचा, द्रोणा माझे राज्य हे तुझेच राज्य. पुढे पित्याच्या सिंहासनावर हा बसला. राज्यकारभार पाहू लागला. मी माझ्या वडिलांची अध्ययन अध्यापनाची वृत्ती चालवू लागलो. माझ्या पेशाची गरिबी, दारिद्र्य सर्व परिचित आहेच. माझ्याही वाट्याला ते आले. इतके की पोटच्या लहानग्या अश्वत्थाम्यास आम्ही दूध देखील देऊ शकत नव्हतो. शेजारची बरोबरीची मुले दूध प्यायची. अश्वत्थामाही घरी आईजवळ ' दूध दे ' म्हणून हट्ट धरायचा. माझी पत्नी तांदळाचे पीठ पाण्यात कालवून त्याला द्यायची आणि अश्वत्थामा ते दूध म्हणून प्यायचा. पण लवकरच त्याला खऱ्या दुधाची चव कळली. तो संतापला. आईला म्हणाला,

'तू मला फसवलंस' शेवटी मी ठरवलं की, द्रुपदाकडे जावे आणि एखादी गाय आणावी. म्हणून एके दिवशी गेलो नि म्हणालो, मित्रा ! पण सत्तेने आणि ऐश्वर्याने धुंद झालेला द्रुपद मला म्हणाला, 'मूढा, तुझ्यासारख्या दरिद्री आणि निस्तेज भिक्षुकाबरोबर माझ्यासारख्या राजाची मैत्री होत नसते. माझ्या मित्रभावनेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या. भीष्मा, मला त्या उर्मट, सत्तांध द्रुपदला चांगला धडा शिकवतील असे शिष्य तयार करायचे आहेत."

"आचार्य, ही मुलं आपल्या स्वाधीन केली आहेत. हवं ते घडवा. त्यांचं सोनं करा !"

कौरव-पांडवांना द्रोणाचार्यांनी धनुर्विद्या, अश्वविद्या, गदायुद्ध, खड्गयुद्ध, रथसंचालन इत्यादि अनेक प्रकारचे शिक्षण दिले. भीम-दुर्योधन गदायुद्धात प्रवीण झाले, तर नकूळ, सहदेव खड्ग विद्या पारंगत झाले. अर्जुन विख्यात धनुर्धर बनला; शिवाय सर्व तऱ्हेची शस्त्रे आणि अस्त्रे त्याने एकाग्रतेने ग्रहण केली.

■ ■

# कर्णाची मानहानी

कौरव-पांडवांच्या बरोबर द्रोणाचार्यांचा अश्वत्थामा आणि राधेय-कर्ण देखील शिकत होता. कुंतीने डालीत मूल ठेवून ती नदीत सोडल्यानंतर ती डाली कौरवांच्या एका सूताच्या हाती लागली. सूताने ते मूल घरी नेले. त्याची बायको राधिका हिने त्या मुलाला सांभाळले. वाढवले. हाच कर्ण. अर्जुना-प्रमाणे हा देखील शस्त्रास्त्रविद्येत पारंगत झाला.

अध्ययन संपल्यानंतर द्रोणाचार्यांनी एके दिवशी सर्वांची परीक्षा घेतली. त्यांनी एका झाडाच्या फांदीवर एक मातीची चिमणी दोऱ्याने टांगली. सर्वांना सांगितले, " या चिमणीचा डोळा फोडायचा हे लक्ष्य आहे. "

तत्काळ एकेकाने धनुष्याला बाण लावले. बाण सोडण्या-पूर्वी द्रोणाचार्यांनी प्रत्येकाला विचारले, " काय दिसते आहे तुला झाडावर ? " कुणी म्हणत फांद्या, कुणी सांगत पाने. आभाळ, चिमणी, तर कुणी सांगे चिमणीच. शेवटी अर्जुनाची पाळी आली. त्याला विचारण्यात आले, " काय दिसते तुला ? "

" चिमणीचा डोळा, फक्त. " अर्जुनान उत्तर दिले.

" शाब्बास ! याला म्हणतात एकाग्रता. सोड बाण " द्रोणाचार्यांनी सांगितले. अर्जुनाने बाण सोडला. चिमणीचा डोळा फुटला ! अर्जुनाची प्रशंसा झाली.

एकदा हस्तिनापुरातील प्रतिष्ठित नागरिकांच्यापुढे कौरव-पांडवांच्या शस्त्रास्त्र विद्येचे प्रात्यक्षिक झाले. एकेकाने पुढे येऊन आपआपले प्रावीण्य दाखवले. अर्जुनाने तर कमाल केली. सर्वांनी त्याच्या धनुर्विद्येची प्रशंसा केली. विजयी अर्जुन हसत चालला होता, तेवढ्यात कर्ण पुढे येऊन म्हणाला, " थांब. अर्जुना ! मी देखील तुझ्यासारखे सर्व प्रयोग करून दाखवतो. " " शाबास कर्णा ! शाबास ! " अर्जुनाचे यश न रुचलेला दुर्योधन ओरडला. त्याने कर्णाला प्रोत्साहित केले. कर्ण हा त्याचा मित्र होता. कौरवांमध्येच तो वागत होता. कर्णाने अर्जुनाला द्वंद्वयुद्धाचेही आव्हान दिले. कर्ण शूरवीर योद्धा होता. भीम त्याला म्हणाला, " अर्जुन तुझ्याशी अवश्य युद्ध करील. पण द्वंद्वयुद्ध करणाराला परस्परांचे कुलगोत्र ठाऊक असावे लागते. अर्जुन कुरुकुलातील राजकुमार आहे, तुझे कुलगोत्र काय ? "

हा प्रश्न विचारताच कर्णाने मान खाली घातली. त्याने कोणाचे कुल सांगावे ? त्याची ही स्थिती पाहून दुर्योधन म्हणाला, " या क्षणापासून कर्ण हा अंगदेशचा राजा आहे." आणि राजमुकुट त्याच्या मस्तकी ठेवला. भीमाला म्हणाला, " आता तरी हरकत नाही ना ? "

यावर भीम कुचेष्टेने हसून म्हणाला, " अरे, असे दान देऊन राजा बनवला तरी सूतपुत्र तो सूतपुत्रच ! "

एका सूताने कर्णाला वाढवले होते, म्हणून भीमाने

कर्णाचा असा तुच्छतादर्शक उल्लेख केला. कर्णाला हा शब्द झोंबला. त्याला हा आपला मोठा अपमान वाटला. कौरव-पांडवांत यावरून बरीच चकमक उडाली. पण प्रसंगावधान राखून द्रोणांनी, " सूर्यास्त झाला. खेळ संपला " असे घोषित केले. सर्वजण आपल्या महाली परतले.

■ ■

# गुरुदक्षिणा

काही दिवस उलटले आणि एके दिवशी द्रोणांनी कौरव-पांडवांना म्हटले, “ वीरहो ! तुमचे अध्ययन पूर्ण झाले आहे. आता माझी गुरुदक्षिणा हवी. विसरला नाही ना ? ”

“ नाही आचार्य, आज्ञा द्या. तत्काळ पांचाल देशावर स्वारी करू आणि द्रुपदाला जिंकून आणू. ” दुर्योधन म्हणाला. अर्जुन, भीम, कर्ण-सर्व सिद्धच होते. कुरूंची सेना घेऊन द्रोणाचार्य निघाले. प्रथम कौरवांनी पांचाल देशावर हल्ला चढवला. द्रोण आणि पांडव मागे राहिले. द्रुपदाने आपली प्रचंड सेना सिध्द केली आणि तोही मोठ्या तयारीने रणांगणात उतरला. हा हा म्हणता त्याने दुर्योधन, कर्ण, दुःशासन यांना निःष्प्रभ केले. कौरवांची फजिती पाहताच द्रोणांनी पांडवांना पुढे होण्याची आज्ञा दिली. अर्जुनाने आपला रथ द्रुपदाच्या रथाशी भिडवला आणि थोड्या अवधीतच त्याला निःशस्त्र केले. पराभूत द्रुपदराजा असहाय होऊन गेला. तोवर भीमाने द्रुपदाच्या सेनेचीही दाणादाण करून टाकली होती. नंतर जिंकून घेतलेल्या द्रुपद राजाला पांडवांनी द्रोणापुढे आणून उभे केले. म्हटले, “ आचार्य, ही घ्या आपली गुरुदक्षिणा. ”

द्रोणांनी हसून म्हटले, “ शाबास वीरांनो ! ”

मग त्यांनी द्रुपदाला विचारले, “ ओळखलेस मला ? कसा ओळखशील ! मी दरिद्री भिक्षुक; तू राजा. ”

द्रुपद लज्जेने, पराभवाने खाली मान घालून उभा होता.

द्रोण म्हणाले, "द्रुपदा, आता तुझे राज्य माझे झाले आहे. मी राजा आहे, तू बंदी आहेस, तुझी काय इच्छा आहे."

द्रोणा, मी चुकलो आहे. सत्तेच्या धुंदीत मी गैरवर्तन केले. आता तू हवे तसे कर."

"द्रुपदा, तू मला मित्र म्हणावेस अशीच इच्छा आहे."

"मित्रा द्रोणा! तुला मित्र मानण्यात मला अभिमानच वाटेल."

"मित्रा द्रुपदा, तुझे अर्धे राज्य मी तुला परत देतो. अर्धे माझ्याकडे राहील. अर्जुना, द्रुपदराजाला माझ्या मित्राला बंधमुक्त कर!"

गर्वहरण झालेला द्रुपदराजा कष्टी मनाने परतला.

■ ■

# लाक्षागृहाचा भडका

पांडवांच्या पराक्रमाने दुर्योधन-दुःशासन आदि कौरवांना त्यांचा अधिकच मत्सर वाटू लागला. तशातच भीष्मांनी धृतराष्ट्राकडून युधिष्ठिराला यौवराज्याभिषेक करविला. हस्तिनापूरचे सिंहासन पांडवांच्याकडेच जाणार आणि आपण सत्ताहीन जगणार याचे शल्य कौरवांना सलू लागले. धृतराष्ट्रही पुत्रमोहाने पछाडला. आपल्यामागून आपल्या पुत्रांना राज्य मिळावे अशी त्याची इच्छा. त्याने कणिक नावाच्या मंत्र्याशी खलबत केले. कणिक हा कुटिल नीतीत तरबेज होता. त्याने सुचवले, " पांडवांना कुंतीसह वारणावत नगराला धाडावे आणि तिथे लाक्षागृहात राहायला सांगावे "

दुर्योधनाला ही योजना पसंत पडली. धृतराष्ट्राने युधिष्ठिराला बोलावून म्हटले, " काही दिवस तुम्ही भावंडांनी आपल्या मातेसह वारणावत नगरीस जाऊन विश्रांती घ्यावी अशी माझी इच्छा आहे. तिथे तुमच्यासाठी मी एक महालही बांधून घेत आहे. मजेने राहा. आनंदी व्हा ! "

युधिष्ठिराने वडिलांच्या इच्छेनुसार वारणावताला जाण्याचे मान्य केले. एका मुहूर्तावर ते निघालेही. महात्मा विदुर हे पांडवांचे चुलतेच होते. ते सत्चरित्र, बुद्धिमान, नीतिमान व धर्मशील वृत्तीचे होते. पांडव त्यांना मोठ्या आदराने वागवत. विदुरांचाही ओढा धर्मनिष्ठ पांडवांच्याकडेच होता.

कौरवांच्या कुटिल कारवाया त्यांना आवडत नसत. वारणावताला पांडवांना धाडण्याची कारवाई विदुरांच्या ध्यानी आली आणि ते चिंतातूर झाले. गुप्तहेराकडून सगळी माहिती त्यांनी मिळवली. पांडवांच्या निवासासाठी बनवलेला महाल हा लाखेचा व दारूसारख्या स्फोटक पदार्थांचा मुद्दामच बनवलेला आहे ते गुपित त्यांना कळले. त्यांनी मोठ्या चातुर्याने त्या महालातूनच एक भुयार एका कारागिराला फितवून तयार करून घेतले.

पांडवांना निरोप देण्यासाठी महात्मा विदुर त्यांच्या बरोबर बरेच दूर गेले. तिथे त्यांनी युधिष्ठिराला वारणावताला त्यांना धाडण्यामागचा दुष्ट हेतू सांगितला. लाक्षागृहाचे रहस्यही कानी घातले आणि आगीपासून वाचण्यासाठी भुयारी मार्गाची युक्तीही समजावून दिली. “ जपून जा बाळांनो ! सावध असा ! तुमचे मंगल होईल. ” असे बोलून विदुर परतले.

वारणावताला पोचल्यावर पांडवांना त्या लाक्षागृहात नेण्यात आले. सेवकांनी त्यांचे वरकरणी स्वागत उत्तम केले. दिवसभर पांडव तिथे आनंदाने राहिले. तेवढा भुयारी मार्ग गुपचुपपणे पाहून ठेवला. रात्र झाली, तसे सर्वजण भुयारीमार्गाने चालू लागले. भीमाने जाता जाता लाक्षागृह पेटवून दिले. थोड्याच अवधीत भडका उडाला आणि सारे लाक्षागृह जळून भस्म झाले.

सकाळी लाक्षागृहाची राख पाहून दुर्योधनाला फार आनंद

झाला. त्याची कल्पना अशी की, पांडव कुंतीसह रात्रीच जळून मेले. आता आपला मार्ग मोकळा झाला.

परंतु भुयारी रस्त्याने पांडव व कुंती सुखरूपपणे एका जंगलात येऊन पोचले होते.

■ ■

## हिडिंब व बकासुराचा वध

राजमाता असूनही कुंतीला अरण्यवास कंठण्याची पाळी आली. पांडव मातेसह जंगलात भटकू लागले. भटकता भटकता एकदा असाच एके ठिकाणी मुक्काम होता. तिथे हिडिंब राक्षसाची वसती होती. राक्षस हे जंगलचे रहिवासी. धिप्पाड, क्रूर व अमानुष वृत्तीचे असत. नरमांसभक्षकही असत. कुंती आणि पांडवांना पाहून हिडिंब राक्षसाच्या तोंडाला पाणी सुटले.

त्यासाठी हिडिंब राक्षसाने आपली बहीण हिडिंबा हिला पांडवांना मारण्यासाठी धाडले. हिडिंबादेखील तशीच भयंकर होती. ती आली त्यावेळी भीम पहारा करीत होता. भीमाचे अवाढव्य शक्तिशाली शरीर आणि राजबिंडे स्वरूप पाहून हिडिंबा त्याच्यावर मोहित झाली. तिने भीमाला मारण्याऐवजी आपल्या भावाच्या तावडीतून सुटका करण्यासाठी निघून जाण्याचीच गळ घातली. तेवढ्यात स्वतः हिडिंब राक्षसच तेथे आला. भीमाला पाहताच आरोळ्या ठोकतच त्याने त्याच्यावर हल्ला केला. परंतु भीमाने आपल्या अचाट शक्तीसामर्थ्याने हिडिंब राक्षसाला उचलून आदळून आदळून ठार केले. हिडिंबेला भीमापासून घटोत्कच नावाचा पुत्र झाला.

पुढे भ्रमंती चालू असतानाच पांडव एकचक्रा नगरीत गेले. तिथे एका ब्राह्मणाच्या घरी राहिले. ब्राह्मणाचे कुटुंब शोकसागरात बुडालेले होते. दुःखी होते. कुंतीने चौकशी केली तेव्हा कळले की, बकासूर नावाच्या राक्षसाला नगरीतून

रोज गाडाभर अन्न आणि एक मनुष्य खायला द्यावा लागतो. प्रत्येक घराला पाळीपाळीने हे पुरवावे लागते. दुसरे दिवशीच त्या ब्राह्मणाची पाळी होती आणि ब्राह्मणाचा तरणाताठा एका बळी द्यावा लागणार होता, म्हणून घरात शोक होता. हे ऐकून कुंतीला वाईट वाटले. तिने ब्राह्मण कुटुंबा धीर दिला.

भीमाला ही हकिकत सांगून कुंती म्हणाली, " जुलमी बकासुराचा बंदोबस्त करून टाक."

भीमाने ते काम खुषीने पत्करले. दुसरे दिवशी अन्नाने भरलेल्या गाड्यावर बसून भीमच बकासुराकडे गेला. जाताना गाड्यातील बरेचसे अन्न फस्त करून टाकले. गेल्यावर तेथेही बकासुराच्या देखत भीम भराभर अन्न भक्षण करू लागला. भुकेने व्याकुळ झालेल्या व अन्नाची वाटच पहात बसलेल्या बकासुराला भीमाचे हे कृत्य पाहून संताप आला ! त्याने भीमावर झेप घेतली, आणि त्याला तो मारू लागला. पण भीम डगमगला नाही. स्वस्थ बसून जेवला. सगळे अन्न संपवले. मग भला मोठा ढेकर देऊन बकासुराला म्हणाला, " आता तुझा समाचार घेतो."

आणि त्याने बकासुराच्या छातीवर बसून त्याला बुकलून मारले.

एकचक्रा नगरीतल्या लोकांना आनंद झाला. त्यांनी भीमाचे कौतुक केले. उपकार मानले.

■■

# द्रौपदी स्वयंवर

डव पुढे काही दिवस एकचक्रा नगरीतच राहिले. ाने संतुष्ट होऊन त्यांना त्याकाळात वेदविद्येची माहिती ी.

े दिवशी श्रीवेदव्यास तिथे आले आणि म्हणाले, “ नो, पांचाल देशी जा. तिथे यज्ञकन्या द्रौपदीचे स्वयंवर तिच्या पित्याने मांडले आहे. त्यात भाग घ्या. कौरवांच्या नाशासाठीच द्रौपदीचा जन्म आहे असे भाकित आहे.”

“तर मग आम्हाला गेलेच पाहिजे” अर्जुन म्हणाला. आणि एका मुहूर्तावर ब्राह्मणांचा वेष परिधान करून मातेसह पांडव पांचाल नगरीकडे निघाले.

जाता जाता वाटेत रात्र झाली. रात्री गंधर्व सरोवराच्या काठी क्रीडेसाठी येत असत. पांडवांना पाहून अंगारपर्ण गंधर्वाला राग आला. त्याने पांडवांवर बाणांचा वर्षाव केला. पण अर्जुनाने ते सर्व बाण अडवून धरले आणि आपले आग्नेयास्त्र सोडले. त्याबरोबर गंधर्वांचा रथ जळून गेला. गंधर्व शरण आला. कुंतीने त्याला सोडून देण्यास सांगितले, तेव्हा कृतज्ञता म्हणून गंधर्वाने अर्जुनाला, बसल्या ठायी त्रिभुवनातील कुठलाही प्रसंग पाहता येईल अशी चाक्षुसी विद्या दिली. पांडवांच्याच विनंतीवरून धौम्यऋषींच्या आश्रमाची वाटही दाखवली.

धौम्यऋषींनी पांडवांचा यथायोग्य सत्कार करून त्यांची इच्छा विचारली, तेव्हा युधिष्ठिर म्हणाला, "आमचे पौरोहित्य आपण स्वीकारावे अशी प्रार्थना आहे."

धौम्यऋषींनी त्यांची प्रार्थना आनंदाने मान्य केली व त्यांच्याबरोबरच ते पांचाल नगरीकडे निघाले.

स्वयंवरासाठी अनेक देशोदेशीचे राजेमहाराजे व राजकुमार आलेले होते. कृष्ण, बळरामही होते. स्वयंवराची सिद्धता मोठ्या थाटामाटाने केलेली होती. स्वयंवरासाठी एक पण देखील होता, पण असा होता की, एका स्तंभावर एक फिरता मासा बनवून ठेवलेला होता. स्तंभाखाली एक तेलाने भरलेली मोठी काहिली ठेवलेली होती. फिरत्या माशाचे प्रतिबिंब त्या तेलात उमटे. त्या प्रतिबिंबाकडे पाहून वरच्या फिरत्या माशाचा डोळा बाणाने विद्ध करायचा होता. हे जो करील त्यालाच द्रुपदकन्या द्रौपदी माळ घालणार होती.

जमलल्या राजांनी, राजकुमारांनी मत्स्यवेध करण्याचा प्रयत्न केला, पण सर्वजण अयशस्वी होऊन परतले. त्यात दुर्योधन, जयद्रथ, शकुनि हे देखील होते. सर्वांना पराभूत पाहून कर्ण उठला. धनुष्याला दोरी लावू लागला, पण द्रौपदी म्हणाली, "सूतपुत्राला मी वरणार नाही."

कर्ण अपमानित होऊन बसला.

मग ब्राह्मणांच्या थव्यातून अर्जुन पुढे आला. गुरुजनांना वंदन करून त्याने धनुष्याला बाण लावला, आणि क्षणार्धातच

माशाच्या नेत्राचा वेध केला. त्याचे अपूर्व कौशल्य पाहून सर्वजण चकित झाले. कोण हा? कोण हा? असे कुतूहल सर्वांच्या मुखी उमटले. मग सर्वांनाच कळले की हा मध्यम पांडव धनुर्धारी अर्जुन!

अर्जुन! म्हणजे पांडव जिवंत आहेत! द्रौपदीला आणि पांडवांच्या हितचिंतकांना आनंद झाला. दुर्योधनादी कौरवांचा मात्र जळफळाट झाला.

विजयी पांडव द्रौपदीला घेऊन अत्यानंदाने निवासस्थानी परतले. दारातूनच युधिष्ठिर म्हणाला, "माते, आम्ही विजयी झालो. अमूल्य रत्न आम्ही मिळवले आहे."

हे ऐकून कुंती आतूनच म्हणाली, "शाब्बास माझ्या बाळांनो! पाच भाऊ मिळून ते रत्न वाटून घ्या!" परंतु बाहेर येऊन पाहते तो द्रौपदीच्या रूपाने साक्षात स्त्री-रत्न उभे होते! कुंतीच्या तोंडून शब्द तर निघून गेला होता.

पांडवांनी मातेच्या आज्ञेनुसार वागण्याचे ठरवले. त्याकाळी बहुपतीत्वाची चालही काही जातीजमातींमध्ये रूढ होती. त्यानुसार द्रौपदी पाच पांडवांची पत्नी बनली.

• •

# इन्द्रप्रस्थ

लाक्षागृहाचे कुटिल कारस्थान अयशस्वी ठरले, पांडव जिवंत राहिले आणि त्यांनी द्रौपदीला जिंकून घेतले, या घटनेमुळे दुर्योधन अतिशय अस्वस्थ बनला होता. त्याच्या मनीच्या मत्सराचे निखारे आणखीनच धगधगले होते. धृतराष्ट्रही असाच जळफळत होता. पण भीष्म, द्रोण, विदुर आदि सज्जनांनी त्याला समजावून सांगितले की, " पांडवांना आता हस्तिनापूरला बोलावून घ्या आणि त्यांचे अर्धे राज्य त्यांना देऊन टाका. यातच शहाणपण आहे आणि न्याय देखील आहे. पांडवांचा सत्पक्ष आहे आणि श्रीकृष्ण त्यांचा सखा आहे. तेव्हा पांडवांचा पराभव किंवा नाश करणे शक्य नाही. या दुष्ट उद्योगात तुमचा मात्र विनाश होईल. "

दुर्योधनाला हे आवडले नाही. पण धृतराष्ट्राने, मनात नसतानाही, या योजनेला संमती दिली. पांडवांना हस्तिनापुरला सन्मानाने घेऊन येण्याची कामगिरी त्याने विदुरावरच सोपवली.

विपुल धन, अलंकार, वस्त्रे आणि गज, रथ आदी घेऊन विदुर पांडवांच्याकडे आला. एकमेकांच्या भेटीने एकमेकांना परम आनंद झाला. क्षेमकुशल, विचारपूस झाल्यावर विदुराने आपला हेतू सांगितला. श्रीकृष्ण, कुंती व श्वसुर द्रुपद राजा यांचा सल्ला घेऊन युधिष्ठिराने हस्तिनापूरला जाण्याचे ठरवले

आणि त्यानुसार पांडव कुंती व द्रौपदीसह हस्तिनापूरला आले.

धृतराष्ट्राने वरकरणी आनंद प्रदर्शित करून म्हटले, " युधिष्ठिरा, तुम्ही सुखरूप आहात हे पाहून आनंद झाला. आता मी अर्धे राज्य तुम्हाला देतो, ते घेऊन तुम्ही खाण्डव-प्रस्थात राहावे असे मला वाटते. "

" तात, जशी आपली आज्ञा. " युधिष्ठिर म्हणाला.

खाण्डवप्रस्थ म्हणजे निकृष्ट दर्जाची भूमी आणि आस-पास जंगलच्या जंगल होते. त्यात रानटी लोक व हिंस्र श्वापदे राहात होती. श्रीकृष्ण व अर्जुनाने ठरवले, या जंग-लाचे मंगल करायचे, त्यांनी सर्व जंगल जाळून भूमी सपाट केली. नंतर महर्षी वेदव्यासानी अन्य ऋषींसह येऊन राज-भवनासाठी शास्त्रानुसार विधीपूर्वक भूमी योजली. शांतीपाठ केला.

राजधानी उभारण्याच्या कामाला त्वरेने सुरवात झाली. विद्वान स्थापत्य शास्त्रज्ञ, अधिक्षक, कलाकार, चित्रकार, शिल्पकार नाना तज्ज्ञांनी येऊन सुरेख नगरी वसवली. घरे, गोपुरे, तलाव, उद्याने, रस्ते, वाटिका, क्रीडांगणे, पाठशाला, रंगशाला, चित्रशाला, सर्व सोयी उपलब्ध झाल्या. दूरदूरचे व्यापारी उदयी आले. नाना तऱ्हेची दुकाने, वखारी त्यांनी थाटल्या. नगरीच्या भोवती भक्कम तटबंदी, तटबंदीच्या बाहेर रुंद खंदक आणि तटबंदीच्या टेहळणी बुरुजांवर तशग्नी

तोफा सिद्ध ठेवून नगरीच्या संरक्षणाची पूर्तता करण्यात आली. नव्या नवलाईने नवी नगरी झगमगू लागली.

नंतर एका मुहुर्तावर वाजत गाजत पांडवांनी नगरीत प्रवेश केला. युधिष्ठिराने या आपल्या नव्या राजधानीचे नामकरण केले—इन्द्रप्रस्थ !

इन्द्रप्रस्थाहून पांडव राज्यकारभार पाहू लागले.

■ ■

# अर्जुनाचा वनवास

पाच पांडवांचे द्रौपदीशी लग्न झाल्यावर एकदा नारद-मुनींनी त्यांना नियम घालून दिले की पाचापैकी कोणीही एक आणि द्रौपदी एकांतात असताना दुसऱ्याने तिथे जाऊ नये; आणि गेल्यास त्याने बारा वर्षे वनवासाची शिक्षा भोगावी. सर्वांनी हे मान्य केले होते. त्याप्रमाणे वागत होते.

परंतु एके दिवशी अर्जुनापुढे धर्मसंकट उभे राहिले. एका ब्राह्मणाच्या गायी चोरटे धाकदपटशा दाखवून पळवून नेऊ लागले होते. गरीब असहाय्य ब्राह्मण तक्रार घेऊन अर्जुनाकडे आला. म्हणाला, " मला वाचवा. माझ्या गायींचे संरक्षण करा.

" घाबरू नकोस !" अर्जुनाने त्याला धीर दिला. धनुष्य-बाण घेण्यासाठी शस्त्रागारात गेला. पण त्यावेळी तिथे युधिष्ठिर व द्रौपदी विश्रांती घेत होते. अर्जुनाचा नाइलाज झाला होता. त्याने शस्त्रास्त्रे घेतली व बाहेर येऊन चोरट्यांचा पाठलाग केला. त्यांच्या हातून ब्राह्मणाच्या गायी सोडवल्या.

नंतर त्याने युधिष्ठिरापुढे येऊन आपला गुन्हा सांगितला. युधिष्ठिर म्हणाला, " प्रजासंरक्षण करण्यासाठी तुझ्या हातून उचित असे कर्तव्य घडले आहे. याबद्दल शिक्षा भोगण्याची गरज नाही. " परंतु अर्जुनाने ते मानले नाही. नियमाप्रमाणे तो ब्राह्मण-वेष धारण करून वनात निघून गेला.

निसर्गाची शोभा पाहत आणि तपोवनातून ऋषिमुनींशी ज्ञानचर्चा करीत करीत अर्जुनाने अनेक स्थळांना भेटी दिल्या. अनेक तीर्थक्षेत्री राहिला.

फिरता, फिरता तो नागप्रदेशात पोचला. तिथे कौरव्य नागाची कन्या उलुपी अर्जुनावर मोहीत झाली. उलुपीशी अर्जुनाने लग्न केले.

पुढे तो फिरत फिरत कलिंग देशातून समुद्रतटीच्या मणिपूर नगरीत गेला. तिथे त्याच्या दृष्टीस राजा चित्रवाहनाची कन्या चित्रांगदा पडली. अर्जुन चित्रांगदेवर मोहीत झाला. 'त्याने राजाकडे जाऊन मागणी घातली. राजाने आनंदाने दोघांचा विवाह लावून दिला. 'चित्रांगदेला' बभ्रुवाहन नावाचा मुलगा झाला. मणिपूर राज्याचा तो पुढे राजा झाला.

तिथून पुढे अर्जुन भ्रमंती करीत करीत गुजरात प्रदेशातील प्रभासतीर्थाला गेला. तिथे त्याची व श्रीकृष्णाची भेट झाली. अर्जुनाने आपल्या वनवासाची सर्व हकिकत श्रीकृष्णाला सांगितली. नंतर श्रीकृष्ण अर्जुनाला घेऊन द्वारकेस आला. येताना वाटेत दोघेही रैवतक पर्वतावर थांबले. त्यावेळी पर्वतोत्सव सुरू होता. पर्वत विविध प्रकारांनी शृंगारलेला होता आणि उत्तमोत्तम अलंकार व वस्त्रे परिधान करून द्वारकेतील स्त्रीपुरुष नागरिक तिथे आलेले होते. पर्वताची शोभा पाहात सर्वजण आनंदाने हिंडत होते. अर्जुनही नागरिकांच्या थव्यात सामील झाला होता. हिंडता हिंडता श्रीकृष्णाची बहिण सुभद्रा त्याच्या दृष्टीस पडली. दोघेही

परस्परावर अनुरक्त झाली. परंतु बलरामाने सुभद्रेचा विवाह दुर्योधनाशी ठरवलेला होता. बलराम हट्टी स्वभावाचा असल्यामुळे सरळ सांगण्याने तो ऐकणार नाही, म्हणून श्रीकृष्णाने अर्जुनाला त्रिदंडी संन्यास दिला. आणि त्याच्या मार्फत सुभद्रेचे हरण करविले. त्यानंतर अर्जुनाचा आणि सुभद्रेचा यथाविधी विवाह पार पडला. सुभद्रेला अभिमन्यु नावाचा तेजस्वी पुत्र झाला.

पाच पांडवांपासून द्रौपदीलासुद्धा पाच पुत्र झाले. युधिष्ठिराचा पुत्र प्रतिविंध्य, भीमाचा सुतसोम, अर्जुनाचा श्रुतकर्मा, नकुलाचा शतानिक आणि सहदेवाचा श्रुतसेन. हे पाचजण आणि सहावा अभिमन्यु असे हे पांडवांचे राजकुमार आपल्या पित्यांप्रमाणेच शस्त्रास्त्रविद्येत निपुण झाले पराक्रमी बनले.

वनवासाचा काळ संपल्यानंतर श्रीकृष्ण व अर्जुन इंद्रप्रस्थास असताना एके दिवशी अग्नी ब्राह्मणाचे रूप घेऊन त्यांच्या जवळ गेला आणि खांडव वन मागू लागला. अर्जुनाने व श्रीकृष्णाने त्याला ओळखले आणि खांडव वन देऊन त्याला संतुष्ट केले. अग्नीने तृप्त होऊन अर्जुनाला गांडीव धनुष्य, अक्षय भाता आणि कपिध्वज रथ या वस्तू दिल्या. श्रीकृष्णाला त्याने सुदर्शनचक्र दिले.

■ ■

# युधिष्ठिराचा राजसूय यज्ञ

इन्द्रप्रस्थ राजधानीत राहून आता एक तपाचा कालावधी उलटला होता. या अवधीत युधिष्ठिराने आपल्या बंधूंच्या साहाय्याने बराच राज्यविस्तारही केलेला होता. पांडव हे उत्तर भारतामधील एक श्रेष्ठ राजे म्हणून गणले जाऊ लागले होते. पांडवांचा कोषही द्रव्याने समृद्ध झालेला होता. प्रजा सुखी, आनंदी होती. अशावेळी युधिष्ठिराच्या मनात आले की, आपण राजसूय यज्ञ करावा.

त्याच सुमारास नारदमुनींची स्वारी इन्द्रप्रस्थास आली होती. युधिष्ठिराने त्यांना आपली इच्छा सांगितली तेव्हा नारदमुनींनीदेखील तिला अनुमती दिली व संभाव्य अडथळ्यावर श्रीकृष्णाशी बोलण्यास सांगितले. श्रीकृष्णानी जरासंधाचा बंदोबस्त केल्याशिवाय तुझा यज्ञ निर्विघ्नपणे पार पडणार नाही असे सांगितले. तेव्हा जरासंधाचा बंदोबस्त कसा करायचा हे युधिष्ठिराने विचारून घेतले. श्रीकृष्णाने त्याचाही मार्ग सांगितला.

जरासंध हा मगधचा महा प्रतापी राजा होता. त्याचा सर्वत्र दबदबा होता. त्याची सेना विशाल होती. अनेक राजांना त्याने आपल्या कैदखान्यात डांबलेले होते. त्यांच्या स्त्रियांनाही बंदी केले होते. कित्येक सज्जनांना अपमानित केले होते. अशा शक्तिशाली, जुलमी राजाशी

युद्ध करणे म्हणजे मोठा विनाश ओढवून घेण्यासारखे होते. म्हणून श्रीकृष्णाने सांगितले,

" युधिष्ठिरा, जरासंध मोठा पहिलवान आहे. त्याला कुस्तीचा षौक आहे. तेव्हा त्याला कुस्तीसाठी आव्हान देऊन त्याच्याशी लढले पाहिजे. या कामी आपला भीम समर्थ आहे. "

श्रीकृष्णाच्या सल्ल्यानुसार अर्जुन, भीम व स्वतः श्रीकृष्ण ब्राह्मणवेषाने जरासंधाकडे गेले व म्हणाले, " आम्हा तिघां-पैकी कोणाशीही कुस्ती खेळावी, असे आम्ही आव्हान देत आहोत. "

आव्हान न स्वीकारणे हे वीराला शोभत नाही; आणि आव्हान स्वीकारून कुस्ती करावयाची तर ती मोठ्या पहिल-वानाशी करावी; अशा विचाराने जरासंधाने भीमाशी कुस्ती खेळण्याची तयारी दर्शविली.

चौदा दिवस दोघांचे मल्लयुद्ध चालले होते. कुणीच कुणाला हार जात नव्हते. पण चौदाव्या दिवशी जरासंधाची पकड जरा ढिली पडली होती. हे लक्षात घेऊन श्रीकृष्णाने भीमाला एक वेगळा डाव खेळण्याची सूचना दिली. त्यानुसार भीमाने जरासंधाला उचलून दाणकन भुईवर आदळले, त्याच्या छातीवर बसून, सर्व ताकद एकवटून असे काही रगडले की जरासंधाचा प्राणच गेला.

तोवर मगधाच्या सरहद्दीवर पांडव सेना आलेली होतीच.

जरासंधाचा मृत्यू होताच त्याचे राज्य पांडवांच्या ताब्यात आले. त्यांनी कैदखान्यातील सर्व राजांना, स्त्रियांना, सज्जनांना मुक्त केले. त्या सर्वांनी व जुलमाखाली भरडून निघालेल्या प्रजाजनांनी पांडवांचा जयजयकार करून त्यांना आशीर्वाद दिले. नंतर जरासंधाचा पुत्र सहदेव याला मगधाच्या गादीवर बसवून श्रीकृष्ण अर्जुन व भीम यांच्यासह इंद्रप्रस्थास परत आले.

राजसूय यज्ञ करण्याचे निश्चित झाल्यावर त्यासाठी द्रव्य मिळविण्यासाठी व ठिकठिकाणच्या राजांना जिंकण्यासाठी अर्जुन, भीम, नकुळ व सहदेव निरनिराळ्या दिशांना गेले. त्यांनी चोहोंकडून दिग्विजय मिळवून, अपार धनराशी आणली.

राजसूय यज्ञाची सर्व सिद्धता झाल्यावर देशोदेशीच्या राजेरजवाड्यांना, ऋषीमुनींना, श्रेष्ठांना, इष्टमित्रांना निमंत्रणे गेली. त्यानुसार सर्वजण आले. हस्तिनापूराहून भीष्म पितामह, द्रोणाचार्य, अश्वत्थामा, विदुर, दुर्योधन, दुःशासन आदि सर्व कौरवबंधु देखील आले होते. युधिष्ठिरांनी त्या सर्वांचे स्वागत करून ज्याच्या त्याच्या योग्यतेनुरुप व्यवस्थाही ठेवली होती. दुर्योधनाकडे कोष सांभाळणे, दुःशासनाकडे भोजनव्यवस्था अशी काही काही जबाबदारीची कामेही कौरवांकडे आप्त मानून पांडवानी दिली होती. भीष्माचार्य व द्रोणाचार्य सर्व व्यवस्थेवर जातीने देखरेख ठेवीत होते.

श्रीकृष्णानी मात्र पंक्ती उठल्या म्हणजे पाने काढण्याचे काम आनंदाने स्वीकारले होते.

यथासांग यज्ञविधी पार पडला. अखेरीस अर्घ्य देण्याची वेळ आली तेव्हा प्रथम अर्घ्य कोणास द्यावे याविषयी युधिष्ठिराने पितामह भीष्मांचा सल्ला विचारला. भीष्म म्हणाले, " या ठिकाणी सर्व गुण ज्याच्यात एकवटलेले आहेत असा एकच नर श्रेष्ठ उपस्थित आहे आणि तो म्हणजे श्रीकृष्ण! त्याचीच प्रथम पूजा झाली पाहिजे."

सर्वांना, श्रेष्ठींनांही हे मान्य झाले.

युधिष्ठिराला व पांडवांना याहून आनंदाचा क्षण तो कोणता ?

पण शिशुपाल राजा मात्र या निर्णयाने संतापला. त्याने तावातावाने उठून श्रीकृष्ण, युधिष्ठिर, भीष्म यांची अर्वाच्य शब्दांत निंदानालस्ती सुरू केली, वृद्धजनांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला, पण उद्दाम शिशुपालाने कोणाचे ऐकले नाही. तेव्हा श्रीकृष्ण म्हणाले, " शिशुपालाची शंभर पापे आता भरलेली आहेत. मी त्याच्या मातेस, म्हणजे माझ्या आतेला, याची शंभर पापे भरेतोवर धक्का लावणार नाही असे वचन दिले होते. त्यानुसार मी आजवर वागलो आहे. या पाप्याने यादवांना पुष्कळच छळले आहे. आता याला त्याबद्दल शिक्षा देण्या शिवाय गत्यंतरच नाही." आणि एवढे बोलून श्रीकृष्णांनी आपले सुदर्शन चक्र सोडले.

शिशुपालाचे शीर धडावेगळे झाले. एवढा एक अपवाद वगळता राजसूय यज्ञाचा सोहळा अपूर्व थाटाने पार पडला. पांडवांचा यशोदुंदुभी दाहीदिशांना दुमदुमला, सर्वांनी त्यांचे अभिष्ट चिंतन केले.

महर्षि वेदव्यासांनी मात्र सावधानतेची सूचना देताना सांगितले, " बाळानो, तुमचे हे धवल यश व वैभव पाहून मी धन्य झालो आहे. तुम्ही कुळाचे भूषण आहात् परंतु एक गोष्ट लक्षात ठेवा की, एकाचे यश ही दुसऱ्याच्या मनात मत्सर निर्माण करणारी गोष्ट ठरू शकते. मत्सर, द्वेष, ईर्षा विनाशाच्या अंतिम टोकापर्यंत पोचू शकते. आपली उन्नता करीन असताना सत्याचा मार्ग सोडू नका व अनावश्यक रक्तपात होणार नाही याकडे पहा ! "

■■

# द्यूत

मय नावाचा एक श्रेष्ठ शिल्पकार होता. खांडव दाहाच्या वेळी तो अग्नीपासून बचाव करण्यासाठी पळू लागला. त्यावेळी अर्जुनाने त्याचा प्राण वाचवला होता. हे उपकार स्मरून मयाने इंद्रप्रस्थास युधिष्ठिरासाठी एक सभागृह बांधून दिले होते. या मयसभेची शोभा तर अपूर्वच होती पण कितीतरी गोष्टी चित्रविचित्र होत्या. स्फटिकांची जमीन पाण्यासारखी भासे. जिथे पाणी आहेसे वाटे तिथे जमीन असायची. यामुळे दुर्योधनाचीदेखील फजिती झाली.

राजसूय यज्ञानंतर दुर्योधन आणि त्याचा मामा शकुनी हे इंद्रप्रस्थासच राहिले होते. एके दिवशी पांडव व द्रौपदीसह दुर्योधन मयसभा पाहण्यासाठी हिंडत असता एके ठिकाणी पाणी समजून दुर्योधनाने वस्त्रे वर सावरून पाऊल टाकले. पण तिथे पाणी नसून जमीनच होती. त्याची ही फसवणूक पाहून भीम खदखदा हसला. पुढे तशीच जमीन असेल म्हणून दुर्योधन सरळ चालत गेला तर पाण्यात पडून त्याची वस्त्रे पार भिजली. त्याची ही फजिती पाहून द्रौपदी हसली. पुढे एके ठिकाणी दार समजून दुर्योधन जाऊ लागला तर भिंतीवरच आपटला. खो खो हसत भीम म्हणाला, “अंधबापाचा अंध पुत्र!” द्रौपदी तर हसतच होती. दुर्योधनास हा अपमान वाटला. त्यावेळी तो गप्प बसला. पण त्याचा स्वाभिमान दुखावला होता.

दुसरे दिवशी शकुनीबरोबर हस्तिनापुरात जाताना तो खूपच अबोल, उदास झाला होता. शकुनीने विचारले, " दुर्योधना ! असा उदास का ? काय झाले ? "

" मामा, जे झाले, पाहिले, ऐकले ते सुख देणारे आहे असे वाटते तुम्हाला ? काय या पांडवांचे हे ऐश्वर्य ! आम्ही हे मुकाट सहन करावे ? नाही मामा, नाही; हे सहन होत नाही. "

" खरे आहे तुझे दुर्योधना. "

" खरे आहे तर मामा पांडवांचे हे वैभव हिरावून कसे घेता येईल हे सांगा. त्यांच्याशी युद्ध करून त्यांना जिंकणे तर शक्य नाही. "

" छे ! युद्धाचा विचारच नको. "

" मग ? "

युक्तीनेच काम साधले पाहिजे " असे म्हणून शकुनीने सांगितले, " दुर्योधना, युधिष्ठिराला द्यूताचा शौक आहे. तेव्हा तुझ्या ताताकडून द्यूत खेळण्यासाठी त्याला हस्तिनापुरी बोलाव. पुढचे पाहू. "

शकुनीमामा खोटेपणाने द्यूत खेळण्यात पटाईत होता. तो वृत्तीने कपटी व दुष्ट इसम होता. दुर्योधनाला हेच हवे होते. मामाच्या शिकवणीप्रमाणे दुर्योधनाने धृतराष्ट्राकडे युधिष्ठिरास द्यूत खेळण्यासाठी निमंत्रण धाडण्यासाठी हट्ट धरला. पांडवांचा उत्कर्ष धृतराष्ट्रासही सहन होत नव्हताच. परंतु

वरवर आढेवेढे घेऊन त्याने विदुराचा सल्ला विचारला. विदुराने स्पष्टपणाने या गोष्टीला विरोध केला. हे चांगले नाही, यातून अनर्थ ओढवेल हेही परोपरीने सांगितले. पण दुर्योधनाच्या हट्टामुळे धृतराष्ट्रही हा सल्ला मानण्याच्या अवस्थेत नव्हता. पुत्रप्रेमामुळे तो आणखी आतूनही अंध बनलेला होता. त्याने विदुरालाच क्रीडेशी कपटाचा संबंध जोडू नये. प्रत्येक गोष्टीत हीन पाहू नये असा उपदेश केला व युधिष्ठिराकडे द्यूताचे निमंत्रण देऊन धाडले.

निमंत्रण मिळाले त्याचवेळी विदुराप्रमाणे पांडवांनाही कौरवांच्या हेतूविषयी शंका आली. द्रौपदी, भीम, अर्जुन यांनी द्यूत खेळण्यास जाऊ नये असेच मत मांडले. परंतु धृतराष्ट्राकडून निमंत्रण आल्यामुळे "तातांची इच्छा मानलीच पाहिजे. शिवाय क्षत्रियांनी द्यूताचे निमंत्रण नाकारणे योग्य नव्हे" असा विचार युधिष्ठिराने मांडला; आणि सर्वांनी हस्तिनापूरला जाण्याचे ठरवले.

द्यूत खेळण्यास आरंभ झाला. पण शकुनी ठरल्याप्रमाणे काही तरी खोटारडेपणा करीत होता व डाव पांडवांवर उलटवीत होता. युधिष्ठिर अनेक डाव हरला. सर्व धन-संपत्ती, राज्य, दास, दासी, भाऊ व अखेरीस स्वतःसही युधिष्ठिराने पणास लावले. पण दरवेळी तो डाव हरला. सर्व गेले, तरी डाव संपेना, म्हणून शेवटी द्रौपदीसही त्याने पणाला लावले. तोही डाव दुर्योधनाने जिंकला. द्रौपदीसह

पांडव कौरवांचे दास झाले. दुःशासनाने द्रौपदीचे केस धरले. आणि भर सभेत तिला फरफटत आणले. द्रौपदीच्या अंगावरील वस्त्रासही त्या दुष्टाने हात घातला. लज्जारक्षण करणारे आपले पाच पती हतबल ठरलेले पाहून द्रौपदीने श्रीकृष्णाचा धावा मांडला. श्रीकृष्णाने अदृश्य राहून द्रौपदीला वस्त्रे पुरविली आणि तिची लज्जा राखली. कौरवांचे हे असभ्य वर्तन पाहून विदुरासारखे सज्जन सभेतून उठून गेले. भीष्म, द्रोण खाली मान घालून बसले. द्रौपदीची विटंबना ऐकून गांधारीचे मन द्रवले. तिने पतीला हा हीन प्रकार थांबविण्याची विनंती केली. तेव्हा धृतराष्ट्राने दुर्योधनाला आवरले. पांडवांना जावयास सांगितलेः जाता जाता द्रौपदीने प्रतिज्ञा केली की, "ज्या हाताने दुःशासनाने माझे केस ओढले त्याच्या रक्ताने ते माखल्याशिवाय मी वेणी घालणार नाही.

ही प्रतिज्ञा ऐकताच इतका वेळ क्रोध गिळून बसलेला भीम गरजला, "द्रौपदी, तुझी प्रतिज्ञा मी पुरी करीन. दुःशासनाच्या रक्ताने तुझे केस माखीनच पण या दुष्ट दुर्योधनाची मांडीदेखील माझ्या गदेच्या प्रहाराने फोडून टाकीन."

पांडव गेले, पण त्यांच्या या भीषण प्रतीज्ञांनी दुर्योधन हादरला. अर्धवट राहिलेला डाव आवरावा लागला म्हणून तो आपल्या मातेवर व पित्यावरही रागावला. दुर्योधनाने खाणेपिणे सोडले. तो आजारी पडला. दिवसेदिवस खंगत

चालला. ह्या वार्तेने धृतराष्ट्राला मोठी काळजी वाटू लागली. पुत्रमोहाने त्याने पुनः युधिष्ठिराला द्यूतासाठी निमंत्रण केले आणि या निमंत्रणामागील कपटबुद्धीची जाणीव असूनही वडिलांची आज्ञा मानण्याचे युधिष्ठिराने ठरवले. तो धर्मराजच होता खरोखर! पुनश्च पांडव हस्तिनापूरला गेले. यावेळी दुष्ट शकुनी म्हणाला, "युधिष्ठिरा, एकच डाव खेळायचा. पण शर्त अशी की जर तू हा डाव हरलास तर तुम्ही पांडवांनी सर्व राज्यवैभव सोडून, वल्कलं परिधान करून बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास भोगावा. अज्ञातवासात जर कौरवांनी तुम्हाला शोधून काढले, तर पुनः बारा वर्षे वनवास भोगावा."

युधिष्ठिराने ही अट मान्य केली. द्यूताचे फासे टाकले आणि दुर्दैव उभे राहिले. युधिष्ठिराचा पराभव झाला.

पांडवांनी राजवैभवाचा त्याग केला. वल्कलं परिधान केली. कुंतीला विदुराकडे ठेवले आणि द्रौपदीसह ते वनवासात निघाले.

दुर्योधन, दुःशासन, आदि कौरवांना आणि कर्ण, शकुनी, आदि त्यांच्या हितचिंतकांना पांडवांची ही दुर्दशा पाहून आनंदी आनंद झाला.

■ ■

# वनवासात

पांडव वनवासात निघाले याचे दुःख त्यांच्या प्रजाजनांना मात्र फार झाले. किती तरी लोक स्वसुखाचा त्याग करून पांडवांच्या बरोबर वनवासालाच निघाले. युधिष्ठिराने त्यांची समजूत काढून त्यांना परत धाडले. पांडवांचे इष्टमित्र, राजे-महाराजे, नातेवाईक हे सुद्धा पांडव वनवासाची वार्ता कळताच त्यांना भेटण्यासाठी रानावनात आले. सर्वांचे प्रेम पाहून युधिष्ठिराचे ऊर भरून आले. पांचाल नगरीहून द्रौपदीचा भाऊ धृष्टद्युम्न आला आणि द्वारकेहून श्रीकृष्णही आले. पांडवांना व द्रौपदीला श्रीकृष्णाच्या भेटीने विशेष आनंद झाला. वनवासातही श्रीकृष्णाच्या धीराच्या व पाठींब्याच्या प्रेमळ शब्दांनी सुख वाटले. परत जाताना धृष्टद्युम्नाने द्रौपदीच्या मुलांना आपल्याबरोबर नेले. श्रीकृष्णांनीही सुभद्रेला व अभिमन्युला नेले. द्रौपदी म्हणाली, "पतींच्याबरोबर मीही हालअपेष्टा काढणार, दुःख सोसणार!"

काम्यक वनातून नंतर पांडव द्वैत वनात राहण्यास गेले. लहानशी कुटी बनवून ते राहत असत. कंद, फळ, मूळ या वनात उपलब्ध असणाऱ्या अन्नावर ते निर्वाह करीत असत.

दिवस असे चालले होते. एकदा बोलता बोलता द्रौपदी म्हणाली, "कौरवांनी जे दुष्कृत्य आपल्याशी केले आहे त्याचा सूड आपण उगवला पाहिजे."

यावर धर्मराज युधिष्ठिर म्हणाला, "क्षमा हे वीराचे भूषण आहे. वैऱ्यालाही क्षमा करावी."

परंतु द्रौपदीचे याने समाधान झाले नाही. भीमाचे बाहू तर स्फुरण पावत होते. त्याच वेळी महर्षी वेदव्यास तेथे आले. व्यासांनी त्या सर्वांचे बोलणे ऐकून घेतल्यावर ते म्हणाले.

"अर्जुनाने देवांची अस्त्रे मिळवावीत म्हणजे त्यायोगे कौरवांचा पराभव होऊ शकेल. वृत्रासुराच्या भयाने देवांनी आपली अस्त्रे इंद्राजवळ ठेवलेली आहेत. तपश्चर्येच्या बळावर ती अर्जुनाने हस्तगत करावीत."

श्रीवेदव्यासांच्या उपदेशानुसार अर्जुन लवकरच तपश्चर्येसाठी इंद्रनील पर्वतावर गेला. त्याचे तप पाहून इंद्राने विचारले, "कशासाठी हे तप करीत आहेस?"

अर्जुनाने सांगितले, "ज्या दुष्टांमुळे माझ्या कुटुंबियांना वनवास भोगावा लागत आहे, त्या दुष्टांचा मला सूड घ्यायचा आहे."

इंद्राने मग अर्जुनाला शंकराला प्रसन्न करून घे, असे सांगितले. अर्जुनाने हिमालयात जाऊन तपश्चर्या आरंभिली. त्या काळात एके दिवशी भला मोठा रानडुक्कर सूळ परजून अंगावर धावून येत आहे असे त्याला दिसले. अर्जुनाने लगेच एक बाण त्याच्यावर सोडला. त्याच वेळी शंकरानेही किरात पारध्याचे रूप घेऊन दुसऱ्या दिशेने त्या रानडुक्क-

राला बाण मारला. मग ही शिकार कोणाची यावरून अर्जुन व किरात या दोघांत वादावादी झाली व शेवटी युद्धाची पाळी आली. अर्जुनाचे धैर्य, धाडस व नैपुण्य पाहून श्रीशंकर प्रसन्न झाले. त्यांनी अर्जुनाला पाशुपत नामक अस्त्र दिले.

त्यानंतर इंद्रदेवाकडे अर्जुन काही काळ राहिला. या अवधित इंद्रानेही अर्जुनाला काही अस्त्रे दिली. अर्जुन इंद्राचा प्रिय झाला. इंद्र द्रष्टा असल्यामुळे त्याने अर्जुनाला संगीत व नृत्य कलाही शिकून घेण्यास सांगितले. चित्रसेन गंधर्वापासून अर्जुनाने त्या कला साध्य केल्या.

पांडवांनीही इकडे लोमस ऋषींच्या बरोबर भारतामधली सगळी तीर्थक्षेत्रे हिंडून पाहिली. बद्रीकेदारजवळून जाताना एका विशिष्ट कमळांचा सुवास वाऱ्याच्या झुळकीबरोबर द्रौपदीला आला. तिने त्या कमळांची इच्छा प्रकट केली. भीम ती कमळे आणण्यासाठी निघाला. वाटेत त्याला बलभीम मारुतीराया भेटला. दोघांचे संभाषण झाले. हनुमंताने अर्जुनाच्या रथावर बसण्याचे मान्य केले. ती कमळे असलेले कुबेराचे तळेही दाखवले. ते गंधमादन पर्वताजवळ होते. तळ्याची रखवाली काही राक्षस करीत होते. भीमाने त्यांच्याशी लढून त्यांना ठार केले. हे वर्तमान कळताच स्वतः कुबेर तेथे आला आणि भीमाला ओळखून त्याने आपल्या तळ्यातली कमळे दिली !

■ ■

# आम्ही एकशे पाच

पांडव वनवास भोगीत असतानाही त्यांना त्रास द्यावा, त्यांचा छळ करावा अशी बुद्धी दुर्योधनाला झाली. त्याने कर्ण, शकुनी यांच्याशी मसलत केली. शकुनीने द्वैतवनातील आपले गौळीवाडे पाहाण्याच्या मिषाने तेथे जावे असे सुचविले. दुर्योधनाने धृतराष्ट्राकडे तसाच बहाणा केला. आणि काही सैन्य घेऊन कौरव द्वैतवनात आले. बरोबर आपल्या स्त्रियांनाही घेऊन गेले. पांडवांना हिणवावे अशी त्यांची बुद्धी.

त्याच वेळी तेथील एका सरोवराच्या काठी चित्रसेन गंधर्व अप्सरांच्यासह जलक्रीडा करीत होता. दुर्योधन सरोवराकडे निघाला तेव्हा त्याला अडवण्यात आले. दुर्योधनाला याचा राग आला. त्याने चित्रसेन गंधर्वाला युद्धाचे आव्हान दिले. प्रथम काही सैन्य घेऊन कर्ण, दुःशासन चालून गेले; परंतु गंधर्वाने त्यांचा धुव्वा उडवला. नंतर दुर्योधन मोठ्या आढ्यतेने राहिलेले सैन्य घेऊन गेला. पण गंधर्वाने गांधर्यांला सोडून त्या सर्वांना बद्ध करून टाकले. दुर्योधन, दुःशासन, शकुनी आणि कौरववीरांची मोठी दयनीय स्थिती झाली. त्यांची ही केविलवाणी अवस्था पाहून कौरवसेनेतील चार-सहा सैनिक कसाबसा जीव वाचवून, नजर चुकवून धावत सुटले, ते जवळच राहात असलेल्या युधिष्ठिराकडे आले.

त्यावेळी युधिष्ठिर यज्ञ करण्यात मग्न झालेला होता. ते सैनिक आले आणि यज्ञवेदीवरच युधिष्ठिराच्या पायाशी लोळण घेऊन सांगू लागले, "महाराज, आता आपल्याशिवाय कुरूकुलाची अब्रू वाचणे शक्य नाही. गंधर्वांनी दुर्योधन, दुःशासन आदि कौरवांच्या मुसक्या बांधल्या आहेत. कर्ण पळून गेला आहे. कौरवांच्या स्त्रियांही गंधर्वांच्या बंदित अडकल्या आहेत."

जवळच भीम बसलेला होता. त्याने हे ऐकले आणि हर्षभरित होऊन तो मोठ्याने हसत सुटला. म्हणाला, "छान झाले! बरे झाले! कौरवांची चांगली जिरली. दुष्टांना असेच शासन व्हायला पाहिजे."

भीमाला आनंद झाला, पण युधिष्ठिराला दुःख झाले. तो भीमाला म्हणाला, "बाबारे! दुष्ट झाले, वैरी झाले तरी कौरव आपले भाऊ आहेत. त्यांना कोणी येतो नि मुसक्या बांधून नेतो हे आपल्याला, आपल्या कुलाला भूषणावह नाही. मात्र त्यांचा तसा आपलाही अपमान आहे. कुलाची प्रतिष्ठा आपण राखली पाहिजे. अरे, एरवी आपसात भांडताना पांडव पाच विरूद्ध कौरव शंभर असे आपण लढू. झगडू. पण परकीयांशी दोन हात करताना आम्ही एकशे पाच आहोत, हे शत्रूला आपण दाखवून दिले पाहिजे. मी यज्ञकर्मात गुंतलो आहे. नाहीतर मीच गंधर्वांशी लढण्यास आलो असतो. परंतु तुम्ही भाऊ समर्थ आहात. भीमा जा गंधर्वांना आपल्या बलाचा प्रभाव दाखव नि कौरवांना मुक्त कर.'

युधिष्ठिराच्या आज्ञेप्रमाणे भीम, अर्जुन, नकुल, सहदेव गंधर्वांशी लढण्यास गेले. अर्जुनाने आपल्या अस्त्रविद्येच्या बळावर चित्रसेन गंधर्वाला घेरले. अर्जुनाचा पराक्रम पाहून गंधर्व शरण आला. त्याने अर्जुनाच्या सांगण्यावरून दुर्योधन, दुःशासन आदि कौरवांना व त्यांच्या स्त्रियांना मुक्त केले. अपमानित व फजित झालेले कौरव खाली मान घालून गेले.

■ ■

# सत्त्वपरीक्षा

पांडवांना हिणविण्यासाठी गेलेल्या दुर्योधनाला आणि त्याच्या कैवाऱ्यांना फजित होऊन यावे लागले, याचे दुःख दुर्योधनाला अतिशय झाले. त्याच्या ठायीचा पांडवद्वेष आणखीनच वाढला. पांडवांचे काहीही भले त्याला खपेनासे झाले होते. पांडवांचे वाईट करण्याची संधी तो सोडत नव्हता.

एके दिवशी दुर्वास आपले बरेचसे शिष्य घेऊन दुर्योधनाच्या दरबारात गेले. दुर्योधनाने त्यांचा व त्यांच्या सर्व अनुयायांचा मोठा सत्कार केला. भोजन दिले. दुर्वास ऋषी संतुष्ट झाले. म्हणाले, 'कौरवेश्वरा, मी तृप्त झालो आहे. वर माग.'

दुर्वास तापट स्वभावाचे ऋषी होते. त्यांच्याकडूनच पांडवांना त्रास द्यावा. या उद्देशाने कर्ण व शकुनी यांच्या सल्ल्याने दुर्योधन म्हणाला, "मुनीवर्य, आपण आपल्या सर्व अनुयायांसह पांडवांच्याकडे जावे आणि भोजन मागून त्यांचे सत्त्व हरण करावे अशी इच्छा आहे."

"ठीक आहे!" दुर्वासांनी कबूल केले. आणि एके दिवशी बराच मोठा शिष्य समुदाय घेऊन, जेवणवेळ टळून गेल्यावर मुद्दाम-दुर्वास पांडवांच्याकडे गेले. त्यावेळी पांडव आणि द्रौपदी जेवणे उरकून सहज गप्पा मारीत बसलेली होती. दुर्वास आलेले पाहून युधिष्ठिराने त्यांचे स्वागत केले. दुर्वास म्हणाले, "नदीवर जाऊन स्नानसंध्या उरकून येतो तोवर

भोजनाची सिद्धता करा."

दुर्वास आपल्या शिष्यांसह नदीकडे गेले. इतक्या लोकांचे भोजन तयार करण्याइतके सामान जवळ नव्हते. द्रौपदीला काळजी पडली. तीने मनोमनी श्रीकृष्णाचा धावा मांडला. तीचा धावा ऐकून श्रीकृष्ण तत्काळ आले. म्हणाले, "द्रौपदी, मला भूक लागली आहे. काही तरी जेवायला वाढ."

"श्रीकृष्णा, माझी परीक्षा तूही पाहातोस काय? घरात काही नाही. तुला सगळं ठाऊकच आहे, सत्त्व जाऊ नये म्हणून तुला मी हाक दिली. थाळी धुऊन ठेवली आहे."

"पाहा तरी थाळीत काही असेल." श्रीकृष्ण म्हणाले. द्रौपदीने पालथी घातलेली थाळी आणली. थाळीला भाजीचे एक पान चीकटून राहिलेले होते. श्रीकृष्णांनी तेवढेच पान खाऊन तृप्तीची ढेकर दिली.

दुर्वासांनी घातलेले कोडे श्रीकृष्णाला उमगलेले होते. त्यामुळे नदीवर स्नानासाठी गेलेल्या दुर्वास ऋषींना आणि त्यांच्या सर्व शिष्यमंडळींना आकंठ भोजन केल्याप्रमाणे ढेकरा येऊ लागल्या. हा काय प्रकार आहे, हे त्यांना कळेना. पोट तर इतके भरलेले होते, की पांडवांच्याकडे जाऊन काय जेवायचे?

जेवणाचा विचार तसाच सोडून दुर्वास ऋषी आणि त्यांची शिष्यमंडळी नदीवरून परस्परच निघून गेली.

अशा प्रकारे श्रीकृष्णांनी सत्त्व राखले, म्हणून पांडवांना आनंद झाला. ■ ■

# द्रौपदी-हरण

दुर्वास ऋषिंच्यामार्फत पांडवांचे सत्त्व हरण करण्याचा प्रयत्न फसल्यावर दुर्योधन मत्सराने अधिकच जळफळू लागला. त्याला द्रौपदीचा तर फारच राग येई. म्हणून द्रौपदीची विटंबना करण्याची संधी तो सोडीत नसे.

एकदा दुर्योधनाचा मेहुणा जयंद्रथ त्याच्याकडे आला होता. बोलता बोलता दुर्योधनाने जयंद्रथाला सांगितले की पांडवांच्या वनवासाची बारा वर्षे आता लवकरच भरतील. पांडव अज्ञातवास संपवून परत येतील. राज्यावर हक्क सांगतील. तेव्हा त्यांना त्या आधीच दूर केले पाहिजे. जयंद्रथालाही पांडवांच्याबद्दल असूया वाटत असे, शिवाय दुर्योधन राज्यावर असणे हे त्याच्या दृष्टीने हीताचेच होते. म्हणून तो दुर्योधनाला म्हणाला.

" मी वनात जातो. पांडवांचा शोध घेतो आणि जे काही करता येईल ते करतो. "

दुर्योधनाला आश्वासन देऊन जयद्रथ द्वैत वनात गेला. पांडवांच्या आश्रमाजवळ आला. त्यावेळी पाचही पांडव शिकारीसाठी दूर अरण्यात गेलेले होते. आश्रमात द्रौपदी एकटीच होती. जयद्रथाने आश्रमात घुसून द्रौपदीला आपल्या-बरोबर येण्याविषयी अनेक आमिषे दाखविली. तो म्हणाला,

" तू जर माझ्याबरोबर आलीस तर मी तुला माझी पट्टराणी करीन."

द्रौपदी संतापाने म्हणाली, " जयद्रथा आपली पायरी सोडू नकोस. पाच पांडव जिचे पति आहेत, त्या द्रौपदीशी तू बोलतो आहेस हे लक्षात ठेव ! तू काय मला राणी करणार ? "

द्रौपदीचे हे हेटाळणीचे बोलणे ऐकून जयद्रथाला राग आला. त्याने द्रौपदीला धरून ओढले आणि आपल्या रथात जबरदस्तीने बसवून आपला रथ पिटाळला. द्रौपदीन आकांत मांडला. तो ऐकून शिकारीहून परत येत असलेल्या पांडवांनी जयद्रथाला जाऊन गाठले. भीमार्जुनाला पाहाताच जयद्रथाने द्रौपदीला रथातून खाली सोडले व स्वतः जीव घेऊन पळू लागला.

परंतु भीमाने त्याला पकडले आणि बांधून युधिष्ठिरापुढे उभे केले. द्रौपदी म्हणाली, या " नीचाने माझे केस धरून जबरदस्तीने मला रथात बसविले ! या नराधमाचे ते पापी हात तोडा. " यावर युधिष्ठिर म्हणाला, " हा पापी दंडनीय आहे, परंतु आपल्या दृष्टीने अवध्य आहे, कारण हा आपला नातेवाईक आहे. आपला बंधू दुर्योधन याचा हा मेहुणा आहे, म्हणून याला क्षमा करून सोडून द्या ! "

युधिष्ठिराच्या आज्ञेवरून भीमाने जयद्रथाला सोडून दिले.

मुक्त झाल्यावर जयद्रथाला पांडवांच्याविषयी अधिकच द्वेष वाटू लागला. पांडवांचा नाश करण्याच्या उद्देशाने त्याने हिमालयावर जाउन कठोर तपश्चर्या केली. त्याच्या तपाने संतुष्ट होउन महादेवांनी, अर्जुनाखेरीज बाकीच्या पांडवांना तू एक दिवशी जिंकशील असा वर दिला.

■ ■

# युधिष्ठिराची धर्मपरीक्षा

एके दिवशी पांडव रानावनातून हिंडत असता युधिष्ठिराला तहान लागली. म्हणून त्याने सहदेवाला जवळच्या सरोवराचे पाणी आणण्यास सांगितले. सहदेव वडील बंधूंची आज्ञा ऐकून लगबगीने सरोवराकडे गेला. सहदेवालाही तहान लागलेली होतीच. पाणी पिण्यासाठी म्हणून तो खाली वाकला. तोच कुठून तरी गंभीर आवाज आला,

“थांब!”

सहदेवाने चकीत होऊन आजुबाजूला पाहिले. नंतर विचारले.

“कोण मला थांबवीत आहे?”

“मी यक्ष. हे सरोवर माझे आहे. माझ्या प्रश्नांची उत्तरे दे आणि मगच पाण्याला स्पर्श कर.”

परंतु सहदेवाने तिकडे दुर्लक्ष केले आणि ओंजळीत पाणी घेतले. त्याबरोबर तो मूर्च्छित पडला.

बराच वेळ होऊन गेला. सहदेव पाणी घेऊन आला नाही म्हणून युधिष्ठिराने नकुलास तिकडे पाठवले. नकुलाचीही तीच अवस्था झाली.

नकुलाच्या पाठोपाठ भीम आणि अर्जुनाची तीच गत झाली. एकापाठोपाठ गेलेले चारही भाऊ परत आले नाहीत

असे पाहून युधिष्ठिर स्वतः सरोवराच्या काठी आला. तेथे नकुल, सहदेव, भीम, अर्जुन हे मूर्च्छित पडलेले पाहून त्याला आश्चर्य वाटले आणि दुःखही झाले. सरोवरातील पाणी घेण्यासाठी तो वाकला तेव्हा तोच गंभीर आवाज त्याच्या कानी आला, "थांब!"

चकित होऊन युधिष्ठिराने विचारले,

"का?"

"मी यक्ष आहे. हे सरोवर माझे आहे. माझी अवज्ञा केल्यामुळेच तुझ्या भावांवर मूर्च्छित होण्याची पाळी आलेली आहे."

"कसली अवज्ञा?"

माझ्या प्रश्नांची त्यांनी उत्तरे दिली नाहीत. जो माझ्या प्रश्नांची उत्तरे देत नाही. त्याला या सरोवराच्या पाण्याला स्पर्श करता येत नाही." यक्ष म्हणाला.

"हे यक्षा, तू मला प्रश्न विचार. मी प्रश्नांची यथामति उत्तरे देतो!"

यक्षाने विचारले, "सनातन धर्म कोणता?"

"मोक्ष धर्म."

"कीर्ती कशाने मिळते?"

"दान केल्याने."

"स्वर्गप्राप्ती व सुख यांचे साधन कोणते?"

" सत्य आणि शील. "

" पृथ्वीहून अधिक श्रेष्ठ काय ? "

" माता. "

" आकाशाहून अधिक उंच कोण ? "

" पिता. "

" वायुहून अधिक वेगवान कोण ? "

" मन. "

" पैसा मिळविण्याचे उत्तम साधन कोणते ? "

" सरळ आणि जपून केलेला व्यवहार. "

" धनामध्ये उत्तम धन कोणते ? "

" विद्या. "

" लाभामध्ये उत्तम लाभ कोणता ? "

" आरोग्य. "

" सुखात उत्तम सुख कोणते ? "

" संतोष. "

" सर्वांत श्रेष्ठ धर्म कोणता ? "

" दया. "

" कोणाशी मैत्री करावी म्हणजे ती बिघडणार नाही ? "

" सज्जनांशी. "

" काय सोडल्याने मनुष्य सर्वांना प्रिय होतो ? "

" अभिमान. "

" कशाचा त्याग केल्याने मनुष्य सुखी होतो ? "

" लोभ. "

" साधु कोण ? "

" सगळ्यांच्या हितासाठी अहोरात्र झटणारा. "

अशा प्रकारे यक्षाने अनेक तऱ्हेचे प्रश्न विचारले आणि युधिष्ठिराने त्यांची समर्पक उत्तरे दिली. यक्ष प्रसन्न झाला. हा यक्ष म्हणजे यमधर्मच होता. युधिष्ठिराने प्रसन्न झालेल्या यक्षाकडून आपल्या चारही भावांना उठविले. नंतर, ' आमच्या वनवासाची बारा वर्षे आता पुरी झालेली आहेत. या पुढचा एक वर्षाचा अज्ञातवासाचा काळही व्यवस्थितपणे पार पडावा, असा आपण वर द्यावा. ' अशी युधिष्ठिराने विनंती केली.

यक्ष म्हणाला, " तथास्तु ! "

■ ■

म. ग्रं. ... ग्रंथालय
दा. क्र. ९१५९८३६ २०.२.८५
वि. दी. ८११

# विराटाच्या नगरीत

वनवासाची बारा वर्षे पूर्ण झाल्यावर अज्ञातवासाचा एक वर्षाचा काळ मोठ्या सावधानतेने काढणे पांडवांना आवश्यक होते. कारण कौरव त्यांना ओळखून काढण्यासाठी जंग जंग पछाडणार हे उघडच होते. कौरवांना त्यांच्या प्रयत्नात यश लाभले आणि पांडव उघडकीस आले तर परत बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास भोगावा लागणार होता.

वनवासाच्या शेवटी पांडवांनी एकत्र बसून यासंबंधी नीट विचार केला आणि विदुराच्या सल्ल्याप्रमाणे त्यांनी अज्ञातवासाचा काळ विराटाच्या नगरीत काढण्याचे ठरविले. त्याप्रमाणे रानावनामधून, डोंगर-दऱ्यांतून कोणाच्याही दृष्टीस न पडता एके रात्री ते विराट नगरीच्या सीमेवर आले. वनवासामुळे त्या सर्वांची कळा बदललीच होती. परंतु गदेवरून भीमाला आणि गांडीव धनुष्यावरून अर्जुनाला कोणीही ओळखले असते. म्हणून त्यांनी आपली शस्त्रे नगरी-बाहेरील स्मशानातच दडवून ठेवण्याचे ठरवले. सर्वांनी आपली शस्त्रे उतरली, ती नीट बांधून शमीवृक्षाच्या उंच ढोलीत ठेऊन दिली आणि त्यावरच स्मशानातील एक प्रेत लटकावून दिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी एकेकाने वेष बदलले आणि ते विराट राजाच्या दरबारात गेले. युधिष्ठिराने ब्राह्मणाचा वेष

परीधान केलेला होता. विराटाला त्याने सांगितले, "मी ब्राह्मण आहे. माझे नाव कंक. द्युत खेळण्यात मी प्रवीण आहे, राज्यकारभाराचेही मला ज्ञान आहे, आपल्या सेवेत रुजू करून घ्या!" विराट राजाने मोठ्या आनंदाने कंक ब्राह्मणाला आपल्या दरबारी ठेवून घेतले.

थोड्या वेळाने भीम आला आणि राजास म्हणाला, "मी बल्लव आचारी, पाकसिद्धीत मी चतुर असून मल्लविद्येतही पटाईत आहे. यापूर्वी युधिष्ठिराच्या मुदपाकखान्यात मी काम केलेले आहे. आता आपल्याकडे सेवा करण्याची इच्छा आहे." विराटाने बल्लवाला ठेवून घेतले.

काही वेळाने अर्जुन आला. त्याने स्त्री-वेष धारण केलेला होता. इंद्राकडे असताना नृत्य-संगिताचा केलेला अभ्यास त्याला आता उपयोगी पडणार होता. तो विराटाला म्हणाला "राजन्, माझं नाव बृहन्नडा, नृत्य गायनात मी कुशल आहे." विराटाने आपली कन्या उत्तरा हीला नृत्य-संगीत शिकवण्यासाठी बृहन्नडेची नेमणूक केली.

अशा रीतीने नकुल अश्ववैद्य म्हणून 'ग्रंथिक' नावाने, सहदेव पशुवैद्य म्हणून 'तंतीपाल' या नावाने विराटाच्या दरबारी चाकरीस राहिले.

द्रौपदीने 'सैरंध्री' हे नाव धारण करून विराटाच्या राणी सुदेष्णा हिच्या दासीचे काम पत्करले. आपण यापूर्वी श्रीकृष्णाची राणी सत्यभामा आणि पांडवपत्नी द्रौपदी ह्यांची

सेवा करीत होते असे सांगून पाच गंधर्व हे माझे पती आहेत आणि ते माझे सतत रक्षण करीत असतात असे तिने सांगितले. शिवाय परपुरुषाची सेवा करणार नाही, कोणाचेही पाय धुणार नाही आणि कोणाचे उष्टे खाणार नाही या अटी द्रौपदीने सांगितल्या. सुदेष्णा राणीने त्या मान्य केल्या.

अशा रीतीने द्रौपदीसह पाच पांडवांनी आपला अज्ञातवासाचा काळ विराट राजाकडे कंठण्यास सुरुवात केली.

■ ■

# कीचक वध

अज्ञातवासाच्या काळात युधिष्ठिर, भीम, अर्जुन, नकुल, सहदेव, द्रौपदी हे सर्वजणच आपल्या भूमिका उत्कृष्टपणे वठवीत होते. कंक ब्राह्मणाने राज्यकारभारात लक्ष घालून, तर बल्लवाने उत्तम पाकसिद्धी करून विराट राजाला खूश ठेवले होते.

दिवस असे चालले असतानाच विराट नगरीतील ग्रामदेवतेचा उत्सव आला. विराटनगरीमधील व आसपासचे लोक हा उत्सव मोठ्या धामधुमीने साजरा करीत असत. यावेळी मोठी जत्रा भरत असे आणि नृत्य, नाट्य, संगीत यांचे बहारीचे कार्यक्रम होत असत. कुस्त्यांचे प्रचंड मैदानही गाजत असे. लांबलांबचे मल्ल येत असत. यावर्षी जीमूत नावाचा एक मोठा नामांकित मल्ल आला होता. त्याने आजवर अनेक मल्लांना जिंकले होते. या जत्रेत येऊन त्याने मल्लयुद्धासाठी इतर मल्लांना आवाहन केले. पण कोणीच त्याच्याशी कुस्ती खेळण्यास धजेना. हे पाहून विराट राजाला खेद झाला. त्याने बल्लवाला हाक मारून हे आव्हान स्वीकारण्यास सांगितले. भीमाचे बाहु तर स्फुरण पावतच होते. त्याने हा हा म्हणता जीमूत मल्लाला लोळवले असते, परंतु आपल्याला कोणी ओळखू नये याची खबरदारी घेऊन भीमाने काही वेळ लढत दिली आणि नंतर जीमूत मल्लाला चीत केले.

बल्लवाचा हा पराक्रम पाहून विराटाला व नागरिकांना आनंद झाला.

अज्ञातवासाचा दहा महिन्यांचा काळ लोटला होता. त्यानंतर एके दिवशी सुदेष्णाराणीचा भाऊ किचक हा आपल्या बहिणीला भेटण्यासाठी तिच्या महालात गेला असताना दासी सैरंध्री त्याच्या दृष्टीस पडली. सैरंध्रीचे अप्रतिम लावण्य पाहून किचक मोहीत झाला. या दासीला आपल्या सेवेसाठी पाठव असे तो आपल्या बहिणीला म्हणाला.

सुदेष्णेला किचकाची मागणी धुडकावणे कठीण होते. कारण एक तर तो तिचा भाऊ होताच आणि शिवाय विराटाच्या सेनेचा प्रमुख सेनापती होता. त्याच्या जीवावरच विराटाचे राज्य टिकून होते. तेव्हा त्याला नाराज करणे सोपे नव्हते. परंतु सैरंध्रीला त्याच्या सेवेसाठी धाडणेही सोपे नव्हते. कारण, परपुरुषाची सेवा करणार नाही, अशी अट सैरंध्रीने प्रथमच घातली होती. विचारांती सुदेष्णेने किचकाला सांगितले की, "तूच सैरंध्रीला भेटून वश करून घे."

मदिरेची सुरई घेऊन सैरंध्री किचकाकडे गेली असता, किचकाने तिला पकडण्याचा प्रयत्न केला, परंतु ती तेथून धावतपळत विराटाच्या दरबारात गेली. संतापाने फुत्कारीत किचकही तिच्यामागे धावला. भर दरबारात त्याने तिला लाथ मारली. युधिष्ठिराला हे पाहून संताप आला होता. पण मोठ्या संयमाने त्याने तो आवरला.

सैरंध्रीने नंतर पाकशालेत जाऊन भीमाची गाठ घेतली व त्याला झाला प्रकार सांगितला. भीम म्हणाला,

" चिंता करू नकोस, किचकाला मी अद्दल घडवतो. मात्र तू आज त्याला उद्या रात्री नाटकशाळेत भेटण्यास सांग. पुढचे मी पाहून घेतो. "

द्रौपदीने किचकाला भेटून तसे सांगितले. किचकाचा आनंद गगनात मावेना. ठरलेल्या रात्री भीम साडी नेसून अगोदरच नाटकशाळेत जाऊन झोपेचे सोंग घेऊन पडला होता. मद्य प्राशन करून झिंगलेला किचक रात्री तेथे आला आणि अंधारात सैरंध्री समजून भीमाशीच प्रेमालाप करू लागला. ही संधी साधून भीमाने त्याचे केस पकडले आणि भिंतीवर त्याचे मस्तक आपटून त्याचा प्राण घेतला.

अशा रीतीने भीमाने किचकवध करून द्रौपदीचे लज्जारक्षण केले. परंतु सैरंध्रीच्या पाच अज्ञात गंधर्व पतींनीच किचकाला मारले अशी सर्वांची समजूत झाली.

■ ■

# अज्ञातवासाचा शेवट

किचकवधाची बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. त्रिगर्त देशाचा राजा सुशर्मा याला ही वार्ता कळली. सुशर्माचे आणि विराटाचे जुने वैर होते, परंतु किचक विराटाचा सेनापती असल्यामुळे सुशर्मा गप्प होता. किचकाचा वध झाल्यामुळे आता विराटावर सूड उगवावा असे त्याने योजिले आणि तो दुर्योधनाकडे गेला. दुर्योधनाला तो म्हणाला, " कौरवाधीश विराटाच्या राज्यावर स्वारी करून त्याच्या गायी व धन लुबाडून आणण्याची ही संधी चांगली आहे. आपण कौरवांनी या कामी मला मदत करावी. यामुळे आपल्याही खजिन्यात भर पडेल आणि मलाही विराटावर सूड उगवण्याचे समाधान मिळेल. "

सुशर्म्याचा हा विचार कर्णालाही पसंत पडला. नंतर दुर्योधनाने आपली कौरवसेना सज्ज केली. विराटाला हे कळताच त्यानेही आपले सैन्य सज्ज केले. युधिष्ठिर, भीम, नकुल व सहदेव यांच्यासह स्वतः विराट रणांगणावर गेला. दोनही पक्षात घनघोर युद्ध सुरू झाले. शेकडो योद्धे रणभूमीवर पडले. कौरवांच्या मदतीमुळे विराटाच्या सेनेला माघार घ्यावी लागत होती. शेवटी तर राजा विराटच शत्रूच्या हाती पडण्याची वेळ येऊन ठेपली होती.

हे पाहून युधिष्ठिराला काळजी वाटू लागली. आपण

पाच पांडव उपस्थित असताना आपल्याला आधार देणाऱ्या विराटाला शत्रूने वेढावे आणि त्याचा पराभव करावा हे बरे नाही. म्हणून त्याने भीमाला पुढे सरसावण्याची खूण केली. त्याबरोबर भीमाने सुशर्म्याच्या सेनेवर हल्ला चढवला व त्यांना पळवून लावले. परंतु दुर्योधन, भीष्म, द्रोण, कर्ण यांनी दुसरीकडून विराटाच्या गायी पळवून न्यायला सुरवात केली होती. त्या आघाडीवर कौरवांशी लढायला जाण्यास कोणीच नव्हते. विराटाचा मुलगा उत्तर मात्र मला सारथी नाही, नाही तर मी कौरवांचा पराभव केला असता अशा उगाच बढाया मारीत होता. कौरवांचा पराभव करावा व विराटाच्या गायी सोडवून आणाव्यात यासाठी अर्जुनाचे बाहू स्फुरण पावत होते. त्याने मनाशी हिशोब केला व त्याच्या लक्षात आले की अज्ञातवासाचा काल संपलेला आहे. बढाया मारणाऱ्या राजपुत्राला तो म्हणाला, “ महाराज, मी आपले सारथ्य करतो, चला कौरव सेनेशी लढा ! ” अर्जुनाने राजपुत्र उत्तर याला रथात घालून रथ रणांगणाकडे पिटाळला. रणांगणात जाण्याआधी त्याने स्मशानात जाऊन शमी-वृक्षाच्या ढोलीत ठेवलेली शस्त्रे काढली. आपले गांडीव धनुष्य घेतले. रणांगणावर अफाट कौरवसेना पाहाताच राजपुत्र उत्तराची बोबडीच वळली, सर्वांगाला कापरे सुटले, तो भेदरून गेला. त्याच्या बढाया हवेत विरल्या. तेव्हा अर्जुनाने त्याला धीर देऊन रथाचे सारथ्य करण्यास सांगितले आणि स्वतः गांडीव धनुष्याचा टणत्कार करीत प्रतापी

बाणांचा वर्षाव कौरवसेनेवर करू लागला. त्याच्या धनुष्याच्या टणत्काराने आणि गंभीर शंखनादाने कौरवसेना भयभीत झाली आणि दाही दीशा पळत सुटली.

कर्ण, दुःशासन, अश्वत्थामा यांचीही दाणादाण उडाली. हा भयंकर पराक्रम पाहून स्तिमित झालेले भीष्माचार्य दुर्योधनाला म्हणाले, "हा पराक्रमी स्त्री-वेषातील पुरुष अर्जुनच असला पाहीजे. पांडवांच्या अज्ञातवासाचा काळ संपलेला आहे. हा अर्जुनच असेल तर त्याचा पराभव करणे कठीणच आहे." भीष्मांचे हे बोलणे दुर्योधनाला रुचले नाही. तो तसाच लढत राहीला. परंतु अर्जुनाच्या पराक्रमापुढे लवकरच त्याला पराभव पत्करावा लागला.

कौरवांचा पराभव झाल्यावर विराटाच्या गायी घेऊन जयदुंदुभी वाजवीत अर्जुनाने विराट नगरीत प्रवेश केला. विजयाचे वृत्त कळताच साऱ्या नगरीत विजयोत्सव साजरा करण्यात आला !

यावेळी युधिष्ठिर आणि विराट द्यूत खेळत बसले होते. विजयाचे वृत्त ऐकून युधिष्ठिर म्हणाला, "महाराज, बृहन्नडेमुळे हा विजय मिळाला." विराटाला याचा राग आला. त्याने द्यूताचा फासा फेकून मारला. फासा युधिष्ठिराच्या नाकावर लागला आणि नाकातून रक्त वाहू लागले. त्याचवेळी द्रौपदी तेथे आली आणि युधिष्ठिराचे रक्त जमिनीवर पडू नये म्हणून तिने चटकन भांडे पुढे केले. तेवढ्यात अर्जुन व उत्तर तेथे आले. उत्तराने बृहन्नडेमुळेच विजय मिळाला, असे सांगितले. विराट

राजा चकित झाला. तेव्हा पांडवांनी आपले खरे रूप प्रकट केले. युधिष्ठिर, भीम, अर्जुन, द्रौपदी, या साऱ्यांची ओळख पटताच विराट शरमून गेला. तो म्हणाला, " वीर हो, माझ्या हातून घडलेल्या चुकांबद्दल मला क्षमा करा. "

युधिष्ठिर म्हणाला, " राजन् आपल्या हातून न कळत चूक झाली आहे, त्याची क्षमा कसली मागता ? आपण आम्हाला वर्षभर आश्रय दिलात याबद्दल आम्हीच आपले ऋणी आहोत. "

पांडवांशी अशा रीतीने आलेला संबंध कायम टिकावा म्हणून विराटाने आपली मुलगी उत्तरा हिच्याशी अर्जुनाने लग्न करावे अशी इच्छा प्रकट केली. तेव्हा उत्तरा ही आपल्या कन्येप्रमाणे असल्याचे सांगून अर्जुनाने नकार दिला. यावर युधिष्ठिराने तोंड काढून म्हटले, " राजन्, अर्जुनाचे म्हणणे बरोबर आहे. परंतु आपला संबंध दृढ व्हावा यासाठी अर्जुनाचा मुलगा अभिमन्यू याला आपण आपली मुलगी उत्तरा द्यावी हे उचित होईल. "

उत्तरा आणि अभिमन्यूचा विवाह त्याचवेळी पक्का झाला.

■ ■

# पुढे काय ?

विवाह समारंभाला कौरव सोडून पांडवांचे सर्व हितकर्ते उपस्थित होते. श्रीकृष्ण-बलराम हे अभिमन्यूचे मामा आलेले होते. द्रुपद राजाही होता. बारा वर्षांचा वनवास आणि एक वर्षाचा अज्ञातवास या दिव्यातून सुखरूपपणे पांडव पार पडले याचा आनंद सर्वांनाच झालेला होता. विवाहविधी उत्तम तऱ्हेने, थाटामाटाने पार पडल्यानंतर जमलेल्या हितचिंतकात साहजिकच चर्चा सुरू झाली की, आता पुढे काय ?

पांडवांनी राहायचे कोठे ? जायचे कोठे ? करायचे काय ? युधिष्ठिर म्हणाला, "आपण वयोवृद्ध जाणते आहात. आम्हाला मार्गदर्शन करा."

श्रीकृष्ण म्हणाले, "द्यूतात पांडव हरले. त्यांनी अट पाळली. पुष्कळ कष्ट काढले, दुःख भोगले. आता कौरवांनी त्यांना त्यांचे अर्धे तरी राज्य परत द्यावे असे मला वाटते. शेवटी हा एक घरगुती प्रश्न आहे. कौरव-पांडव भाऊ-भाऊच आहेत. तेव्हा झाले गेले विसरावे आणि पुढे आनंदाने, गुण्यागोविंदाने राहावे असा प्रयत्न व्हावा. आपसातले वैर इथेच मिटावे." श्रीकृष्णाचे हे समंजस बोलणे सर्वांना आवडले. पण सात्यकी म्हणाला, "समझोत्याची भाषा कशासाठी ? पांडवांचा राज्यावर हक्कच आहे. तो कौरवांनी जर आता नाकारला तर होऊन जाऊ द्या युद्ध. एक घाव दोन तुकडे !"

भीमाला हा विचार एकदम पसंत पडला. सात्यकीचे म्हणणेही उचित होते. परंतु श्रीकृष्णाला एवढ्यात युद्धाचा मार्ग पत्करायचा नव्हता. सर्व रीतसर मार्ग खुंटल्यावर युद्ध हा अखेरचा उपाय. तो निरूपाय म्हणून अवलंबावयाचा असतो. श्रीकृष्णांनी आपला हा विचार सर्वांना पटवून दिला, आणि म्हटले, "आपणा सर्वांत द्रुपदमहाराज हेच ज्येष्ठ आणि श्रेष्ठ आहेत. द्रोणाचार्यांचे ते सहाध्यायी मित्र आहेत. कृपाचार्य व भीष्माचार्य यांनाही द्रुपदमहाराजांबद्दल आदर आहे. तेव्हा त्यांनीच कौरव सभेत आपला दूत पाठवून कौरवांशी बोलणी करावीत."

श्रीकृष्णांची ही सूचनाही सर्वांना पसंत पडली. द्रुपद-महाराजांनीही आपली या योजनेला संमती दिली.

■ ■

# जेथे कृष्ण तेथे जय !

द्रुपद राजाने एक कामगिरी आपल्यावर घेतली. त्याने आपल्या गुरुजींना हस्तिनापुरला धाडण्याचे ठरवले. सामोपचाराने सर्व गोष्टी झाल्या तर ठीकच, नाही तर युद्धप्रसंग उद्‌भवणार, तेव्हा आपल्या बाजूला कोण कोणते राजे येतील, कोणाचे साहाय्य होईल हे अजमावून पाहण्यासाठी देशोदेशी दूत धाडण्याचे ठरले आणि त्यानुसार दूत रवाना झालेदेखील.

अशा प्रसंगी श्रीकृष्णाचे साहाय्य तर महत्त्वाचे ! अर्जुनाने द्वारकेला जाऊन श्रीकृष्णाला विनंती करण्याचे ठरविले. तो द्वारकेला गेला.

पांडवांची अशी तयारी चालू होती. त्यावेळी धोरणी दुर्योधनही काही स्वस्थ बसलेला नव्हता. तोही स्वतः द्वारकेला नेमका त्याचवेळी पोचला. अर्जुन व दुर्योधन दोघेही एकाचवेळी एकाच कामासाठी आलेले पाहून श्रीकृष्णाला पेच पडला. परंतु या पेचातून श्रीकृष्णांनी स्वतःची मोठ्या चातुर्याने सुटका करून घेतली. श्रीकृष्णाचा तसा मनापासून ओढा-पांडवांच्याकडेच होता. कारण पांडवांची बाजू नीतीची, सत्याची व न्यायाची होती. पण तरीही दुर्योधनाची व अर्जुनाची परीक्षाच त्यांनी पाहिली. श्रीकृष्ण दोघांनाही म्हणाले, " तिसऱ्या प्रहरी वामकुक्षी झाल्यावर जो

आधी माझ्या दृष्टीस पडेल त्याच्या पक्षाला मी राहीन."

वामकुक्षी संपायच्या वेळी दुर्योधन आला आणि श्रीकृष्णाच्या उशासी बसला. त्याची कल्पना अशी की, श्रीकृष्णांनी डोळे उघडले की, आपणच दृष्टीस पडू! शिवाय आपण राजे, असे, वरच बसले पाहिजे. परंतु अर्जुन ऋजू मनाचा होता. श्रीकृष्णाचा भक्त होता. तो नम्रतेने श्रीकृष्णांच्या चरणाशी बसून राहीला. थोड्या वेळाने श्रीकृष्णांनी डोळे उघडले ते, "अरे, अर्जुना! केव्हा आलास?" असे म्हणतच. नंतर त्यांनी उशाशी बसलेल्या दुर्योधनाकडे पाहिले. श्रीकृष्ण कोणत्या पक्षाला याचा निर्णय झाला होता. पण दुर्योधनाला तरी श्रीकृष्ण कुठे हवा होता? त्याला हवी होती ती त्याची यादव सेना. तो म्हणाला, "श्रीकृष्णा, मला तुझी अपेक्षा नाही. मला तुझी सेना हवी आहे."

हे ऐकून श्रीकृष्ण मनाशी हसले. म्हणाले,

"अर्जुना! तुझा काय विचार आहे?"

अर्जुनाने चट्कन सांगितले, "श्रीकृष्णा, मला तूच हवास.'

थोड्या वेळाने दुर्योधन निघून गेल्यावर श्रीकृष्णांनी' अर्जुनाला विचारले,

"अर्जुना! अरे, युद्ध करण्यास निघालास आणि सेना नाकारून मला घेतलेस हे कसे काय?"

"मुकुंदा, अरे जेथे कृष्ण तेथे जय! याची मला खात्रीच आहे."

■ ■

# कृष्णशिष्टाई

द्रुपद राजाने आपल्या गुरुजींना हस्तिनापूरला धाडले. त्यांनी पांडवांची बाजू भीष्म, द्रोण, धृतराष्ट्र, विदूर, कृप यांच्यापुढे मांडली आणि सांगितले, "पांडवांना अर्धे राज्य देऊन आपसातील भाऊबंदकी संपवावी. वैराचा अंत करावा." भीष्मादिकांना हे म्हणणे पटले. त्यांनी या गोष्टीला अनुमती दर्शविली. परंतु दुर्योधनाला हे मुळीच पटले नाही. कर्णाने दुर्योधनाच्याच म्हणण्याला पाठिंबा दिला. पांडवांच्या विषयीचा त्याच्या मनातला द्वेष आणखीन चेतवला. भीष्म-द्रोणांनी, तसेच धृतराष्ट्रानेही दुर्योधनाला समजावण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु दुर्योधनाने कोणाचेही ऐकले नाही. आपला हेका सोडला नाही. तो म्हणाला, "पांडवांना आम्ही जिंकले आहे. त्यांचे राज्य आमचे झाले आहे. तेव्हा त्यांना युद्धावाचून काहीही मिळणार नाही. हिंमत असेल तर त्यांनी युद्धास यावे; मग आम्ही पाहून घेऊ."

दुर्योधनाने आपला हट्ट सोडला नाही तरी आणखी एक प्रयत्न करून त्याचे मन वळविण्याचे व युद्ध टाळण्याचे श्रीकृष्णांनी ठरवले. युद्धाने उभय पक्षांची हानी होते. संहार होतो.

श्रीकृष्ण स्वतः पांडवांसाठी शिष्टाई करण्यास हस्तिना-पूरला आले. दुर्योधनाने श्रीकृष्णाचे थाटाने स्वागत करण्याचे

ठरविले, पण श्रीकृष्ण महात्मा विदुरांच्याकडेच जाऊन उतरले. गरीब विदुराच्या घरच्या कण्या त्यांनी गोड करून आवडीने खाल्या.

हस्तिनापूरला जाण्यापूर्वी पांडवांनीही श्रीकृष्णांना, "आपण आमच्यासाठी जाऊन आपला अपमान करून घेऊ नये" असे सांगून पाहिले. पण "लोककल्याण व न्यायासाठी मी मानापमानाची चाड बाळगीत नाही" असे श्रीकृष्णांनी सांगितले.

कौरवसभा भरल्यावर श्रीकृष्ण सभेत आले आणि त्यांनी पांडवांची बाजू कशी न्यायाची व सत्पक्षाची आहे हे सांगितले. यावेळी सभेत उपस्थित असलेल्या सर्व थोरांनी, ऋषीमुनींनी, राजांनी श्रीकृष्णाचे भाषण ऐकून संतोष प्रकट केला. श्रीकृष्णांनी आपसातील भांडणातून काय काय अनर्थ ओढवतील हेही सांगून टाकले होते. श्रीकृष्णाच्या विचाराला कण्व, नारद ह्यांनीही भाषणे करून पुष्टी दिली. धृतराष्ट्राने आपल्याला हे सारे पटते, पण दुर्योधनाला हे पटवावे असे सांगितले. त्यानंतर श्रीकृष्णांनी व अन्य ज्येष्ठांनी दुर्योधनाला समजावण्याचा प्रयत्न केला. पण पांडवद्वेषाने अंध बनलेल्या दुर्योधनाला हे पटले नाही. तो रागावला आणि उर्मटपणाने म्हणाला, "पांडव पाच आहेत, आम्ही शंभर आहोत. मागणाराने आपले बळ पाहून मागावे. आम्ही पांडवांना पाच गावेच काय, पण सुईच्या अग्रावर राहील एवढी मातीही देण्यास तयार नाही."

यावर श्रीकृष्णांनी सांगितले, "कुलक्षय पाहण्याचेच तुमच्या दैवी दिसत आहे. शांतपणाने, शहाणपणाने पांडवांना त्यांचा राज्यातला हिस्सा द्या, नाहीतर युद्धास तयार व्हा! यात तुमचा नाश आहे हे निश्चित. कारण सत्याचा जय होत असतो."

श्रीकृष्णांनी असे निक्षून बजावल्यावर दुर्योधन, दुःशासन, कर्ण, शकुनी इत्यादी तावातावाने संताप व्यक्त करीत सभेतून निघून गेले.

श्रीकृष्णांनी कुलक्षय व भयंकर संहार टाळण्यासाठी दुर्योधन, कर्ण, शकुनी या हटवादी मंडळींना पकडून पांडवांच्या स्वाधीन करावे असे सुचविले.

पण श्रीकृष्णालाच पकडण्याचा कट तिकडे ती मंडळी करीत होती. या कटाची बातमी सात्यकीने श्रीकृष्ण, विदुर आणि धृतराष्ट्र यांना दिली. धृतराष्ट्राने दुर्योधनाला तावडतोब सभेत पुनः बोलवून आणले. त्यावेळी श्रीकृष्णांनी आपल्या अलौकिक सामर्थ्याचे व दिव्यशक्तीचे अनेक चमत्कार तिथे दाखवले आणि नंतर ते विराट नगरीला निघून गेले.

■ ■

# कर्ण–कुंती भेट

हस्तिनापुरातून जाता जाता श्रीकृष्णांनी कर्णाला भेटून सांगितले होते, "कर्णा, अरे तू माझा आतेभाऊ आहेस!"

"तो कसा?" कर्णाने आश्चर्याने विचारले. यावर श्रीकृष्णांनी कर्णाला त्याची जन्मकथा सांगितली, "तूं कुंतीचा ज्येष्ठ पुत्र आहेस. कुंतीला जो महान मंत्र मिळाला होता, त्यापासून तुझा जन्म झालेला आहे. पांडवांचा तू मोठा भाऊ आहेस! कुंती तुझी माता आहे."

हे ऐकून कर्णाने उत्तर दिले, "श्रीकृष्णा, हे तूच सांगतो आहेस, म्हणूनच मी विश्वास ठेवतो आहे. पण हे जरी खरे असले तरी मी कुंतीला माझी माता का म्हणून मानू? माझा जन्म होताच तिने लोकभयास्तव निर्दय होऊन मला पाण्यात सोडून दिले. त्यानंतर माझे पालन-पोषण अधिरथ सूताने आणि त्याची धर्मपत्नी राधा हिने केले. तेव्हा माता-पित्याच्या ठिकाणी हे दोघेच मला आहेत. दुर्योधनाने मला राज्य देऊन राजा बनविले आणि आपला स्नेही करून, बरोबरीच्या नात्याने वागवून माझा सन्मान केला. मला प्रतिष्ठा दिली. आता मी त्याला सोडणे हा अधर्म होईल. मित्रघात होईल."

श्रीकृष्ण गेल्यानंतर एके दिवशी प्रातःकाळी गंगेच्या तीरावर कर्ण स्नान आटोपून सूर्याला अर्घ्य देत असतानाच

कुंती तिथे पोचली. कृष्णाची शिष्टाई असफल झाली आणि आता कौरव-पांडवात युद्ध अटळ आहे हे निश्चित झाल्याचे ऐकल्यापासून कुंती फारच अस्वस्थ झाली होती. युद्धापासून होणाऱ्या भयंकर संहाराची तिला कल्पना आलेली होती. हे युद्ध टळावे, संहार थांबावा अशी तिची इच्छा. पण ऐकणार कोण? शेवटी महारथी कर्णाला तरी यापासून परावृत्त करावे. सत्य सांगावे. पांडवांच्या बाजूला वळवून घ्यावे असा प्रयत्न ती करीत होती.

"बाळ कर्णा!" कुंतीमातेने प्रेमभराने हाक दिली. कर्णाने चमकून वळून पाहिले.

"कोण?"

"मी कुंती. तुझी माता!"

"मी जाणतो. पण जन्माने जरी तू माझी माता असलीस तरी राधा हीच खरीखुरी माझी माता झाली आहे."

"विसर, विसर बाळा ते."

"कसा विसरूं? विसरण्यासारखी स्थिती नाही."

"मग काय तू तुझ्या सख्या भावांशी लढणार?"

"माझे भाऊ आहेत दुर्योधन, दुःशासन-सगळे कौरव. त्यांनीच मला बंधुप्रेम देऊन वाढवले. मी त्यांचाच आहे. त्यांचा पक्ष सोडणार नाही. व्यर्थ खटपट करू नकोस, माते."

"पांडवांना राज्य मिळाले तर त्यावर ज्येष्ठ पुत्र म्हणून

तुझाच हक्क राहील. पांडव तो आनंदाने मानतील, कर्णा."

"मला त्याची जरूर नाही. तो अधिकार युधिष्ठिराने खुशाल भोगावा!"

कर्णाचा हा निश्चयी बाणा पाहून कुंतीही स्तिमित झाली. क्षणभर ती काहीच बोलली नाही. नंतर म्हणाली,

"ते राहू दे. पण कर्णा, तू जसा शूरवीर म्हणून ख्यातनाम आहेस, तसाच दानशूर म्हणूनही प्रसिद्ध आहेस. तुझ्या औदार्याला, उदारतेला सीमा नाही."

"काय मागणे आहे, माते?"

"पांडवांचा नाश करू नकोस."

ही मागणी ऐकून कर्णही क्षणभर स्तब्ध झाला. कुंतीची-एका मातेची-आपल्या मुलांबद्दलची वत्सलता पाहून तोही विरघळला. म्हणाला, "माते, युधिष्ठिर, भीम, नकुळ व सहदेव यांना मी युद्धात मारणार नाही. परंतु अर्जुनाशी मात्र लढल्याशिवाय राहणार नाही. तशी प्रतिज्ञा मी मागेच केलेली आहे. म्हणून माते, तुझी संपूर्ण मागणी मला मान्य करणे शक्य नाही. तसा आग्रह धरू नकोस."

कुंतीचा नाइलाज झाला.

ती निराश होऊन परतली.

# युद्धाची सिद्धता

युद्ध अटळ झाले. श्रीकृष्णांनी पांडवांना, न्यायासाठी आता लढण्यावाचून तुम्हाला गत्यंतर नाही, असे सांगून टाकले.

श्रीकृष्णांनी अनुमती दिल्याबरोबर पांडवपक्षामध्ये सैन्याची जमवाजमव सुरू झाली. त्यांचे साहाय्यकर्ते राजे आपली सेना घेऊन आले. श्रीकृष्णाच्या सल्ल्याने पांडवांनी द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न याला आपल्या पक्षाचे सेनापती केले.

तिकडे कौरवांनीही तशीच जोरात तयारी चालविली. त्यांच्या बाजूचे राजे-महाराजे आपापली विराट सेना घेऊन आले. कौरवांनी आपल्या पक्षाचे सेनापतीपद भीष्माचार्यांनी स्वीकारावे अशी त्यांना विनंती केली. ही विनंती ऐकून भीष्मपितामह म्हणाले.

"दुर्योधना, मी केवळ तुझ्या दरबारी आहे, अर्थाचा दास आहे, म्हणूनच तुझी विनंती मी मान्य करतो. नाहीतर कौरव काय नि पांडव काय मला दोघेही सारखेच. परंतु तरीही माझ्या दोन अटी राहतील."

"त्या कोणत्या ?"

"मी दररोज दहा हजार योद्ध्यांना ठार मारीन."

"आणि दुसरी अट ?"

"रणांगणात मी तरी किंवा कर्ण तरी लढेल." यावर कर्ण संतापला आणि म्हणाला, "हरकत नाही. भीष्म पडल्यावरच मी लढेन."

दोन्ही पक्षांकडून युद्धाची सिद्धता झाल्यावर काही नियम ठरविण्यात आले. रथ, गज, अश्व आणि पदाती अशी चतुरंग सेना होती. तेव्हा रथांनी, रथाशी, पदातींनी पदातींशी असे लढावे. शरणागतावर शस्त्र चालवू नये, असावध असताना मारू नये. तुल्यबलाशीच लढावे. इत्यादी प्रकारचे ते नियम होते.

नंतर कुरुक्षेत्रावर दोन्ही सैन्ये समोरासमोर उभी ठाकली. पांडवांच्या बाजूला सात अक्षौहिणी सैन्य होते, तर कौरव पक्षाकडे अकरा अक्षौहिणी सैन्य होते.

अर्जुनाचे सारथ्य स्वतः भगवान श्रीकृष्ण करीत होते. त्यांनी अर्जुनाचा रथ दोन्ही सैन्याच्यामध्ये नेऊन उभा केला. अर्जुनाने कौरवांच्या पक्षाकडे दृष्टी टाकली तेव्हा त्याला तिथे भीष्म, द्रोण कृप यांच्यासारखी वंदनीय, वडीलधारी, आप्तस्वकीय माणसे दिसली. त्यांना पाहताच अर्जुनाला वाटले, "आता युद्धात यांच्यावर शस्त्र चालवावे लागणार. संहार होणार आणि यांच्यासारख्या पूज्य व्यक्तींच्या हत्येतून आपल्याला जय मिळणार! छे! छे! केवढा हा अधर्म!" या विचारासरशी अर्जुनाच्या हातापायातले अवसानच गळाले. तो वीर पुरुष गलितगात्र बनला. तो श्रीकृष्णांना म्हणू लागला,

“ श्रीकृष्णा, हे युद्ध माझ्याकडून होणार नाही. या साऱ्यांना मारून मिळणारे राज्यवैभव काय कामाचे ? श्रीकृष्णा, मी हे पाप करणार नाही. मी लढणार नाही.”

अर्जुनाची ही अवस्था पाहून श्रीकृष्ण त्याला धीर देत म्हणाले, “ अर्जुना, ऐन रणांगणावर तुझ्यात हा भ्याडपणा आला कुठून ? तुझ्यासारख्या वीर पुरुषाला हे शोभादायक नाही. हे पार्था, हे लक्षात ठेव की, हे युद्ध कोणाच्या स्वार्था-साठी लढले जात नसून यात दोन तत्त्वांचा संघर्ष आहे. तत्त्वासाठी जेव्हा युद्ध होते तेव्हा कर्तव्यावरच लक्ष ठेवून लढायचे असते. अर्जुना ! अरे, आपल्या हातून हे श्रेष्ठ पुरुष मारले जातील असे जे तुला वाटते आहे, तो तुझा भ्रम आहे. ज्याचे तत्त्व श्रेष्ठ असते त्याचे कर्तव्यही तेवढेच उच्च प्रतीचे असते हे ध्यानात ठेव. भीष्माचार्य असोत, द्रोणाचार्य असोत किंवा आणखी कोणी असोत ते तुझ्या हातून मारण्या-पूर्वीच मेलेले आहेत. कारण त्यांनी असत्याची बाजू घेतलेली आहे. ते तत्त्वहीन बनलेले आहेत. तत्त्वहीनांचा किंवा गैर तत्त्वाचा आधार घेणाऱ्यांचा नाश झाल्याशिवाय सत्याची प्रतिष्ठापना होत नसते. म्हणून, हे अर्जुना, व्यर्थ भ्रमात राहू नकोस. नसती काळजी करू नकोस. कर्तव्य-पालन करताना माणसाने राग, द्वेष, माया, मोह या षड्विकारांपासून दूर राहिले पाहिजे. आपले प्राप्त कर्म आचरिले पाहिजे. फलाची आसक्ती न बाळगता कर्म केले

पाहिजे. तेव्हा अर्जुना ! ऊठ ! आपले धनुष्य हाती घे आणि तुझा प्रतापी शंख फुंकून शत्रूचा थरकाप उडव !"

अशा प्रकारे श्रीकृष्णांनी उपदेश केल्यावर अर्जुनाचे गलितपण नष्ट झाले आणि परत त्याचे वीरबाहू स्फुरण पाहू लागले.

कुरुक्षेत्रावर भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला हा जो खऱ्या कर्तव्याचा आणि सद्धर्माचा उपदेश केला, त्यालाच 'श्रीमत् भगवद्गीता' असे म्हणतात.

■ ■

# कुरुक्षेत्रावर

युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी युधिष्ठिर आपल्या रथातून खाली उतरला आणि कौरवसेनेकडे पायी-पायीच चालला. सर्वांना नवल वाटले! कौरवांना तो येताना पाहून, हा युद्धापूर्वीच शरण आला, असे वाटले. पण युधिष्ठिर धर्मात्मा होता. तो थोरांच्या आशीर्वादासाठी तिकडे निघाला होता. त्याने जाऊन पितामह भीष्मांना वंदन केले आणि आशीर्वाद मागितला. भीष्मांना धर्माचे हे वर्तन पाहून अत्यंत आनंद झाला. त्यांनी आशीर्वाद दिले. नंतर द्रोणाचार्यांनाही धर्माने वंदन केले. त्यांचेही आशीर्वाद घेतले.

सर्व तऱ्हेची सिद्धता झाली होती. युद्धासाठी बाहू शिवशिवत असलेला भीम मोठमोठ्याने आरोळ्या ठोकीत होता. त्याच्या महाप्रचंड आरोळ्यांनी सारे रणांगण दणाणून गेले. कौरवांचे अश्व, जग देखील भयभीत बनले, थरथर कापू लागले. हे पाहून दुःशासन आदी कौरव त्रस्त झाले आणि त्यांनी भीमावर शस्त्रवर्षाव सुरू केला. तेवढ्यात महाभयंकर असे शंख, दुंदुभी, कर्णे, तुताऱ्या या रणवाद्यांचा एकच ध्वनी उठला. धनुष्यांवर बाण चढले आणि सूं सूं करीत एकमेकांवर सुटले. शस्त्रांचा खणखणाट होऊ लागला. रथाशी रथ भिडले. अश्व अश्वाशी झुंजू लागले.

युद्धाच्या पहिल्याच दिवशी विराटपुत्र उत्तर शल्याशी युद्ध करताना पडला. ते पाहून त्याचा बंधू श्वेत शल्यावर

चालून गेला. त्याने आपल्या प्रतापी बाणाने शल्याचा प्राण घेतला. श्वेताने भीष्माचा ध्वजदंडही तोडून टाकला. शेवटी भीष्मांनी ब्रह्मास्त्राने अभिमंत्रित केलेला बाण सोडला. त्याने तो वीर गतप्राण झाला.

दुसरे दिवशी अर्जुनाचा रथ भीष्मांच्या रथाशी श्रीकृष्णांनी नेऊन भिडवला. दोघांत दिवसभर तुंबळ युद्ध झाले.

भीमाने तिकडे कलिंगवीरांचा आपल्या अमोघ गदेने चेंदामेंदा करून टाकला.

तिसरे दिवशी अचानकच भीम व दुर्योधन एकमेकांसमोर आले. भीमाच्या प्रहाराने दुर्योधन मूर्च्छित होऊन पडला. कौरव सेनेत घबराट उडून पळापळ सुरू झाली. शुद्धीवर आल्यावर दुर्योधनाने हे दृश्य पाहिले आणि तो भीष्मांना झोंबेलसे कटु शब्द बोलला. भीष्मांनी आपली शरवृष्टी प्रखर केली. पांडवपक्षाचे असंख्य वीर ठार होऊ लागले. अर्जुनही निःष्प्रभ झाला. तेव्हा श्रीकृष्णांनी स्वतःचे सुदर्शन चक्र घेतले आणि ते भीष्मावर चालून गेले. हे पाहताच अर्जुन पुनश्च सावरला आणि श्रीकृष्णाला मागे सारून स्वतः मोठ्या जिद्दीने लढू लागला. भीष्मार्जुनांचे युद्ध आठ दिवस चालल. नवव्या दिवशी शिखंडीच्या आडून शरसंधान करून अर्जुनाने भीष्मांना घायाळ केले. भीष्म पितामह बाणांच्या टोकांची शरशय्या करून त्यावर त्याच स्थितीत पडून राहिले. ते इच्छामरणी होते. उत्तरायण सुरू होईपर्यंत त्यांनी प्राण सोडले नाहीत. अर्जुनाने पाताळात बाण मारून भीष्मांच्या मुखात जलधारा सोडली. ■■

# चक्रव्यूह आणि जयद्रथ वध

भीष्म पडल्यावर कौरव सेनेचे सेनापती द्रोणाचार्य बनले. त्यांनी युद्धिष्ठिराला धरून आणण्याची प्रतिज्ञा केली. श्रीकृष्णांनी भीमाला पांडपक्षाचा सेनापती बनवण्याचा सल्ला दिला. घनघोर युद्ध सुरू झाले. द्रोणाचार्यांनी कौरवसेनेची चक्रासारखी रचना केली. हा चक्रव्यूह फोडण्याची खुबी श्रीकृष्ण व अर्जुन यांच्याखेरीज कुणालाच ठाऊक नव्हती. पण ते तर दुसऱ्या आघाडीवर चौदा हजार योद्ध्यांशी लढत होते. अर्जुनाचा वीरपुत्र अभिमन्यू याला चक्रव्यूहात कसे घुसावे हे ठाऊक होते. परंतु त्यातुन बाहेर पडण्याचे कसब त्याला ज्ञात नव्हते. तथापी, अभिमन्यूने चक्रव्यूहात मोठ्या पराक्रमाने प्रवेश केला. त्याच्यापाठोपाठ भीम आदी योद्धे जाऊ लागले, पण त्यांना ते जमले नाही अभिमन्यू एकटाच कौरववीरांशी लढत राहिला, आणि शेवटी दुर्योधनाच्या आज्ञेवरून द्रोण, कृप, अश्वत्थामा, शकुनी, दुःशासन, कर्ण आणि दुर्योधन या सात महारथींनी एक होऊन युद्धाच्या तेराव्या दिवशी अभिमन्यूस मारले. अभिमन्यू मरणोन्मुख झाला असताना जयद्रथाने त्याच्या मस्तकावर लाथ हाणली. ही वार्ता कळताच अर्जुनाला अतिशय क्रोध आला. त्याने तत्काळ प्रतिज्ञा केली की, "उद्या सूर्य अस्तास जाण्यापूर्वी जयद्रथाचे डोके उडवीन तरच जिवंत राहीन, नाहीतर अग्नीप्रवेश करून जळून जाईन!"

कौरवांना अर्जुनाची ही प्रतिज्ञा कळताच त्यांनी जयद्रथाच्या रक्षणाची कडेकोट तयारी केली. श्रीकृष्ण व अर्जुनाने जयद्रथाचा खूप शोध घेतला, पण तो हाती लागला नाही. भीमही जयद्रथाला शोधण्यास निघाला. कौरवांनी त्याला अडथळा केला तेव्हा भीमाने अनेक कौरव योद्धांना यमसद-नाला धाडले.

तेवढ्यात अंधार पडला. आता प्रतिज्ञेप्रमाणे अग्निप्रवेश करण्यासाठी म्हणून अर्जुनाने सर्व सिद्धता केली. अर्जुनाची फजिती पाहण्यासाठी सर्व कौरव हसत खिदळत आले. त्यात जयद्रथही होता. जयद्रथ येताच श्रीकृष्णांनी मायेने सूर्यावर आणलेले झाकण दूर केले. त्याबरोबर अंधार गेला. श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले, "अर्जुना, हा पहा सूर्य नी हा पहा जयद्रथ !"

अर्जुनाने तात्काळ बाण सोडला आणि जयद्रथाचा वध केला. अर्जुनाची प्रतिज्ञा तडीस गेली.

■ ■

# घटोत्कच वध

जयद्रथाचा वध झाल्याने दुर्योधन संतापला. त्या दिवशी त्याने अंधार पडला तरी युद्ध चालू ठेवले. आपल्या योद्ध्यांना त्याने पांडवसेनेवर तुटून पडण्याची व सूड उगविण्याची आज्ञा दिली. रात्रीच्या काळोखात दोन्ही सैन्ये एकमेकांशी निकराने लढू लागली. अश्वत्थामा विशेष पराक्रम गाजवीत होता. दुर्योधन त्याला प्रोत्साहित करीत होता.

श्रीकृष्णांनी भीमपुत्र घटोत्कचाला आपला पराक्रम दाखवण्यास उत्तेजन दिले. घटोत्कचाने आपले मायावी युद्ध आरंभले. रात्र जसजशी वाढत चालली तसतशा त्याच्या लीलाही वाढत चालल्या. कधी तो उंच आभाळात उड्डाण करून एखाद्या बलाढ्य हत्तीचा आकार धारण करून कौरवसेनेवर दाणकन कोसळे, तर कधी वीजांच्या कडकडाटाने आणि मेघांच्या गडगडाटाने त्यांना भयभीत करून सोडी. क्षणात इथे तर क्षणात तिथे अशा गतीने तो रणात वावरे, त्यामुळे त्यावर शस्त्र चालविणेही कठीण झाले. शिवाय तो नानाप्रकारे मायावी कारस्थाने करून शत्रूचे चित्त भ्रमाने व्यापून टाकीत असे. कर्ण व दुर्योधनाचीही अशी त्रेधा त्याने उडवली. या प्रकारामुळे असंख्य कौरव सैनिक ठार होऊ लागले. त्यांची दाणादाण उडू लागली. दुर्योधनाला भीती पडली की, रात्रभर जर हे असेच नाटक चालले तर आपला

निःपात होऊन जाईल. म्हणून तो शेवटी कर्णास म्हणाला, "आता यातून तरण्यासाठी सूर्याने तुला दिलेली अमोघ वासवी शक्ती तू या राक्षसावर चालव."

"पण मी ती मुद्दाम अर्जुनासाठी ठेवलेली आहे" कर्ण म्हणाला. "अरे बाबा, यातून वाचलो तर अर्जुनाचे काय करायचे ते पुढे पाहू."

दुर्योधनाच्या सांगण्याप्रमाणे शेवटी नाइलाजाने कर्णाने वासवी शक्ती जपली आणि घटोत्कचावर सोडली.

घटोत्कचाने, आता आपली वेळ भरली हे जाणले, आणि महाकाय आक्राळ विक्राळ रूप धारण करून तो कौरवसेनेवर कोसळला. मरतानाही त्याने अनेकांचे प्राण घेतले.

घटोत्कचाच्या मृत्यूने पांडवाना दुःख झाले. पण श्रीकृष्णांना मात्र हायसे वाटले होते. त्यांना आनंदच झाला होता. पांडवांनी जेव्हा याचे कारण विचारले तेव्हा श्रीकृष्ण म्हणाले, "आता अर्जुनाला भय उरले नाही. कर्ण ही दिव्य शक्ती अर्जुनावर वापरणार होता. ती घटोत्कचावर वापरल्याने कर्णाजवळ आता अमोघशक्ती अशी उरलेली नाही."

वाईटातून चांगले घडते ते असे. घटोत्कच वधानंतर त्या दिवशीचे युद्ध संपले.

■ ■

# द्रोणपर्व

द्रोणाचार्यांनी पांडवावर ब्रह्मास्त्र सोडून त्यांना ठार करावे अशी सूचना दुर्योधनाने केली होती. त्यानुसार द्रोणाचार्य अटीतटीने लढत होते. घटोत्कच वधानंतर द्रोणांनी विराट आणि द्रुपद या दोघांना ठार केले. पांडवांचा क्रोधाग्नी भडकला. धृष्टद्युम्न सूडाच्या भावनेने पेटून म्हणाला, " आज द्रोणांना मी ठार करणारच करणार ! नाही पेक्षा मी चिरकाल नरकवास भोगीन !"

विलक्षण रणधुमाळी माजली. धृष्टद्युम्नाने द्रोणांवर बाणांचा पाऊस पाडला. पण व्यर्थ !

श्रीकृष्ण म्हणाले, " जोवर द्रोणाचार्यांच्या हातात शस्त्र आहे तोवर त्यांचा पराभव करणे शक्य नाही. त्यांना शस्त्र-हीन करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे अश्वत्थामा मृत्यु पावला हे वृत्त त्यांच्या कानी घालावे."

श्रीकृष्णाची ही युक्ती भीमाला आवडली. त्याने तत्काळ आरोळी ठोकली आणि आपल्या सैन्यातील मालवाधिपतींचा अश्वत्थामा नामक हत्ती ठार करून द्रोणांजवळ जाऊन तो म्हणाला,

" अरेरे ! आचार्य अश्वत्थाम्याचा वध झाला." हे ऐकताच द्रोणाचार्यांचे अंतःकरण पुत्रशोकाने पार कळवळून गेले. विदीर्ण झाले. पण हे वृत्त खरे की खोटे याची खात्री करून

घ्यावी म्हणून त्यांनी आपला रथ युधिष्ठिराच्या रथाजवळ नेला. युधिष्ठिर हा धर्मात्मा व सत्यवचनी आहे हे द्रोणांना ठाऊक होते. त्यांनी विचारले, "धर्मा, अश्वत्थाम्याचा वध झाला हे खरे काय ?"

"होय आचार्य, अश्वत्थामा मारला गेला, हे खरे आहे–"

आणि यानंतरचे शब्द तो हळूच पुटपुटला, "पण तो नर नव्हे कुंजर."

द्रोणांनी शेवटचे 'नर नव्हे कुंजर' हे शब्द कोलाहलात ऐकलेच नाहीत. त्यांनी पुत्रशोकाने व्याकूळ होऊन हातातली शस्त्रे खाली ठेवली. ही संधी साधून धृष्टद्युम्न त्यांच्या रथावर चढला. एका हाताने त्यांचे पिकलेले केस धरून दुसऱ्या हातातील कट्यारीने द्रोणांचा शिरच्छेद केला.

हे भयंकर कृत्य पाहून अश्वत्थाम्याने नारायणअस्त्र अभिमंत्रून पांडवांवर सोडले. श्रीकृष्णांनी सर्वांना तातडतोब शस्त्रत्याग करण्यास सांगितले. सर्व पांडवीसेना जेव्हा निःशस्त्र होऊन हात जोडून उभी राहिली, तेव्हा नारायणअस्त्रही चालले नाही. ते शमले. अश्वत्थाम्याने पांडवांचा नाश करण्याची घोर प्रतिज्ञा त्याचवेळी केली.

# कर्णपर्व

द्रोणाचार्यांच्या वधानंतर दुर्योधन अत्यंत दुःखी बनला. त्याचा धीर खचला. तो सचिंत बनलेला पाहून अश्वत्थामा त्याला म्हणाला, " दुर्योधना, कर्णासारखा वीर पुरुष तुझ्या बाजूला असताना तू असा उदास का झाला आहेस ? कौरव-सेनेचे अधिपत्य आता कर्णाकडे सोपव. "

दुर्योधनाला ही सूचना पसंत पडली. तो तावडतोब कर्णाकडे जाऊन म्हणाला,

" कर्णा, आता कौरवांचा सारा भार तुझ्यावरच आहे. भीष्म आणि द्रोण पडल्यावर तूच आमचे सेनापतीत्व स्वीकार. नाही म्हटले तरी त्या दोघांचा ओढा पांडवांकडे होताच. तू आता तुझे सारे शौर्य पणाला लावून पांडवांचा निःपात कर."

हे ऐकून कर्ण म्हणाला, " दुर्योधना, तुझ्या विनंतीप्रमाणे मी सेनापतीपद स्वीकारतो.

यावर अत्यंत हर्षभरित होऊन दुर्योधन म्हणाला, " मग आता कौरवांचा विजय झालाच ! " " नाही दुर्योधना, विजय एवढा सोपा नाही. मी जरी शस्त्रास्त्रविद्येत कोणाही पांडववीरांपेक्षा अजोड असलो तरी मला श्रीकृष्णासारखा सारथी नाही, ही माझी उणीव आहे."

" तर त्यासाठी हे कर्णा, आम्ही काय करावे ? "

" आपल्या पक्षात श्रीकृष्णाइतकीच चातुर्याने सारथ्य करणारी एकच व्यक्ती आहे. "

"ती कोणती ?"

"शल्य !"

कर्णाची ही पसंती ऐकून दुर्योधन त्वरेने शल्याकडे जाऊन म्हणाला, "प्रसंग आणीबाणीचा आहे. तेव्हा हे वीरा, तू माझे एक मागणे मान्य कर."

"सांग. दुर्योधना, काय करू तुझ्यासाठी ?"

"कर्णाचे सारथ्य !"

हे ऐकताच शल्य संतापला. त्याला हा आपला घोर अपमान वाटला. तो तिरस्काराने म्हणाला,

"त्या सूतपुत्राचे सारथ्य ? शक्य नाही !"

परंतु दुर्योधनाने त्याची बरीच आर्जवे केली. मनधरणी केली तेव्हा एका अटीवर शल्याने कर्णाचे सारथ्य करण्याचे मान्य केले.

"दुर्योधना, मी जे बोलेन ते कर्णाने निमूटपणाने ऐकून घेतले पाहिजे. आहे मान्य ?"

"मान्य." दुर्योधनाने संमती दिली.

मग शल्याच्या सारथ्याखाली कौरवसेनेचा सेनापती बनलेला कर्ण 'कुठे आहे तो अर्जुन ?' अशा गर्जना करीत निघाला. तेव्हा त्याला शल्य म्हणाला, "कर्णा, अरे वृथा वल्गना कशाला करतोस ? अर्जुनापुढे अनेकवेळा हार खाऊन तू रणातून पळ काढलेला आहेस, हे काय कुणाला ठाऊक नाही ?"

"असा कर्णाचा मानभंग व तेजोभंग शल्य सतत करीत

होता. शल्याने दुसऱ्याच्या उष्ट्यावर मातलेल्या कावळ्याची उपमाही कर्णाला दिली. शल्याच्या वाग्बाणाने कर्ण अगदी घायाळ होऊन गेला होता.

शेवटी कौरव-पांडवांच्या सेनेच्या मध्यभागी कर्णाचा रथ शल्याने नेऊन उभा केला. खवळलेल्या सागराप्रमाणे उसळी मारून कर्णाने युधिष्ठिराचा रथ दृष्टीस पडताच त्यावर हल्ला केला. युधिष्ठिराचा रथध्वज फाडून टाकला, त्याचे धनुष्य तोडले. रथ आणि सारथी दोघांचाही नाश केला.

युधिष्ठिर प्रारंभी कर्णाशी मोठ्या शर्थीने लढला खरा, पण अखेरीस त्याचा निरुपाय झाला. दुसऱ्या रथात बसून तो शिबिराकडे निघाला. त्यावेळी कर्ण त्याला उपहासाने मोठमोठ्याने हसला. म्हणाला, " जा, जा, युधिष्ठिरा ! मी तुला जीवदान देत आहे. जा ! "

युधिष्ठिराच्या मनाला ही अपमानास्पद वागणूक फारच झोंबली.

तोवर अर्जुन संशप्तकांचा नाश करून आला. त्याला युधिष्ठिराचा रथध्वज दिसला नाही. त्याला काळजी वाटू लागली. अर्जुनाने भीमावर युद्धआघाडी सोपवली आणि स्वतः शिबिराकडे श्रीकृष्णासह गेला.

तिथे युधिष्ठिराकडून सर्व वार्ता कळली, तेव्हा अर्जुन कर्णाचा वध करण्याच्या प्रतिज्ञेवरच युधिष्ठिराचा आशीर्वाद घेऊन परतला.

■ ■

# दुःशासन वध

भीम आणि दुःशासन यांची तोवर चांगलीच जुंपली होती. भीम दुःशासनाला मरणान्ताचे शासन करायला अधीर झालेला होता. दुःशासनालाही भीमाचा मनस्वी राग-संताप होता. त्यामुळे दोघेही वीर कसून एकमेकांविरुद्ध लढू लागले. डाव-प्रतिडाव एकमेकांना टाकू लागले. निरनिराळ्या अस्त्रांचा वापरही ते एकमेकांविरुद्ध करू लागले. भीमाच्या सणाणत्या बाणांनी दुःशासन कैक वेळा मूर्च्छित झाला, तर दुःशासनाच्या शरवर्षावांनी भीमही व्याकूळ बनला.

असे घनघोर द्वंद्व चालू असतानाच दुःशासनाच्या एका तीक्ष्ण बाणाने भीम काहीसा घायाळ झाला. तेव्हा चवताळून त्याने रथाखाली उडी घेतली. आपली प्रतापी गदा प्रचंड वेगाने गरगरा हवेत फिरवली आणि एकाच तडाख्याने दुःशासनाला त्याने धरणीवर लोळवले.

मग वर तोंड करून पडलेल्या दुःशासनाच्या छातीवर भीमाने आपला दणकट खांबासारखा पाय रोवला आणि खड्ग उपसून तो म्हणाला,

" अरे पाप्या, भर सभेत कपटाने आम्हांला ' गाय रे गाय ' म्हणून हिणवणारा नीच तूंच ना ! सती द्रौपदीचे केस धरून ओढणारा अधम तूच ना ! पतिव्रतेच्या निरीला हात

घालणारा दुरात्मा तूच ना ! मग घे तुझ्या पापकर्मांची फळे. भोग यातना. ”

आणि असे म्हणून भीमाने एका हिसड्यासरशीच दुःशासनाचा उजवा हात उपसून फेकला. त्याच्या वक्षःस्थलावर प्रहार करून ते फोडले आणि त्यातील ऊन ऊन रक्त तो वीर घटाघट प्याला ! आपली प्रतिज्ञा त्याने पुरी केली.

नंतर दुःशासनाचे शीर कापून त्याने ते कौरवसेनेकडे भिरकावून दिले.

प्रचंड गर्जना करीत आणि भुजा थोपटीत भीम मग दुसऱ्या शत्रूचा समाचार घ्यावयास निघून गेला.

दुःशासनाच्या वधानंतर भीमाचे पुष्ट, बलदंड बाहू कौरवेश्वर दुर्योधनाचा वध करण्यासाठी स्फुरण पावू लागले होते. रक्त सळसळत होते.

■ ■

# कर्णवध

दुसऱ्या एका आघाडीवर नकूल आणि कर्णाचा पुत्र वृषसेन यांच्यात युद्ध जुंपलेले होते. दोघेही अटीतटीने लढत होते. परंतु अखेरीस वृषसेनाच्या बाणांपुढे नकूल मागे सरकू लागला. त्याचवेळी अर्जुन तेथे आला. त्याने ही परिस्थिती पाहताच आपल्या धनुष्यावर बाण चढवला आणि कर्णाला उद्देशून म्हणाला, "कर्णा, माझ्या अभिमन्यूला चक्रव्यूहात पकडून तुम्ही सहा वीरांनी मिळून त्याचा वध केलात, मी आता एकटाच तुझ्या वृषसेनाला ठार करतो पाहा."

अर्जुनाचा पराक्रमी बाण सुटला आणि क्षणार्धातच वृषसेनाचे मस्तक छेदून गेला!

हे भयंकर दृश्य पाहून कर्ण संतापून गेला. तेवढ्यात शल्य त्याला म्हणाला,

"कर्णा, हा पहा अर्जुन समोर उभा आहे. दाखव तुझे शौर्य. पाहू दे तुझा पराक्रम."

कर्ण अर्जुनाचा वध करण्यासाठी उत्सुक होताच, आणि अर्जुनही कर्णाचा नक्षा उतरवण्यासाठी उतावीळ बनलेला होता. कृष्णाने अर्जुनाला प्रोत्साहित करून म्हटले,

"अर्जुना, पराक्रमाची शर्थ कर!"

कर्ण आणि अर्जुन हे दोन महान् योद्धे एकमेकांसमोर युद्धाच्या पवित्र्यात ठाकले. सारे रणांगण स्तिमित होऊन

पाहू लागले. दोघेही वीर पुरुष, धुरंधर धनुर्धर. अस्त्रविद्येत अजोड.

एकमेकांनी एकमेकांवर आपले बाण सोडले. तुमुळ युद्ध सुरू झाले. अर्जुनाने आग्नेय अस्त्र सोडताच कर्णाने वारुणास्त्र सोडून ते निःष्प्रभ ठरवले. अर्जुनाने वज्रास्त्र सोडताच कर्णाने भार्गवास्त्र सोडून ते निरुपयोगी केले.

असे प्रखर युद्ध चालले असतानाच एक अद्‌भुत चमत्कार घडला !

कर्णाच्या रथाचे चाक भूमीने गिळले. जमिनीत रुतून बसले. रथ जागचा हालेचना.

कर्णाने हे पाहिले आणि त्याने रथातून खाली उडी घेतली. जमिनीत रुतून बसलेले रथाचे चाक तो काढू लागला. अर्जुनाने आपले धनुष्य सरसावले, तेव्हा कर्ण म्हणाला,

" अर्जुना ! थांब. माझ्या रथाचे चाक भूमीत रुतलेले आहे, ते काढतो तोवर थांब. चाक काढण्यास माझे हात गुंतले आहेत, मी शस्त्र हातात धरू शकत नाही, म्हणून थांब. निःशस्त्रावर शस्त्र चालवणे हे धर्मयुद्ध नव्हे.

कर्णाचे हे भाषण ऐकून श्रीकृष्ण हसले आणि म्हणाले, " वा ! कर्णा, आता तुला धर्म आठवला होय ? अरे, द्रौपदीची भरसभेत अब्रू लुटताना, पांडवांवर विषप्रयोग करताना, त्यांना लाक्षागृहात जाळून मारण्याचा बेत रचताना, द्यूतात कपट करून युधिष्ठिरासारख्या धर्मात्म्याला फसवताना

तुला धर्म कसा नाही आठवला? राधासुता, तेव्हा गेला होता कुठे तुझा धर्म?"

कर्ण गोंधळून गेला होता. काय बोलणार? बोलायला त्याला तोंडही नव्हते. त्याला आपला अंतकाळ दिसू लागला. त्याने परशुरामाकडून मिळवलेले अमोघ अस्त्र आठवण्याचा प्रयत्न केला. पण कर्णाला ते मुळीच आठवेना. त्याची बुद्धी निस्तेज बनली होती, शरीर शबल झाले होते.

श्रीकृष्ण म्हणाले, "अर्जुना! सोड बाण!"

अर्जुनाने गांडीव धनुष्यावरून तेजस्वी बाण सोडला. तो झणाणत गेला आणि क्षणार्धातच कर्णाचे मस्तक आकाशात उडाले!

कर्णवध होताच शल्य रथ घेऊन परतला. दुर्योधनाला ही वार्ता कळताच त्याला जबर धक्का बसला. तो मुर्च्छित झाला.

■ ■

# शल्य सेनापतीची अखेर

राजा मूर्च्छित झालेला आणि सेनापती मृत्यूमुखी पडलेला, अशा निर्णायक अवस्थेत कौरवसेना भयभीत न झाली तरच नवल! त्यात भीमाने तर दिसेल तो कौरव ठार करण्याचा सपाटा चालवलेला होता!

कौरवसेना रणांगणातून धीर सुटल्याने सैरावैरा धावू लागली. हाहाःकार माजला. तेवढ्यात दुर्योधन शुद्धीवर आला. हा प्रकार पाहिला तेव्हा त्याने सेनेला उद्देशून म्हटले, "अरे, पळाल कुठे? आणि पळून जाणार आहात थोडेच? आता पांडव तुम्हाला पाताळातूनही शोधून काढतील आणि ठार मारतील. तेव्हा भ्याडासारखे मरण्यापेक्षा वीर व्हा! रणांगणात झुंज घेऊन वीरगतीला जा!"

"राजा, तू म्हणतोस ते खरे आहे. आमचा विनाश जवळ आला आहे. तो आता अटळ आहे. पण आम्ही कोणाच्या अधिपत्याखाली लढावे?" कौरवांनी विचारले, यावर दुर्योधन म्हणाला, "हा मद्रराज शल्य तुमचा आता सेनापती आहे.

वीर हो! लढा. पांडवांशी प्राणपणाने लढा!" एवढा संहार होऊनही दुर्योधनाची रक्त सांडण्याची तृष्णा अजून तृप्त होत नव्हती.

दुर्योधनाच्या विनंतीवरून शल्याने उरल्यासुरल्या कौरव-

सेनेचे सेनापतीपद स्वीकारले. तो पांडवसेनेपुढे दुसरे दिवशी तयारीनिशी उभा राहिला.

श्रीकृष्ण म्हणाले "युधिष्ठिरा, आजचा हा घास तुझा आहे."

"श्रीकृष्णा, शल्य आमचा मामा आहे" युधिष्ठिर म्हणाला.

"युद्धभूमीवर प्रतिपक्षाशी लढायला तू उभा आहेस, युधिष्ठिरा ! इथे समोर असेल तो शत्रू आणि बरोबर असतील ते मित्र एवढेच नाते असते. आणि समोरच्या शत्रूचा उच्छेद करणे, एवढे एकच कर्तव्य असते. तेव्हा बाकीचे सर्व विसरून जा, आणि तू तुझे कर्तव्य कर !"

"ठीक आहे, मुकुंदा !" युधिष्ठिर म्हणाला आणि त्याने आपले तेजस्वी धनुष्य सरसावले.

शल्य आणि युधिष्ठिर यांच्यामध्ये घनघोर युद्ध सुरू झाले. दोघांनीही शौर्याची कमाल केली. शेवटी, युधिष्ठिराने एक अमोघ शक्ती सोडली. तिने शल्याचे मस्तक उडवले आणि चेतनाहीन शल्याचे शरीर धरणीवर कोसळले.

धृष्टद्युम्नाने शल्याचा मदांध हत्ती गदेच्या प्रहाराने भुई-सपाट केला आणि शल्याचीही गर्दन छेदली.

सहदेवाने पळून जाणाऱ्या कपटी शकुनीला अडवले. या भयंकर कौरवसेनेच्या नाशाला शकुनीच कारणीभूत होय.

पांडवांच्या विषयी दुर्योधनाच्या मनात असलेली द्वेषबुद्धी ह्या दुर्बुद्धीने वाढवली, पेटवली.

सहदेवाने एकाच बाणाने शकुनीचे शरीर धडापासून वेगळे केले.

शल्य, शाल्व, शकुनी यांचा वध पाहून कौरवसेनेने आणलेला उसना धीरही खचला. ती पुनश्च पळू लागली. पांडववीरांनी एकेकाला गाठून यमसदनाला पाठवले.

■ ■

# दुर्योधनाची अखेर

आपले सर्व सेनापती आणि अठरा अक्षौहिणी सैन्य यांचा रणात घोर संहार झाला हे पाहून दुर्योधनाला अत्यंत विषाद झाला. दुःख झाले. निराशेच्या अंधःकाराने त्याची बुद्धी झाकोळून गेली आणि आपली गदा घेऊन तो कौरवाधिपती पूर्वेकडील सरोवराकडे आश्रयार्थ पळू लागला.

पूर्व दिशेला एक विशाल सरोवर होते. त्यात एक बेट होते. दुर्योधन तेथे जाऊन लपून बसला. त्याचा शोध घेत घेत अश्वत्थामा, कृपाचार्य आणि कृतवर्मा तेथे आले आणि त्याला म्हणाले,

दुर्योधना! रण सोडून तूच पळाल्यावर आम्ही काय करावे?"

"तुम्ही फक्त तिघेच जिवंत राहिला आहात ना?" दुर्योधनाने विचारले.

"होय. पण आम्ही तिघेही पांडवांशी प्राणपणाने लढू शकतो. तू आमच्या बरोबर रहा म्हणजे झाले."

"आज मी खूप थकलो आहे. उद्या पाहू." दुर्योधन म्हणाला.

हा संवाद सरोवराकाठी असलेल्या व्याधांनी ऐकला. हे व्याध दररोज भीमाला मांस नेऊन देत असत. त्यांनी दुर्योधनाचे गुपीत जाणले आणि लगबगीने जाऊन भीमाला ही वार्ता

सांगितली. ती ऐकून भीमाला व अन्य पांडवांनाही आनंद झाला. कारण ते देखील दुर्योधनाचाच शोध-घेत होते. तो सरोवरात लपला आहे हे कळताच सर्वजण तिथे आले. युधिष्ठिराने पुढे होऊन म्हटले, "दुर्योधना, सगळ्यांचा संहार झाल्यावर तू रथातून पळून येथे दडलास हे तुला शोभादायक नाही. चल, बाहेर ये, आणि युद्धास सज्ज हो!"

"मी दमलो आहे. मला विश्रांतीची गरज आहे. उद्या मी तुमच्याशी लढेन."

"अरे, योध्याला विश्रांती युद्धाची अखेर झाल्यावरच. तुझ्यासाठी अनेक वीरांनी आणि श्रेष्ठांनी प्राण दिले आणि तू विश्रांती घेतोस? कुरुकुलाला किती कलंकित करतोस? ये, बाहेर ये! युद्ध कर! आज या युद्धाचा शेवट झालाच पाहिजे."

युधिष्ठिराच्या ह्या भाषणाने आणि अन्य पांडववीरांच्या कुत्सित हसण्याने दुर्योधन आपली गदा घेऊन खवळलेल्या नागासारखा फूत्कारत बाहेर आला.

बाहेर येताच भीमाशी दुर्योधनाचे गदायुद्ध जुंपले. ते घनघोर गदायुद्ध दोघेही वीर निकराने अटीतटीने लढत होते. भिमाच्या गदेचा प्रहार सहन न होऊन कधी दुर्योधन बेशुद्ध होत असे. तर कधी भीमही भोवळून शुद्ध हरपून जात असे. बराच वेळ युद्ध चालले. श्रीकृष्णांनी अर्जुनाच्या मार्फत भीमाला त्याचे प्रतिज्ञेचे स्मरण करून दिले. अर्जुनाने आपल्या मांडीस हात लावला हे पाहून भीमाने गदेचा एक

# सूड ! सूड !!

पांडवांच्या शिबिरात विजयाचा आनंदी आनंद चाललेला होता. त्यातल्या कथा-कहाण्यांना मध्यरात्रीपर्यंत भरती आलेली होती. नंतर त्याच आनंदात पांडववीर गाढ झोपी गेले...

अश्वत्थामा मात्र सूडाच्या भावनेने वनात तळमळत पडलेला होता. काय करावे ? पांडवांचे हनन कशाप्रकारे उरकावे ? याच विचाराने त्याचे मस्तक भणाणून गेले होते.

तेवढ्यात जवळच्याच झाडावर अश्वत्थाम्याला एक दृश्य दिसले. रात्रीच्या काळोखात कावळ्याची पिले शांत झोपलेली होती, आणि एक घुबड हळूच येऊन एक एक पिलू मटकावीत होते. लचके तोडीत होते.

हे भीषण दृश्य पाहताच अश्वत्थाम्याला आनंद झाला. त्याला सूड घेण्याची दुष्ट रीत एकदम पसंत पडली. त्याने लगबगीने शेजारी झोपलेल्या कृप व कृतवर्मा यांना उठवले. घुबडाची गोष्ट सांगितली आणि या घुबडनीतीने पांडवांचा नाश करण्याचा आपला निर्धार व्यक्त केला.

कृपाचार्याला व कृतवर्माला हा मार्ग पसंत पडला नाही. पण अश्वत्थामा सूडाच्या भावनेने पेटून निघालेला होता. शेवटी तो सेनापती होता. म्हणून त्याच्या आज्ञेने कृपाचार्य व कृतवर्मा त्याच्याबरोबर पांडव-शिबिराकडे निघाले.

अश्वत्थामा शिबिराच्या द्वाराशी आला तेव्हा त्याला तेथे एक महाभयंकर विक्राळ अशी आकृती दिसली. अश्वत्थाम्याने जिचा वध करण्याचा प्रयत्न करूनही ते भयंकर विद्रूप हटेना तेव्हा अश्वत्थाम्याने श्रीशंकराची प्रार्थना केली आणि अग्नी प्रदीप्त करून त्यात स्वतःची आहुती देण्याची तयारी चालविली. त्यावेळी श्रीशंकर प्रसन्न झाले आणि त्यांनी अमोघ खड्ग त्याला दिले.

ते घेऊन अश्वत्थामा शिबिरात गेला. सर्व पांडववीर गाढ झोपलेले होते. अश्वत्थाम्याने प्रथमतःच धृष्टद्युम्नाचा वध केला आणि पाठोपाठ कित्येक पांडववीरांना ठार करून द्रौपदीचे पाच पुत्रही यमसदनाला धाडले.

नंतर आनंदित होऊन अश्वत्थामा, कृप व कृतवर्मा परत दुर्योधनाकडे आले. त्याच्या कानी ही भयंकर वार्ता घातली. दुर्योधनाने जणू त्यासाठीच प्राण ठेवले होते. ती वार्ता ऐकताच त्याने आसुरी समाधानाने प्राण सोडला.

द्रौपदीला ही पुत्रवधाची वार्ता कळताच ती फारच शोकविव्हल बनली. पांडवांनाही पुत्रशोकाचा धक्काच बसला. द्रौपदीचे मस्तक अश्वत्थाम्याच्या क्रूर कृत्याने भणाणून गेले होते. ती-त्वेषाने भीमाला म्हणाली, “ आर्य, माझ्या पाच पुत्रांचा बळी घेणाऱ्या अश्वत्थाम्याच्या मस्तकावरचा मणी मला आणून द्या ! आजवर माझ्यासाठी आपण झुंजला, घोर प्रतिज्ञा केल्या आणि पारही पाडल्यात. आता एवढी इच्छा पुरी करा ! ”

द्रौपदीची ही इच्छा ऐकताच भीमाने तत्काळ आपली गदा सरसावली. अर्जुन व श्रीकृष्ण त्याच्या सहाय्याला निघाले.

भगवान व्यासांच्या जवळ अश्वत्थामा बसलेला होता. अर्जुनाला पाहताच त्याने ब्रह्मशिरास्त्र जपून त्यांच्यावर सोडले. ते पाहून श्रीकृष्णाच्या सल्याने अर्जुनाने देखील तेच अस्त्र त्याच्यावर सोडले. आता पृथ्वीचा अंतच होईल की काय, ह्या भयाने व्यासाने अर्जुनाला अस्त्र परत घेण्यास सांगितले. अर्जुनाने ते परत घेतले. पण अश्वत्थाम्याला ते परत घेता येईना. व्यास म्हणाले, "अश्वत्थाम्या, पांडव तुला अवध्य आहेत. तुला जीवदान हवे असल्यास तुझ्या मस्तका-वरचा मणी त्यांना देऊन टाक."

अश्वत्थाम्याचा नाइलाजच झाला होता. भीमाने त्याच्या मस्तकावरचा मणी ओरबाडून काढला आणि द्रौपदीला नेऊन दिला.

तेव्हापासून अश्वत्थामा चिरंजीव झाला. पण मस्तकावर वाहती जखम घेऊन रानोमाळ भटकू लागला. अजूनही तो जखमेवर तेल मागत तसाच तळमळत भटकतो आहे !

■ ■

# शोक-सांत्वन

पुत्रशोकाने धृतराष्ट्र, गांधारी आणि सर्व कौरव स्त्रिया अत्यंत दुःखीकष्टी झाल्या. त्या व्यथित हृदय होऊन विलाप करून लागल्या. अठरा अक्षौहिणी कौरवसैन मारले गेले होते. घरोघर शोक चालला होता. कुणाचा पुत्र, कुणाचा पती तर कुणाचा भाऊ मारला गेला होता.

कुरुक्षेत्र नामक विस्तीर्ण रणभूमीला घोर स्मशानकळा प्राप्त झाली होती. हजारो वीरांची प्रेते तेथे वेडीवाकडी पडली होती. घारी-गिधाडे आणि कोल्ही-कुत्री त्यांच्या मांसाचे लचके तोडीत होती.

शोकविव्हळ धृतराष्ट्र, गांधारी आणि कौरव-स्त्रिया आक्रोशत कुरुक्षेत्रावर गेल्या, प्रेतांच्या खचातून आपले पती शोधू लागल्या. तो भयंकर करुण प्रसंग होता !

महर्षी व्यास, महात्मा विदुर यांनी सर्वांचे सांत्वन केले.

श्रीकृष्णासह पांडव धृतराष्ट्राच्या समाचाराला गेले. एकेकाने आपले नाव सांगून आपल्या अंध, वृद्ध, शोकाकुल चुलत्याला आदराने वंदन करू लागले. पांडव आलेले ऐकून धृतराष्ट्राला विलक्षण संताप चढला. तो क्रोधाने धुमसू लागला. त्याला त्यातल्या त्यात भीमाचा राग येई. भीमानेच बहुतेक पुत्र मारलेले होते. भीमाला खाऊ की गिळू असे त्याला झाले. राग आत ठेऊन प्रेमाचे नाटक करीत त्याने विचारले, "भीम कुठे आहे ? माझा भीम मला भेटवा."

श्रीकृष्णाने धृतराष्ट्राची अंतर्यामीची भावना ओळखून झटकन् एक लोखंडाचा पुतळा पुढे केला. धृतराष्ट्राने भीम समजून क्रोधाने दात-ओठ खावून एवढी करकचून मिठी मारली की, त्या पुतळ्याचे चूर्ण झाले.

श्रीकृष्णाने धृतराष्ट्राची चांगली कानउघडणी केली आणि म्हटले, "तुझ्या अविचारी पुत्रांनी केलेले दुष्कर्म पुरेसे झाले असे तुला अजून वाटत नाही काय ? अरे, तुझ्या पुत्रांनी अधर्माने वागून, हट्टाला पेटून हे युद्ध ओढवून घेतले. पांडवांचा यात काय दोष ?"

खजील झालेला धृतराष्ट्र म्हणाला,

"खरे आहे ! माझ्या पुत्रांचाच सारा दोष आहे. मीच त्यांना पाठीशी घातले. पांडवांना न्याय नाकारला. माझे आता काय राहिले आहे ?"

"पांडवांना आपले मान."

"होय, होय, पांडव माझेच आहेत. माझे सुपुत्र आहेत."

नंतर पांडवांना प्रेमालिंगन देऊन तो शांत झाला.

युधिष्ठिराने सर्व आप्तेष्टांची यथासांग उत्तरक्रिया करून त्यांना तिलांजली दिली.

■ ■

# राज्याभिषेक

घडल्या घटनांनी युधिष्ठिराचे मन उद्विग्न बनले होते. उदास झाले होते. त्याला वाटू लागले, एवढा संहार केला, आप्तजन मारले, हजारो स्त्रिया-मुले अनाथ झाली, मानवी रक्त सांडले–आपण राजसिंहासनावर कशाला बसायचे !

तो म्हणू लागला, " सर्व पृथ्वी जिंकली पण विजयाचा आनंद मिळत नाही. मनाला शांतता लाभत नाही. त्या युद्धाच्या स्मृतीने देखील मनाचा दाह वाढत आहे. कापसाच्या राशीला जाळणाऱ्या अग्नीप्रमाणे त्या आठवणी माझे सारे शरीर होरपळून काढीत आहेत. अर्जुना ! आपल्या हातून भयंकर पातक घडले आहे. अशा स्थितीत राज्य करणे मला योग्य वाटत नाही. मी तुम्हां सर्वांचा निरोप घेऊन वनात निघून जातो. तपश्चर्या करीत बसतो. "

युधिष्ठिराचा हा निर्णय ऐकून द्रौपदीला व पांडवांना मोठा धक्काच बसला. त्यांनी परोपरीने युधिष्ठिराला आपला निर्णय बदलण्याची विनंती केली. परंतु त्याने निर्णय बदलला नाही. शेवटी व्यास त्याला म्हणाले,

" युधिष्ठिरा, तुझ्या बोलण्यावरून तुला राजधर्माचा विसर पडला आहे असे दिसते. पण लक्षात ठेव. गृहस्थाश्रमाचा त्याग करून अरण्यात जाणे तुला शोभत नाही. धुरेचा बैल ज्याप्रमाणे धुरेचा भार आपल्या मानेवर घेतो, त्याप्रमाणे

राज्याचा भार तू आपल्या शिरावर घेतलाच पाहिजे. क्षत्रियाचे ते कर्तव्यच आहे. यज्ञ, विद्या, दंडधारणा, प्रजेचे संरक्षण, द्रव्याचे अर्जन आणि दान हीच राजाची पवित्र कर्मे होत. बिळांमध्ये राहणाऱ्या मूषकांना ज्याप्रमाणे सर्प भक्षण करतो, त्याप्रमाणे शत्रूशी विरोध न करणाऱ्या राजालाही भूमी ग्रासून टाकते. तुला राजधर्माचा विसर पडला आहे. तो तू चांगला समजून घे. तो समजून घेण्याची तुझी इच्छा आहे का ?"

युधिष्ठिर म्हणाला "होय. माझ्या मनाचा गोंधळ उडाला आहे. मला धर्म आणि अधर्म, कर्तव्य आणि अकर्तव्य समजून घेतलेच पाहिजे."

"मग तुला त्यासाठी पितामह भीष्माकडे गेले पाहिजे. तो एकच महापुरुष राजधर्माचे खरेखुरे मर्म सांगू शकेल." व्यास म्हणाले आणि त्यांनी युधिष्ठिराला भीष्माचार्यांकडे धाडले.

शरपंजरी पडलेल्या भीष्मांनी युधिष्ठिराला राजा म्हणजे काय, राजदंड कशासाठी, परचक्र निवारण कसे करावे, सत्तेचा स्वभाव कसा असतो, अमात्य कसा निवडावा, राजाचे शील कसे असावे, राजसेवक कसे बाळगावेत, प्रजा कशी असते, राज्य कसे चालते, क्रांती केव्हा होते, इत्यादी राजाला आवश्यक असणारी राजनीतीच समजावून सांगितली.

युधिष्ठिराला आपल्या कर्तव्याचे भान झाल्यावर त्याने आपला निर्णय बदलला.

नंतर एका शुभमुहूर्तावर युधिष्ठिराला मोठ्या थाटाने

राज्याभिषेक करण्यात आला. त्याने राजदंड धारण केल्यावर अमात्य, सेवक, निरनिराळे अधिकारी यांची नियुक्ती केली. वीरगतीला गेलेल्या वीरांचे स्मरण निरंतर ठेवण्यासाठी धर्मशाळा, पाणपोया, अन्नछत्र, तळी, विहिरी, राजमार्ग, आश्रय, पाठशाळा, आदी लोकोपयोगी अनेक कार्ये त्याने ठिकठिकाणी सुरू केली. युद्धात मेलेल्या वीरांच्या विधवा स्त्रिया व अनाथ मुले यांच्या पालन-पोषणाची व संरक्षणाची सोय केली.

काल मानानुसार उत्तरायण सुरू झाले. भीष्मांनी वडिलकीच्या नात्याने पांडवांना उपदेश केला आणि संक्रांतीच्या दिवशी श्रीकृष्णाचे स्मरण करीत देहत्याग केला.

■ ■

# अश्वमेध

युधिष्ठिराने पितामह भीष्मांची उत्तरक्रिया आटोपली; आता तर तो फारच शोकाकुल झाला होता. त्याचे चित्त अस्वस्थ झाले होते. तेव्हा व्यासांनी त्याला अश्वमेध यज्ञ करण्याचा उपदेश दिला.

युधिष्ठिराने संकल्प केला. परंतु या महान यज्ञासाठी संपत्ती त्याच्या जवळ नव्हती. युद्धामुळे त्यांचा कोष रिता

झालेला होता. महर्षी व्यासांनीच त्याला हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या प्रदेशातून संपत्ती आणण्यास सांगितले. त्यानुसार सर्व पांडव मोठे सैन्य घेऊन तिकडे गेले व अगणित संपत्ती हत्ती, घोडे, उंट, रथ आदि वाहनांवर लादून घेऊन आले.

ते परत येईतोपर्यंत इकडे हस्तिनापुरात एक घटना घडली होती.

अभिमन्यू रणी पडला त्यावेळी त्याची भार्या उत्तरा गर्भवती होती. ती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. परंतु जन्मतःच तो मृतावस्थेत होता. हे पाहून कुंती, द्रौपदी, सुभद्रा यांना फारच दुःख झाले. त्यांची आशा नष्ट झाली होती. त्या शोक करू लागल्या. त्यांचा हृदयाला पीळ पाडणारा विलाप पाहून श्रीकृष्णांनी आपल्या दैवी शक्तीने त्या मुलाला जिवंत केले.

मूल हात पाय हालवू लागताच पांडवस्त्रियांना आनंद झाला. तोवर पांडवही हस्तिनापुरी येऊन पोचले. त्यांना ही आनंददायक वार्ता कळताच अत्यंत हर्ष झाला. त्यांनी मोठा पुत्रोत्सव साजरा केला. अभिमन्यूच्या त्या पुत्राचे नाव परीक्षिती असे ठेवण्यात आले.

नंतर मोठ्या धुमधडाक्याने अश्वमेध यज्ञास प्रारंभ झाला. ठिकठिकाणचे ऋषी-मुनी, विद्वान, पंडित, राजे-महाराजे यज्ञासाठी जमले. हजारो लोक हस्तिनापुरी गोळा झाले. सर्व

लक्षणांनी युक्त असा अश्वमेधाचा घोडा सजविण्यात आला. यज्ञाचा प्रारंभ युधिष्ठिराच्या हातून झाला, तर अश्वाचे रक्षण अर्जुनाने स्वीकारले.

अश्वमेधाचा अश्व सोडण्यात आला. तो देशोदेशी गेला. सर्वत्र त्याचे स्वागतच झाले. कोणीही त्याला रोखले नाही, अडवले नाही; परंतु माणिपूर देशात मात्र बभ्रुवाहनाने अश्वाला रोखले, धरले. अर्जुनाला त्याने ओळखलेच नाही. तो अर्जुनाशी म्हणजे प्रत्यक्ष पित्याशीच युद्ध करायला उभा राहिला. उलुपीपासून अर्जुनाला झालेला बभ्रुवाहन हा मुलगा. पण ही ओळख पटताच बभ्रुवाहनाने धनुष्य मागे घेतले, पित्याला वंदन केले आणि अश्व सोडला.

पुढे अनेक देशांतून हा अश्व गेला. पण कुठे, कुणीही त्याचा मार्ग अडवला नाही. अर्जुनाच्या पराक्रमाचा धाक सर्वांनाच वाटे.

अशा रीतीने सर्व देश फिरवून झाल्यावर अश्व हस्तिनापुरी परत आला.

नंतर मोठ्या समारंभपूर्वक यज्ञाची सांगता झाली.

■ ■

# वनगमन

धृतराष्ट्र एके दिवशी युधिष्ठिराला म्हणाला, "मुला, आता मला वनात जाण्याची परवानगी दे."

"तात! कशासाठी?"

"आता अखेर जवळ आली आहे. ईश्वरचिंतनात शेवटले दिवस सर्व मोहापासून दूर जाऊन काढावेत अशी इच्छा आहे."

धृतराष्ट्राच्या या विचाराला व्यासमहर्षींनी पाठिंबा दिला, तेव्हा युधिष्ठिरानेही दुःखाने त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांना जाऊ दिले.

युधिष्ठिराच्या बरोबर गांधारी, कुंती, संजय, विदुर ही वडीलधारी वृद्ध मंडळीही निघाली.

सारे नगरवासी शोकाकुल झाले.

पांडवांच्याबरोबर प्रजाजनांचा लोंढाच्या लोंढा नगराबाहेर त्या वृद्धांना निरोप देण्यासाठी जड मनाने गेला.

धृतराष्ट्र विदुराच्या खांद्यावर हात ठेवून चालला होता. तो थांबून म्हणाला,

प्रियजनहो, आता परत जा. आम्हाला आमच्या वाटेने जाऊ द्या. आता मोहात गुंतवू नका."

पांडव आणि प्रजाजन थांबले. तेथूनच परत नगरीकडे

वळले. ती वृद्ध माणसे मात्र एकमेकांना आधार देत, सोबत करीत वनात निघून गेली.

दिवस चालले होते. पण त्या वृद्धांच्या आठवणी पांडवांना अस्वस्थ करीत होत्या. द्रौपदीला तर कुंतीला भेटण्याची फारच इच्छा झाली. तेव्हा सर्व पांडवांनी एकदा वनात जाऊन भेटण्याचे ठरवले. त्यानुसार ते एके दिवशी वनात गेले. सर्वांची भेट झाली. आनंद झाला. पण विदुर कुठे नव्हता. तो पैलतिरीच्या मुक्कामाला केव्हाच पोचलेला होता.

धृतराष्ट्राच्या व कुंतीच्या इच्छेवरून व्यासांनी सर्व कौरवांचे व कर्णाचे पुनश्च दर्शन त्यांना घडवले. त्यांचे दुःख हलके झाले. सर्व कौरव स्त्रियांनी याच सुमाराला गंगामातेला आपले देह अर्पण केले.

नंतर पांडव हस्तिनापुरी परत आले. उदास मनाने राज्यकारभार पाहू लागले.

असे आणखी काही दिवस गेले आणि एके दिवशी नारदांनी येऊन वार्ता दिली.

" युधिष्ठिरा, गंगास्नानावरून परत येत असता व्रतवैकल्ये करून कृश झालेले धृतराष्ट्र गांधारी व कुंती यांचे देह वणव्यात सापडले आणि भस्मसात झाले. "

ही वार्ता ऐकून पांडव दुःखाने व्याकूळ बनले.

■ ■

# श्रीकृष्णांची अवतारसमाप्ती

सत्य, न्याय, नीती आणि धर्म यांस अनुसरून छत्तीस वर्षे युधिष्ठिराने हस्तिनापुरी राज्य केले. प्रजेला सुख दिले. भूमीची सर्व बाजूंनी भरभराट झाली, समृद्धी आली.

परंतु पुढे पुढे मात्र युधिष्ठिराला दुश्चिन्हे दिसू लागली. तशातच आणखी एक मनाला क्लेश देणारी, धक्का देणारी वार्ता कळली.

एकदा विश्वामित्र, कण्व, नारद आदी ऋषी द्वारकेत प्रवेशत असता यादवयुवकांना त्यांची थट्टा-मस्करी करण्याची दुर्बुद्धी झाली. त्यांनी सांब नावाच्या यादव तरुणाला लुगडे-चोळी लेववून स्त्रीवेष दिला आणि त्यास पुढे करून ऋषींना विचारले,

"या बाईला मुलगा होईल की मुलगी?" विश्वामित्रांनी रागाने सांगितले, "लोखंडी मुसळ होईल मुसळ! आणि ते तुमच्या वृष्णी व अंधक कुलाचा नाश करील.

ही शापवाणी उमटताच खरोखरच सांबाच्या शरीरातून मुसळ निघाले. हे विनाशकारी मुसळ पाहून उग्रसेनाला भय वाटले. त्याने त्या मुसळाचे चूर्ण करून समुद्रात फेकून दिले.

परंतु घडणारे घटित काही टळले नाही. यादव तरुण मादक पेयांचे सेवन करून एवढे उन्मत्त, बेहोष झाले की, त्यांनी आपआपसातच लढायला सुरुवात केली. एकमेकांच्या जीवावर उठले.

त्यांचे हे भयंकर कृत्य पाहून श्रीकृष्णांनी समुद्रतीरीचे लवे गवत उपटून फेकले, तो त्या गवताचेच मुसळ बनले आणि यादववीरांना ठार मारीत सुटले. यादववीरांचा जबर संहार झाला.

बलरामाने योग प्रकाराने शरीर-त्याग केला.

श्रीकृष्ण नंतर वनात गेले. एका वृक्षाच्या तळाशी आपले समवर्णी पाऊल ठेवून ते चिंतनात गढले. त्याच सुमारास एक व्याध त्या वनात आला होता व शिकारीचा वेध घेत हिंडत होता. हिंडता हिंडता त्याला श्रीकृष्णाचे समवर्णी पाऊल एखाद्या मृगाच्या मुखासारखे वाटले आणि त्याने त्यावर बाण मारला. श्रीकृष्णांनी एवढेच निमित्त करून आपली जीवनयात्रा संपवली. अवतारकार्य आटोपते घेतले. मानवी देहाचा त्याग केला.

■ ■

## महाप्रस्थान

श्रीकृष्णांच्या अवतार समाप्तीची वार्ता कळली तेव्हा पांडवांना फारच दुःख झाले. युधिष्ठिर आपल्या भावांना आणि द्रौपदीला म्हणाला,

“ आपणही आता महाप्रस्थानाला निघाले पाहिजे. ”

सर्वांनी याला संमती दर्शविली.

मग ते निरवानिरवीला लागले.

वृष्णीवंशातला एकच धागा–श्रीकृष्णाचा नातू वज्र हा मागे उरलेला होता. त्याला इंद्रप्रस्थाचे राज्य दिले. परिक्षितीला हस्तिनापूरच्या गादीवर बसविले. दोघांची देखभाल करण्यासाठी सुभद्रेला मागे ठेवले.

मग एके दिवशी द्रौपदीसह पांडवांनी पुनः एकदा राजवस्त्रे नि अलंकार उतरून ठेवले आणि वल्कले परिधान केली.

अतिशय जड अंतःकरणाने प्रजाजनांनी त्यांना निरोप दिला. पांडव निघाले. पुन्हा कधीही परत न येण्यासाठी निघाले. शेवटल्या मुक्कामाची वाट चालू लागले. बरोबर एक कुत्रे मात्र त्यांच्यासह चालू लागले.

चालता चालता काही दिवसातच सर्वांच्या आधी द्रौपदीचा वाटेतच अंत झाला.

भीमाला नवल वाटले. त्याने विचारले, "असे का झाले?"

"द्रौपदी पतिव्रता खरी, पण अर्जुनावर ती इतरांपेक्षा अधिक प्रेम करी. प्रेमाच्याबाबतीत तिने जो थोडासा पक्षपात केला, त्याचा हा परिणाम."

आणखी काही अंतर चालून गेल्यावर सहदेव पडला. त्याच्या पाठोपाठ नकुळाचा अंत झाला. नकूळानंतर अर्जुन पडला. युधिष्ठिर ने भीमाच्या पृच्छेवरून सांगितले,

"सहदेवाला आपल्या शहाणपणाचा व नकुलाला आपल्या सौंदर्याचा गर्व झालेला होता, त्याचे हे फळ. अर्जुनालाही आपल्या शौर्याचा अहंकार चढला होता. एका दिवसात

आपल्या सर्व शत्रूंचा नाश करू अशी त्याने प्रतिज्ञा केली होती. पण ती त्याच्याने पार पडली नाही. त्यामुळे धनुर्विद्येचा अपमान झाला त्याचे फळ म्हणून अर्जुनाचा वाटेतच अंत झाला. आणि भीमा, आता तुझी पाळी आहे. तुलाही आपल्या बळाचा अहंकार झालेला होताच."

भीमही नंतर पडला.

अखेरीस युधिष्ठिर व बरोबर आलेले ते कुत्रे, दोघेच राहिले.

इंद्र स्वतः रथ घेऊन सामोरा आला. "रथात बसून स्वर्गलोकी चलावे." असे तो युधिष्ठिराला म्हणाला. परंतु त्या कुत्र्याला सोडून आपण एकटे येण्यास तयार नसल्याचे युधिष्ठिराने सांगितले. इंद्र त्या कुत्र्यास रथात घेण्यास तयार होईना. तेव्हा युधिष्ठिराने—त्या महान धर्मराजाने—आपले अर्धे पुण्य त्या कुत्र्याला दिले.

युधिष्ठिराची ही धर्मपरायणता पाहून यमधर्म स्तिमित झाला. दिपून गेला. त्याने कुत्र्याचे रूप टाकून दिले व खरे रूप धारण केले. युधिष्ठिराची त्याने पुष्कळ प्रशंसा केली.

इंद्राच्या रथात बसून यमधर्मासह युधिष्ठिर सदेह स्वर्गी पोचला.

एक महान् पर्व संपले.

श्रीमहाभारताची समाप्ती झाली.

IRBK-0115836

७५८३६ २०।२।५५